# अर्थसंवाद

खंड ७ * अंक ३ * ऑक्टोबर – डिसेंबर १९८३

मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय

अर्थ शब्दाची वाट पाहे

मराठी अर्थशास्त्र परिषद सातव्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत

अर्थशास्त्राचे अध्ययन अध्यापन

टिपणे आणि चर्चा

अर्थसंवाद वार्षिक अहवाल

ग्रंथ-परिचय

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये । शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

# अर्थसंवाद

ऑक्टोबर – डिसेंबर १९८३
खंड ७ : अंक ३

प्रमुख संपादक : आनंद नाडकर्णी

साहाय्यक संपादक : संतोष दास्ताने

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता
आनंद नाडकर्णी
अ-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी
६१ अ/९–१०, एरंडवणा
पुणे ४११ ००४

व्यवस्थापकीय पत्ता
रवीन्द्र सबनीस
कार्यवाह
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी
ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर
मुंबई ४०० ०१४

सल्लागार मंडळ

**वि. वि. बोरकर**
**स. ह. देशपांडे**
**रवीन्द्र दोशी**
**रमेश पानसे**

---

## आभार

(१) अर्थसंवाद प्रकाशनासाठी **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** आणि **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांच्याकडून अनुदान मिळाले आहे. आम्ही या दोन संस्थांचे आभारी आहोत.

(२) मुखपृष्ठावरील चित्र तयार करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीविषयी सल्ला दिल्याबद्दल **डॉ. अनिल अवचट** यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

---

## या अंकात


१. मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय ९३
**स. ह. देशपांडे**

२. अर्थशास्त्राचे अध्ययन-अध्यापन १२७
**नीळकंठ रथ**

३. अर्थ शब्दाची वाट पाहे १३०
अर्थशास्त्र परिभाषा कोश : एक चुकीची नोंद
**व. श्री. पटवर्धन**

४. चर्चा व टिपणे १३२
प्रा. सोवनी व विनिमयमूल्ये ;
प्रत्युत्तरावरील प्रतिक्रिया
**नी. वि. सोवनी**

५. ग्रंथ-परिचय १३७
राज्यसंस्था आणि वर्गरचना
**व. गो. सहस्रबुद्धे**

६. मराठी अर्थशास्त्र परिषद १४२
सातव्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत

७. अर्थसंवाद वार्षिक अहवाल १४५

# संपादकाचे निवेदन

'अर्थसंवाद'चे गेले काही अंक काहीशा विलंबाने प्रसिद्ध झाले आहेत आणि ऑक्टोबर–डिसेंबर १९८३ च्या या अंकाने विलंबाच्या बाबतीत कळस गाठला आहे, याची मला खंत आहे. या विलंबाची अनेक कारणे आहेत. त्यांच्या तपशिलात मी शिरत नाही. परंतु निश्चित पाऊले उचलून विलंबाचा हा अवधी झपाट्याने कमी करण्यासाठी आम्ही सर्व संबंधित झटत आहोत याची 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदारांनी खात्री बाळगावी. हा अंक तयार झाल्याबरोबर त्याच्यापुढच्या – जानेवारी–मार्च १९८४ च्या–अंकाचा संपादित मजकूर मुद्रणालयास देण्यात येईल. मुद्रणालयाच्या सहकार्याने जूनच्या पहिल्या आठवड्यात तो अंक प्रकाशित करता येईल असा विश्वास आम्हास वाटतो. त्यानंतर एप्रिल–जून १९८४ या अंकाचा संपादित मजकूर जून महिन्यातच मुद्रणालयाकडे देऊन अंकाच्या प्रकाशनातील विलंब यथावकाश दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

मराठी अर्थशास्त्र परिषद ही एका महत्त्वाच्या कार्यासाठी स्थापन झालेली संस्था आहे. या कार्यात प्रगती साधण्यासाठी परिषदेने केलेल्या विविध प्रयत्नातील एक – आणि तूर्त तरी सर्वात महत्त्वाचा–प्रयत्न म्हणजे 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाचे प्रकाशन हा होय. परिषदेची स्थापना १९७७ साली झाली. तेव्हापासून गेली सात वर्षे 'अर्थसंवाद'चे अंक थोड्या अधिक विलंबाने का होईना सततपणे निघत आहेत. तेव्हा 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदारांनी गेल्या काही अंकांच्या प्रकाशनातील तात्पुरत्या स्वरूपाचा काहीसा अतिविलंब नजरेआड करून 'अर्थसंवाद'–वरील आपला लोभ कायम ठेवावा. त्यांच्या पाठिंब्यावरच परिषदेचे कार्य चालू राहणार आहे.

**आनंद नाडकर्णी**
प्रमुख संपादक

# वर्गणीचे दर

( अ ) : परिषदेचे सभासद

| | | |
|---|---|---|
| १. आजीव सभासद | : | रु. २५० ( एक रकमी ) |
| २. साधारण सभासद | : | रु. ३० ( वार्षिक ) |
| ३. संस्था सभासद | : | |
| अ. शैक्षणिक | : | रु. ५० ( वार्षिक ) |
| ब. व्यावसायीक | : | रु. १५० ( वार्षिक ) |

'अर्थसंवाद' हे त्रैमासिक परिषदेच्या सभासदांना त्यांच्या सभासद वर्गणीतच दिले जाते.

( ब ) : अर्थसंवाद : वर्गणीदार

| | | |
|---|---|---|
| १. ग्रंथालये | : | रु. ४० ( वार्षिक ) |
| २. विद्यार्थी | : | रु. २० ( वार्षिक ) |

वर्षगणना : १ एप्रिल ते ३१ मार्च

रवीन्द्र सबनीस
कार्यवाह

# मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय *

स. ह. देशपांडे

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे हे सातवे वार्षिक पाऊल ह्या अधिवेशनाच्या निमित्ताने पडत आहे. सात पावले एकत्र चालल्याने संबंध दृढ होतात असा आपल्याकडचा जुना संकेत आहे. आपली ही संघटना आता स्थिरपद झाली असाच ह्या अधिवेशनाचा प्रतीकरूप अर्थ मी करतो. सात वर्षांपूर्वी मुंबईला भरलेल्या पहिल्या अधिवेशनातील उपस्थितांचे स्वागत मीच केले म्हणून मला आज विशेष आनंद वाटतो.

ह्या अधिवेशनाचे अध्यक्षपद आपण मला दिलेत ह्याबद्दल मी आपला आभारी आहे. त्याचबरोबर ह्या क्षणी माझ्या मनात कोणती भावना प्रबळ आहे असे आपण मला विचाराल तर ती संकोचाची आहे हे जाहीर करणे मला आपले कर्तव्य वाटते. मला एका विषयाचा जरा मन लावून अभ्यास करण्याची संधी आपण दिलीत एवढाच ह्या सगळ्याचा अर्थ मी समजतो. मानमरातबाची सवय नसलेल्या माझ्या हातून काही चुका झाल्या तर आपण उदार अंतःकरणाने त्या पोटात घालाल अशी मला खात्री आहे.

ह्या अधिवेशनाचे आतिथ्य श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने केले आहे ही मला उल्लेखनीय गोष्ट वाटते. अर्थशास्त्रात स्त्रियांचा पुढाकार उत्तरोत्तर वाढणार आहे असे मला मुंबईच्या महाविद्यालयातील व विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या वर्गांवरून नजर फिरविता तरी नक्कीच वाटते. त्यामुळे महिला विद्यापीठाचा पुढाकार कालसुसंगत आणि अभिनंदनीय आहे. त्या विद्यापीठाच्या कार्यकर्तींचे आणि कार्यकर्त्यांचे आभार अधिवेशनाच्या शेवटी मानले जातीलच. पण मीही त्यांना मनापासून माझे धन्यवाद देतो.

## १. मार्क्सवादाचे नैतिक अधिष्ठान

मार्क्सवादी विचारसरणी आणि सामाजिक न्याय ह्यांचे परस्परसंबंध तपासून पाहणे हा ह्या निबंधाचा हेतू आहे. मार्क्सवादी विचारसरणी असे म्हणत असताना मी मुख्यतः मार्क्स आणि काहीसा एंगल्स ह्यांच्यापुरती माझी चर्चा मर्यादित करणार आहे. नंतरच्या मार्क्सवाद्यांचा उल्लेख आलाच तर तो अनुषंगाने येईल.

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पुणे येथे दि. २८–३० ऑक्टोबर १९८३ ह्या दिवसांत भरलेल्या सातव्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण. मूळ चक्रमुद्रित भाषणात काही, बव्हंशी मामुली, फेरफार केले आहेत. सर्व लेखकांचा उल्लेख – भारतीय वा परकीय–बहुमानार्थी करण्याची 'अर्थसंवाद'ची प्रथा आहे. अध्यक्षीय भाषणात मार्क्स आदी लेखकांचा उल्लेख या प्रकारे केलेला नाही. तरीही भाषण जसे देण्यात आले तसे किरकोळ फेरबदलासह आम्ही येथे प्रसिद्ध करीत आहोत. —संपादक

'सामाजिक न्याय' असे म्हणत असताना माझ्या मनात सामाजिक धनाच्या वाटपाचा किंवा वितरणाचा विषय प्रामुख्याने आहे. मार्क्सवादात ह्या प्रश्नाला कितपत स्थान दिलेले आहे ? वितरणात्मक न्यायाच्या दृष्टीने मार्क्सवादातून काही तत्त्वे उपलब्ध होतात का ? ती पुरेशी आहेत काय ? नसल्यास ही त्रुटी कोणत्या रीतीने भरून काढता येईल ? ती भरून काढण्यासाठी मार्क्सच्या शोषण-संकल्पनेचा विस्तार करता येईल का ?— इत्यादी प्रश्न मी चर्चेसाठी घेणार आहे. दारिद्र्याची संकल्पना आणि मार्क्सवाद ह्यांचा संबंध काय आहे हेही पाहण्यासारखे आहे. ह्याशिवाय मार्क्स ज्या स्थितीचा 'दास्य' किंवा 'गुलामी' म्हणून विशेष उल्लेख करतो तिचाही अंतर्भाव ह्या चर्चेत मी करणार आहे. मार्क्सच्या वाङ्मयाचे जरुरीपुरते मंथन करून सामाजिक न्यायाबद्दलची त्याची धारणा निश्चित करणे आणि आपल्या संदर्भात तिची उपयुक्तता तपासून पाहणे हे माझ्यापुढचे उद्देश आहेत.

न्याय ही एक मूल्यात्मक-संकल्पना आहे, तिचा संबंध नीतिविचाराशी आहे. तेव्हा प्रथम असा प्रश्न उभा राहतो की, मार्क्सवादाला काही नैतिक भूमिकाच आहे का ? काहीजण तशी भूमिका असल्याचे नाकारतात. उदाहरणार्थ, वेर्नर सोंबार्ट यांनी म्हटले आहे :

> "संपूर्ण मार्क्सवादात सुरुवातीपासून शेवटपर्यंत नीतिशास्त्राचा लवमात्रही अंश नाही. मार्क्सवादात नैतिक स्वरूपाचे मतप्रदर्शन केलेले नाही किंवा नैतिक गृहीतकृत्ये स्वीकारलेली नाहीत."[१]

मार्क्सपूर्वीचे समाजवादी नीतिविचाराने प्रभावित झाले होते. ह्याउलट मार्क्सने समाजवादाची शास्त्रीयरीत्या मांडणी केली ह्या मूळ प्रमेयावर वरचे मत आधारल्यासारखे दिसते. अर्थात मार्क्सने शास्त्रीय समाजवादाची मांडणी करण्याचा पहिला प्रयत्न केला हे खरे आहे. एक असा प्रयत्न करणे आणि नैतिक भूमिका असणे ह्यात परस्पर विरोध नाही. इतिहासक्रमात समाजवाद अटळ आहे हे मार्क्सने सांगितले. हे विधान शास्त्रीय स्वरूपाचे आहे. पण इतिहासक्रमात ही जी अटळ गोष्ट आहे ती मार्क्सला पसंतही आहे हे मार्क्सशी थोडाफार परिचय असलेला कोणीही मान्य करील आणि पसंतीचा शिक्का हा नैतिक भूमिकेचाच आविष्कार आहे. मार्क्सची समाजवादाबद्दलची पसंती सिद्ध करण्यासाठी पुरावे देण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. त्याचे वाङ्मय आणि कार्य ह्या दोहोंमध्ये त्याची नैतिक प्रेरणा पुरेशी स्पष्ट झालेली आहे. त्यामुळे ह्या प्रश्नाच्या विवेचनात मी जास्त शिरत नाही.

मात्र दुसरा एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. मार्क्सची एक नैतिक भूमिका आहे हे खरे असले तरी ती 'न्यायाच्या बाजूची आहे हे म्हणणे खरे नाही' असा पक्ष रॉबर्ट टकर ह्यांनी मांडला आहे.[२] हा पक्ष दुर्लक्ष करण्यासारखा नाही. तो समजून घेण्याचा आपण प्रयत्न करू. टकर ह्यांचे म्हणणे असे आहे की, मार्क्सच्या मते भांडवलशाही 'अशिव' किंवा 'अमंगल' [ इव्हील ] असली तरी ती **अन्याय्य** आहे असे मार्क्सला म्हणायचे नाही. निदान अन्यायाचा विचार मार्क्समध्ये गौणत्वाने येतो. प्रधान विचार वेगळ्या प्रकारच्या अशिवाचा आहे. टकर म्हणतात :

> " माझा मुद्दा एवढाच आहे की, मार्क्स हा सामाजिक न्यायाचा प्रेषित होता ही त्याची प्रतिमा भ्रामक आहे आणि मार्क्सवादातला मुख्य नैतिक प्रश्न वितरणात्मक न्यायाचा [ डिस्ट्रिब्युटिव जस्टिस ] आहे असे जे मानतात ते चूक करीत आहेत. "

आपल्या मताच्या समर्थनार्थ टकर पुढीलप्रमाणे पुरावे देतात. **क्रिटीक ऑफ द गोथा प्रोग्रॅम** ह्या पुस्तिकेत मार्क्सने 'न्याय्य वितरण,' 'समान हक्क' इत्यादी तत्त्वांची कडक भाषेत निर्भर्त्सना केली आहे. प्रुद्‌‌‌‌वाँ ह्या फ्रेंच समाजवाद्याच्या 'चिरंतन न्याय' [ इटर्नल जस्टिस ] इत्यादी तत्त्वांची त्याने चेष्टा केली आहे. इतकेच नव्हे तर न्यायाच्या भाषेत समाजवादाची मांडणी करणे अशास्त्रीय आहे असा मार्क्सवादाचा आग्रह आहे. एंगल्सने आपल्या **द हाऊसिंग क्वेश्चन** ह्या पुस्तकात असे म्हटले आहे की, युक्त-अयुक्त, न्याय्य-अन्याय्य ह्या कल्पना कालसापेक्ष आणि परिस्थितिसापेक्ष असतात, 'चिरंतन न्याय' असा काही प्रकार नसतो. ग्रीक आणि रोमन लोकांच्या दृष्टीने गुलामगिरीची पद्धत 'न्याय्य' होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळच्या बूर्ज्वा वर्गाच्या दृष्टीने सामंतशाही "अन्याय्य" होती. **क्रिटीक** . . मध्ये मार्क्सनेही म्हटले आहे की, भांडवलशहांच्या दृष्टीने भांडवलशाहीमधली उत्पन्नवाटपाची व्यवस्था न्याय्यच आहे. आणि समाजवादी घेतले तरी त्यांचे तरी न्याय्य वितरण काय ह्या विषयावर एकमत कुठे आहे ? मार्क्सने साम्यवादाचे चित्र रंगविले

आहे त्यातही 'समते'चे तत्त्व मध्यवर्ती नाही. ते तत्त्व मुख्यत: 'बंधुभावा'चे आहे. "प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीप्रमाणे आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे" हे तत्त्व समतेचे नाही. कारण गरजा आणि शक्ती सर्वांच्या सारख्या नसतात. अर्थात वितरणविषयक एक नियम ह्यात येतो हे खरे आहे; पण तो समतेचा नाही आणि एकूण वितरणविषयक प्रश्नांवर त्याचा जोरही नाही. कारण हे म्हणून झाल्यावर त्याने लगेच म्हटले आहे की, "एकूणच वितरणाविषयी एवढे अवडंबर माजविण्याचे आणि त्यावर मुख्य भर देण्याचे कारण नाही." मार्क्सवादी समाजवादाचा मुख्य भर उत्पादनावर, उत्पादनसंबंधांवर आहे. भांडवलशाहीत उत्पादनाच्या क्रियेत कामगाराचे "निर्मानवीकरण" [ डीह्यूमनायझेशन ] होते, तो यंत्रवत् बनतो, किंबहुना तो एक क्रेयवस्तू बनतो. श्रमांतून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधत नाही. उलट साम्यवादी अवस्थेत खाजगी मालमत्ता नष्ट होईल, श्रमविभागणी संपुष्टात येईल, श्रम ही एक वेदना बनण्याऐवजी आत्मतृप्तीचे साधन बनेल, व माणूस खऱ्या अर्थाने मुक्त होईल. उत्पादनसंबंध बदलल्याने म्हणजे खाजगी मालकीच्या व्यवस्थेऐवजी सामाजिक मालकी आणल्याने जड धनाची समृद्धी वाढेल आणि समताही येईल हे खरे आहे, पण असे होणे हे साम्यवादाचे मुख्य प्रयोजन नव्हे. कारण माणसाचे माणूसपण त्याच्या **उत्पादकतेत** असते, **उपभोक्तेपणात** नसते. अंतिम साम्यवादाकडे नेणारी जी प्रारंभीची म्हणजे समाजवादाची अवस्था असते तीत तर भांडवलशाहीच्या जन्मखुणा राहतील, उत्पन्नाचे वाटप गरजेप्रमाणे न होता कामाच्या प्रमाणात होईल म्हणजेच जास्त काम करणाऱ्याला जास्त धन मिळेल, ह्याचाच अर्थ विषमता नांदेल असे मार्क्सने म्हटले आहे. ह्याशिवाय भांडवलशाहीतील 'शोषणाची' मार्क्सची जी संकल्पना आहे तीसुद्धा मूल्यरहित आहे असे टकर ह्यांचे म्हणणे आहे. एकूण मार्क्सच्या १८४४ च्या पॅरिस हस्तलिखितांत 'वियुक्तता', 'परात्मता', 'तुटलेपणा' किंवा 'हरवलेपणा' [ एलियनेशन ] ही जी संकल्पना आहे तिच्याशीच मार्क्स शेवटपर्यंत घट्ट चिकटून आहे. ह्या संकल्पनेचा गाभा कामगाराला सक्तीने करावे लागणारे काम [ फोर्स्ड लेबर ] हा आहे. ही सक्ती समाजवादपूर्व सर्व अवस्थांमध्ये खाजगी मालकीवर आधारलेल्या उत्पादनसंबंधांमधून निर्माण होते. माणसाला दास्यातून मुक्त करणे, उपजीविकेचे साधन म्हणून नव्हे तर जीवनाची एक महत्त्वाची गरज म्हणून, म्हणजेच कलासदृश आनंदाचे किंवा आपल्या सुप्त शक्तींच्या विकासाचे साधन म्हणून काम करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे हे समाजवादाचे ध्येय आहे आणि त्यासाठी भांडवलशाही उत्पादनसंबंधांवर प्रहार करून ते नेस्तनाबूत करणे जरूर आहे. मुख्य रोख उत्पादनावर आहे, विभाजनावर नाही.

टकर एवढेच म्हणून थांबत नाहीत. आर्थिक न्यायाचा किंवा एकूण न्यायाचा विचार मार्क्सवादात बसत नाही असेही त्यांचे म्हणणे आहे आणि हे केवळ आपलेच म्हणणे नसून मार्क्सचेही आहे असे त्यांचे संसूचन आहे. तेव्हा ह्या युक्तिवाद जरा तपासून पाहिला पाहिजे.

न्याय इत्यादी कल्पनांना मार्क्सचा का विरोध आहे हे स्पष्ट करताना टकर यांनी पुढील कारणे दिली आहेत. एक कारण असे की, न्यायाच्या भाषेत बोलणे म्हणजे प्रचलित अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्याच्या भाषेत बोलणे असा आहे आणि हे मार्क्सच्या क्रांतिवादाच्या विरोधी आहे, एवढेच नव्हे तर तो क्रांतीशी द्रोह आहे. हा युक्तिवाद पटणे अवघड आहे. प्रचलित व्यवस्थेत अन्याय आहेत, तरीही तीत दुरुस्त्या करून न्याय प्रस्थापना करता येईल असे कुणाला वाटले तर ते तर्कसंगत आहे यात शंका नाही; उलट प्रचलित व्यवस्थाच अन्याय्य पायावर उभी आहे, आणि म्हणून तिचा नष्टांश करूनच न्यायाची प्रतिष्ठापना करता येईल असे दुसऱ्या कुणाला वाटले तर तेही तितकेच तर्कसंगत आहे. न्यायाची मागणी आणि क्रांतिविषयक अनुकूल वा प्रतिकूल भूमिका यांचा तसा काही संबंध नाही; म्हणून न्यायाची मागणी म्हणजे क्रांतिविरोध हे समीकरण पटण्यासारखे नाही. मार्क्सपूर्वी ज्यांनी सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला त्यांपैकी काही सुधारणावादी होते हे खरे आहे. पण त्यामुळे न्यायाची मागणी म्हणजे क्रांतिद्रोह असे ठरत नाही. आपल्या पूर्वीच्या समाजवाद्यांपेक्षा आपला समाजवाद अगदी वेगळा आणि 'शास्त्रीय' आहे हे दाखविण्याच्या अट्टाहासातून न्यायाच्या संकल्पनेवर मार्क्सने आगपाखड केली असण्याचा संभव आहे.

'न्याय' ही संकल्पनाच मुळात समन्वयवादी आहे असे टकर ह्यांनी म्हटले आहे. दोन पक्षांमध्ये असलेल्या संघर्षात समझोता घडवून आणणे म्हणजे न्याय अशी त्यांनी व्याख्या केली आहे. ही व्याख्या बरोबर असेल तर भांडवलदार आणि कामगार ह्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणून समाजव्यवस्थेचा एक समतोल निर्माण करणे, म्हणजेच प्रचलित

भांडवलशाही व्यवस्थेचे अस्तित्व मान्य करून तिच्यात सुधारणा करणे हा क्रांतिविरोधी मार्ग आहे असे म्हणता येईल. पण न्यायाची व्याख्या इतकी संकुचित करण्याची गरज नाही. भांडवलशाहीतील कायद्याप्रमाणेसुद्धा खुनी माणूस आणि खून झालेल्याचे नातेवाईक यांच्यातील संघर्षाची समाप्ती तडजोडीने ठरावी अशी सोय नाही. तेव्हा न्यायाची मागणी करणे म्हणजे निश्चयाने सुधारणावादी असणे असा निष्कर्ष निघत नाही.

नीतिमूल्ये कालसापेक्ष किंवा परिस्थितिसापेक्ष असतात असे मार्क्सवादी मत असल्याचा पुरावा टकर ह्यांनी या संदर्भात दिला आहे. पण हा मुद्दा विनाकारण ताणला जातो आहे असे मला वाटते. मूल्ये दिक्कालसापेक्ष असतात हे मान्य केले तरी आपल्याला भासलेल्या नैतिक मूल्यांच्या दृष्टिकोणातून पूर्वीच्या काळातल्या किंवा इतर परिस्थितीतल्या नीतिकल्पनांचे आपण मूल्यमापन करू नये असे थोडेच आहे ? सीता शुद्ध आहे हे माहीत असूनही 'लोकापवाद' येऊ नये म्हणून रामाने तिचा त्याग करावा हे तत्कालीन नीतिमूल्यांना धरून असेल हे शक्य आहे. म्हणून ह्या मूल्यांचा आपण धिक्कार करू नये असे निष्पन्न होत नाही. आपल्या नीतिमूल्यांच्या संदर्भात ऐतिहासिक किंवा प्रचलित घटितांचे मूल्यमापन करण्याचा आपला हक्क शिल्लक राहतोच. म्हणून भांडवलशाहीमधली उत्पन्न-वाटपाची व्यवस्था अन्याय्य आहे असे मार्क्सने म्हटले असते तर त्याची काही चूक झाली असती किंवा 'शास्त्रीयत्वा'शी प्रतारणा घडली असती असे समजण्याचे कारण नाही.

खरे म्हणजे टकर ह्यांच्या भूमिकेतच (आणि पर्यायाने मार्क्सच्या भूमिकेत) एक अंतर्विरोध आहे. मार्क्स-पाशी एक नैतिक भूमिका आहे हे टकर ह्यांना मान्य आहे. फक्त तिचे आर्थिक किंवा वितरणात्मक न्यायाशी कर्तव्य नाही इतकेच त्यांचे म्हणणे आहे. नैतिक भूमिका असणे ह्याचाच अर्थ विशिष्ट नैतिक भूमिकेतून वास्तवाचे परीक्षण किंवा मूल्यमापन करणे असा आहे. आता टकर ह्यांच्या सिद्धांताप्रमाणे भांडवलशाही ही जर 'अशिव' गोष्ट आहे असे मार्क्स ठरवीत असेल तर ते कोणत्या आधारे ? कारण भांडवलशाहीतील ( सापेक्ष ) नीतिमूल्यांच्या निकषावर परात्मता अशिव नाही असेही म्हणता येईल. तरीही मार्क्स परात्मतेच्या कारणामुळे भांडवलशाहीला दुष्ट ठरवतो. तेव्हा तो तिचे नैतिकदृष्ट्या मूल्यमापन करतो हे स्पष्ट आहे. भांडवलशाहीत 'वियुक्ती' किंवा 'परात्मता' असेल तर तिचा धिक्कार करणे हे शास्त्रसंमत, पण ती उत्पन्न-वाटपाच्या दृष्टीने अन्याय्य असेल तर तसे म्हणणे मात्र अशास्त्रीय आहे असे कसे म्हणता येईल ?

मार्क्सची सैद्धांतिक भूमिका कोणतीही असो, खरी गोष्ट अशी आहे की, आर्थिक न्यायावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष-पणे मार्क्सने मतप्रदर्शन केलेले आहे. तेव्हा त्या विषयाकडे आपण आता वळू. "कामगार जसजसे संपत्तीचे जास्त उत्पादन करतो तसतसा तो अधिकाधिक गरीब होतो " असे त्याने पॅरिस हस्तलिखितात म्हटले आहे.[३] कम्युनिस्ट जाहीर-नाम्यात म्हटले आहे, "आधुनिक कामगार. . . . कारखानदाराच्या प्रगतीबरोबर चढत जाण्याऐवजी स्वतःच्या वर्गाच्या राहणीच्या पातळीच्या खाली खाली घसरत राहतो. तो भुकेकंगाल [ पॉपर ] बनतो आणि लोकसंख्या आणि संपत्ती ह्यांच्यापेक्षा अधिक वेगाने त्याची भुकेकंगाली वाढते.[४]" **वेज, लेबर अँण्ड कॅपिटल** ह्या पुस्तकात भांडवलशाहीतील वाढत्या विषमतेचे वर्णन मार्क्सने पुढील शब्दांत केले आहे, "घर लहान असो वा मोठे असो, जोपर्यंत आजूबाजूची घरे तितकीच लहान आहेत तोपर्यंत निवासाच्या म्हणून ज्या सामाजिक गरजा असतात त्या सर्व त्याने भागतात. पण त्या घराशेजारी एखादा राजवाडा उभा राहू द्या की ते लहान घर आक्रसून झोपडीवजा झाल्यासारखे वाटते. उत्पादक भांडवलाच्या वेगवान वाढीबरोबर समृद्धी, चैन, सामाजिक गरजा, सामाजिक सुखसोई ह्यांचीही वेगाने वाढ होते. अशा रीतीने कामगाराच्या सुखसोई जरी वाढल्या तरी त्यांमधून मिळणारे सामाजिक समाधान मात्र कमी होते. कारण भांडवलदाराच्या सुखसोई तुलनेने जास्त वाढलेल्या असतात. . . आपल्या वासना आणि सुखे यांचा उगम समाजात होतो, त्यांचे मूल्यमापन आपण सामाजिक दृष्टीने करतो. . . ती सामाजिक स्वरूपाची असतात म्हणून सापेक्ष स्वरूपाची असतात."[५] ह्या परिच्छेदात विषमतेच्या सामाजिक-मानसिक अंगावर मार्क्सने नेमके बोट ठेवले आहे. ह्याच पुस्तकात पुढे हा मुद्दा आणखी अधोरेखित केला आहे: " कामगाराची भौतिक स्थिती सुधारली आहे पण ती त्याच्या सामाजिक पातळीची किंमत देऊन. भांडवलदारापासून त्याला अलग करणारी सामाजिक दरी रुंदावली आहे."[६] **कॅपिटलच्या** पहिल्या खंडात भांडवलशाहीबरोबर शोषण कमी झाले आहे असा दावा करणाऱ्या मेकॉलेची

त्याने चेष्टा केली आहे.[७] मार्क्सच्या 'वाढत्या दैन्या'च्या [ इन्क्रीझिंग मिझरी ] सिद्धांताचा कोणताही (म्हणजे केवल किंवा सापेक्ष) अर्थ केला तरी त्यातून भांडवलशाहीतील वाढत्या विषमतेवरची टीका प्रकट होते.

पण ही एक बाजू झाली. भांडवलशाहीत विषमता असणारच, एवढेच नव्हे तर समतेची मागणी करणेच चूक आहे, असेही त्याने लिहिले आहे. उदा. **व्हॅल्यू, प्राईस अँड प्रॉफिट** ह्या पुस्तिकेत निरनिराळ्या कौशल्यांच्या श्रमांमध्ये वेतनभेद असणारच, सर्वांना सारखेच वेतन ही घोषणा चुकीची, 'वेडेपणाची' आहे असे त्याने म्हटले आहे.[८]

अशा रीतीने भांडवलशाही विषमतेबद्दल मार्क्सचा स्पष्ट निर्वाळा काय हे कळत नाही.

समाजवादाचे काय? **क्रिटीक ऑफ दि गोथा प्रोग्रॅम** ह्या टिपणात समाजवाद हा भांडवलशाहीच्या उदरातून जन्माला आल्यामुळे त्याच्यावर भांडवलशाहीच्या जन्मखुणा राहणार आणि म्हणून विषमताही राहणार असे मार्क्सचे मत आहे. समाजवादात धनाचे वाटप श्रमाच्या प्रमाणात राहणार, जास्त श्रम केले तर जास्त धन, कमी केले तर कमी धन, इत्यादी. आपण किती काम केले ह्याचा दाखला प्रत्येक कामगाराला मिळेल आणि कामाच्या प्रमाणात सामाजिक धनाचा हिस्सा त्या दाखल्याच्या आधारावर त्याला मिळेल. समाजवादात विषमता, 'अन्याय्य' विषमता राहणार असे मार्क्सने म्हटले आहे.[९]

असे असले तरी समाजवादी समाजाचा मार्क्सने ह्या पुस्तकात जो अगदी त्रोटक आराखडा दिला आहे त्यात त्याने एकूण सामाजिक धनापैकी काही भाग शिक्षण, आरोग्य, जे काम करू शकत नाहीत त्यांची सोय, इत्यादी हेतूंसाठी खर्चिला जाईल असे म्हटले आहे. हा भाग प्रचलित (भांडवलशाही) समाजाच्या तुलनेने प्रथमपासूनच मोठा असेल आणि नव्या समाजाचा जसजसा विकास होईल तसतसा तो वाढत जाईल असेही त्याने सांगितले आहे. ह्या विधानांमधून कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे तत्त्व सूचित होते हे लक्षात येईल. म्हणजे समाजवादामधील समतेविषयीचे मार्क्सचे विवेचनही गोंधळात टाकणारे आहे.

तरीही हे खरेच की विषमता-निर्मूलनापेक्षा वेतन-दास्यांचे, वर्ग-संबंधांचे निर्मूलन त्याने अधिक महत्त्वाचे मानले आहे. "वेतनी मजुरांची पद्धत ही गुलामगिरीची पद्धत आहे." हे त्याचे मुख्य सूत्र आहे आणि समतेचा इतका बडिवार करण्याचे कारण नाही असे त्याने म्हटले आहे. एंगल्सनेही म्हटले आहे: "कामगार जेव्हा समतेची मागणी करतात तेव्हा तिचा खरा आशय वर्ग-विहीन समाज असा असतो. ह्यापलीकडे जाणारी समतेची मागणी निश्चितपणे हास्यास्पद बनते."[१०] लेनिन, स्टॅलिन ह्यांनीही ह्याच विचाराची पुनरावृत्ती केली आहे[११].

समाजवादानंतर येणाऱ्या साम्यवादाच्या स्तरातील वितरणात्मक न्यायाची मार्क्सची कल्पना लुई ब्लाँक ह्या फ्रेंच समाजवाद्याने पुरस्कारिलेल्या 'शक्तीप्रमाणे काम आणि गरजेप्रमाणे दाम' ह्या तत्त्वात साकारली आहे.[१२]

ह्या तत्त्वाचा आशय समजून घेण्याचा यत्न करू. हे तत्त्व समतेचे नाही हे स्पष्ट आहे, कारण माणसांच्या काम करण्याच्या शक्ती आणि गरजा सारख्या नसतात. तरीही प्रत्येकाला आपापल्या गरजेइतके मिळावे आणि प्रत्येकाला आपापल्या शक्तीप्रमाणेच काम करण्याचे बंधन असावे, ही व्यवस्था समतेपेक्षाही अधिक 'न्याय्य' आहे हे मान्य करण्यास प्रत्यवाय नसावा. ह्या अर्थाने साम्यवादाचे तत्त्व समतेच्या तत्त्वापेक्षा श्रेष्ठ आहे यात शंका नाही. समतेच्या तत्त्वावर मार्क्सचा फार जोर नाही ह्याचे हेही एक कारण असावे. म्हणजेच मार्क्सच्या मूल्यश्रेणीत साम्यवादी तत्त्व पहिल्या क्रमांकाने येते व समतेचे तत्त्व दुय्यमपणाने येते असे म्हणता येईल.

पण ह्या तत्त्वावर मुख्य आक्षेप असा की ते व्यवहार्य नाही; आपल्याला आपले म्हणून जे जग माहीत आहे त्याला ते लागू नाही. आपले हे जे जग आहे त्यात पूर्ण वैपुल्य या संकल्पनेलाच स्थान असू शकत नाही. कारण गरज हे घटितच सापेक्ष आहे. अर्थशास्त्राच्या प्रत्येक विद्यार्थ्यास हे माहीत आहे की, धन वाढते तशा गरजाही वाढतात आणि गरजा उपलब्ध धनापेक्षा नेहमीच अधिक असतात. म्हणून अर्थशास्त्राचा मूलभूत प्रश्न म्हणजेच टंचाईचा [ स्केअर्सिटी ] प्रश्न समाजाच्या कोणत्याही अवस्थेत शिल्लक राहतोच आणि हा प्रश्न उत्पन्न होतो तो माणसाच्या नेहमीच काही 'आणखी हवे' असण्याच्या मनोवृत्तीतून निर्माण होतो. उत्पादनाची समृद्धी वाढविल्याने तो सुटणारा

नाही. साम्यवादाच्या मांडणीत असे अध्याहृत आहे की गरजांची परिपूर्ती हा तांत्रिक प्रगतीचा प्रश्न आहे, तो मानसिक नाही. मार्क्सच्या एकूण विचारधारणेशी ही मांडणी सुसंगत दिसते. अडचण एवढीच की ती वस्तुनिष्ठ नाही. आपण ज्या जगात राहतो त्यात हे घडून येणार नाही—मनुष्यस्वभाव बदलेपर्यंत. म्हणून अशा एका आदर्श तत्त्वाच्या आधारे समतेचे तत्त्व दुय्यम ठरविणे हा उपक्रम अप्रस्तुत आहे, असे म्हणावे लागते. आपल्या ह्या जगात कुणाच्याच **सर्व** गरजा कधीच भागल्या जाणार नसल्यामुळे उपलब्ध धनाचा वाटा कुणाला किती मिळावा हे ठरवावे लागते. आणि त्या संदर्भात समतेच्या तत्त्वाला पहिला क्रमांक द्यावा लागतो.

समाजवादात किंवा साम्यवादात बौद्धिक आणि शारीरिक श्रम ह्यांमधला फरक नष्ट होईल, सर्व श्रम एका पातळीवर येतील आणि मग वेतनभेदाचे कारण उरणार नाही, अशीही एक विचारधारा मार्क्सवादामध्ये आहे. उदा. मार्क्सने गोथा कार्यक्रमावरील टीकेत असे म्हटले आहे की, बौद्धिक आणि शारीरिक श्रम ह्यांच्यामधील विरोध [ अँटिथीसिस ] समाप्त होईल. लेनिनने म्हटले आहे की, अधिकाऱ्यांचे वेतन सर्वसामान्य कामगाराच्या पातळीवर आणता येईल. पुढे तो म्हणतो, "आधुनिक भांडवलशाहीने व्यवस्थापनाची कार्ये इतकी सुलभ केली आहेत की, साक्षरता असलेला कुणीही दप्तरी कारकून [ फाईल क्लार्क ] सर्वसामान्य कामगाराच्या मजुरीत ती पार पडू शकेल." १९२८ मध्ये कालिनिनने असे म्हटले की, एखादा आचारीसुद्धा सरकार चालवू शकेल. भांडवलशाहीत असे घडून आलेले नाही आणि तांत्रिक विकासाच्या क्रियेत असे काही घडून येईल अशी शक्यता दिसत नाही. ही विधाने अतिरिक्त स्वरूपाची आहेत आणि त्यांचाही गंभीरपणाने विचार करण्याचे कारण दिसत नाही.

मार्क्सची समताविषयक मते आपण पाहिली त्यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते ती अशी की, मार्क्सने समतेचा प्रश्न विचारातच घेतला नाही, त्यावर मतप्रदर्शन केलेच नाही असे दिसत नाही. विषमता त्याला रुचत नाही असा ध्वनी त्याच्या कांही लिखाणात आहे. त्यामुळे मार्क्स वितरणात्मक न्यायाबद्दल नैतिक भूमिका घेत नाही हे टकर ह्यांचे म्हणणे संपूर्णपणे खरे दिसत नाही. 'संपूर्णपणे' असे म्हणण्याचे कारण भांडवलशाही आणि समाजवाद ह्या दोन्हींच्या संदर्भात समतेला छेद देणारी विधानेही येतात. मात्र ह्या दोहोंची संगती लावणे अगदीच अशक्य नाही. असे म्हणता येईल की मार्क्सला मर्यादित स्वरूपातली विषमता मान्य होती, कदाचित अपरिहार्य वाटत होती, मात्र तीव्र विषमतेला त्याचा विरोध होता. मार्क्सवर त्यातल्या त्यात उदार भाष्य करायचे तर हेच करता येईल. मात्र हेही खरे की, एकूण वितरणाचा प्रश्न मार्क्स, एंगल्स, लेनिन, स्टालीन ह्या सर्वांनी गौण मानलेला आहे आणि एवढ्या बाबतीत टकर ह्यांचे म्हणणे खरे आहे.

पण आर्थिक समता-विषमता ह्यासंबंधी मार्क्सने काय म्हटले आहे एवढेच पाहणे पुरेसे नाही. मार्क्सच्या शोषण-संकल्पनेचा विचारही ह्या संदर्भात अगत्याचा आहे. टकर ह्यांच्या मते शोषणाची संकल्पनाही मूल्यरहित आहे. म्हणजेच न्याय-अन्यायाच्या प्रश्नाशी तिचा काही संबंध नाही. हे म्हणणे स्वीकारणे अवघड आहे. एक तर 'शोषण' [ एक्स्प्लॉयटेशन ] हा शब्द मार्क्सपूर्वीही वापरला गेला आहे[१३] आणि तो मूल्यभारित अर्थाने म्हणजे नापसंतीच्या सुरात वापरला गेला आहे. मार्क्सनेही तो मूल्यभारित अर्थाने अनेकदा वापरला आहे. शिवाय मार्क्स शोषणाविषयी लिहितो तेव्हा संतप्तपणे लिहितो हेही नजरेतून सुटण्यासारखे नाही.

ह्याखेरीज आणखीही एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी. मार्क्स काहीही म्हणो मार्क्सचे अनुयायी 'एक्स्प्लॉयटेशन' हा शब्द दूषणवजा वापरतात हे सुप्रसिद्ध आहे. भांडवलदारांची 'रक्तशोषक' [ ब्लडसकर, व्हॅंपायर ] 'जळू' [ लीच ], इत्यादी विशेषणांनी संभावना केली जाते. निरनिराळ्या भारतीय भाषांमधून 'एक्स्प्लॉयटेशन' ह्या शब्दाला कोणते पर्याय वापरलेले आहेत हे मला माहीत नाही. मराठीत तरी त्यासाठी 'शोषण' हा तत्सम किंवा पिळवणूक हा सर्वसामान्य भाषेतला शब्द वापरला जातो. त्यांचा अर्थ एकच आहे पण एक्स्प्लॉयटेशन ह्या मूळ शब्दापेक्षा अधिक गडद अर्थ त्यात आला आहे असे दिसते. शोषून घेणे, पिळून घेणे हे शब्द रक्तशोषण इत्यादी अर्थाच्या जवळचे आहेत. शब्दकोशात 'एक्स्प्लॉयटेशन' ह्या धातूचा अर्थ दुसऱ्या एखाद्या वस्तूला किंवा व्यक्तीला स्वार्थासाठी राबविणे असा दिला आहे.[१४] पण समाजवादी वाङ्मयात तो ज्या गडद किंवा तीव्र अर्थाने आला आहे त्याच अर्थाने तो मराठीतही

आला आहे. ह्या छोटया भाषाशास्त्रीय चर्चेचा इत्यर्थ इतकाच की 'एक्स्प्लॉयटेशन 'ह्या शब्दाची मूल्यभारित, नापसंतीच्या किंबहुना तीव्र नापसंतीच्या अर्थापासून सुटका करू पाहणे व्यर्थ आहे.

म्हणून पुढच्या विभागात मार्क्सच्या शोषण संकल्पनेची काहीशा विस्ताराने चर्चा करण्याचे योजिले आहे.

## २. मार्क्सची शोषण-संकल्पना

मार्क्सवादी विचारसरणीप्रमाणे शोषण हा सर्वच वर्गयुक्त समाजांचा विशेष असतो. पण मार्क्सचे विवेचन प्राधान्याने भांडवलशाही समाजाला अनुलक्षून आहे आणि तेथूनच आपण प्रारंभ करू.

मार्क्सच्या वाङ्मयाचे मी जे काही अवलोकन केले आहे त्यावरून माझ्या असे ध्यानात आले आहे की, त्यातील शोषणाच्या संकल्पनेला विविध छटा आहेत. त्या एकूण चार आहेत अशी माझी भावना आहे आणि आपल्या विचारासाठी आणि टीकेसाठी मी त्या आपणांपुढे मांडीत आहे. एक संकल्पना 'मुख्य' आहे असे म्हणता येईल आणि तिच्यापासून प्रारंभ करून बाकीच्या मी क्रमाने विवेचणार आहे.

भांडवलशाही उत्पादनपद्धतीचे मूलभूत लक्षण म्हणजे वेतनी मजुरांकडून उत्पादनाचे काम करवून घेणे. हे चित्र अधिक स्पष्ट करायचे तर पुढीलप्रमाणे करता येईल. भांडवलशाहीपूर्व अवस्थेत उत्पादक आपल्या उत्पादन-साधनांसमवेत उत्पादनाचे काम करीत. म्हणजे प्रत्येक उत्पादक हा श्रमिक व उत्पादनसाधनांचा मालक अशा दोन्ही भूमिका पार पाडीत असे. उत्पादनसाधने व श्रम ह्यांची ह्या अवस्थेत फाळणी झालेली नव्हती. भांडवलशाहीच्या उदयाबरोबर उत्पादनसाधने एका वर्गाच्या हातात एकटवतात आणि त्या साधनांपासून दुरावलेले लोक केवळ श्रम-शक्तीचे धनी होतात. अशा तऱ्हेने उत्पादनसाधनांची म्हणजेच मालमत्तेची मालकी असणारा एक वर्ग--भांडवलदारांचा वर्ग व ज्याच्याजवळ श्रमशक्ती विकण्याखेरीज उदरनिर्वाहाचे दुसरे काही साधन नाही असा मालमत्तावंचित [ डिसपझेस्ड ] कामगारांचा [प्रोलेटेरियट] दुसरा वर्ग, असे दोन वर्ग अस्तित्वात येतात. मालमत्तादार वर्ग श्रमिकांची श्रमशक्ती विकत घेतो, त्यांचे श्रम आपल्या उत्पादन-साधनांबरोबर वापरतो व तयार होणारे उत्पादन बाजारात विकतो. अशा विशिष्ट तऱ्हेची कार्यविभागणी [ डिव्हीजन ऑफ लेबर ] झालेले उत्पादन म्हणजे भांडवली पद्धतीचे उत्पादन होय.

भांडवलीपूर्व समाजांच्या तुलनेने भांडवली समाजातील श्रमिक वर्ग 'मुक्त' [फ्री] असतो असे मार्क्सचे म्हणणे आहे. ही 'मुक्त'ता दोन अर्थाची असते. एक तर वर म्हटल्याप्रमाणे श्रमिक वर्ग आपल्या उत्पादनसाधनांपासून 'मुक्त' म्हणजे 'वेगळा' झालेला असतो, म्हणजेच त्यांची उत्पादनसाधनांपासून फारकत झालेली असते. दुसरे म्हणजे कायद्याच्या दृष्टीने त्याला निर्णयस्वातंत्र्य असते. म्हणजे काम करणे किंवा न करणे, एका मालकाकडे काम करणे किंवा दुसऱ्या मालकाकडे काम करणे ह्या बाबतीत तो आपल्या विचाराने निर्णय घेऊ शकतो. (कामगार निर्णय घेण्याइतका प्रौढ आहे असेही गृहीतकृत्य ह्यात सूचित आहे.)

उत्पादनाच्या ह्या पद्धतीत वस्तूंची मूल्ये त्यांमध्ये शरीरीभूत [एम्बॉडीड] झालेल्या श्रमांच्या राशीच्या प्रमाणात ठरतात असा मार्क्सचा मूल्यसिद्धांत आहे. ह्यालाच मूल्याचा श्रमसिद्धांत [ लेबर थिअरी ऑफ व्हॅल्यू ] असे म्हणायचे. हा सिद्धांत आपणास सर्वसाधारणपणे परिचित आहे असे गृहीत धरता येत असल्यामुळे व मूल्य-सिद्धांताशी ह्या निबंधात मला प्रत्यक्षतः कर्तव्य नसल्यामुळे त्याच्या अधिक विवेचनात मी शिरत नाही.

हा श्रम-सिद्धांत मार्क्स श्रमिकांच्या मूल्याला म्हणजे 'मजुरी' लाही लावतो. त्याच्या मते भांडवलदार श्रमिकांकडून जी विकत घेतो ती 'श्रमशक्ती' [ लेबर पॉवर किंवा लेबरिंग पॉवर ] होय. श्रमशक्ती म्हणजे श्रम करण्याचे सामर्थ्य. कामगारामध्ये श्रम करण्याची जी शक्ती निर्माण होते ती त्याच्या किमान मानवी गरजा भागल्यामुळे निर्माण होते. म्हणजे श्रमिकाला अन्न पाहिजे, किमान वस्त्रप्रावरण पाहिजे, इत्यादी. येथे दोन गोष्टी मुद्दाम स्पष्ट केल्या पाहिजेत. श्रमिकाचे भरण-पोषण अशा रीतीने झाले पाहिजे की; त्याची शरीरप्रकृती सर्वसाधारणपणे निरोगी व कार्यक्षम अवस्थेत राहील[१५]. दुसरे असे की श्रमिकाबरोबर त्याच्या कुटुंबाचेही पोषण झाले पाहिजे, म्हणजेच श्रमि-

काच्या पुढच्या पिढचाही सर्वसाधारण कार्यक्षम अवस्थेत कामाला मिळतील अशी तरतूद मजुरीमधून झाली पाहिजे[१६]. मजुरीची ही पातळी सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत एकच असली पाहिजे असे मार्क्सचे म्हणणे नाही. मजुरीत एक 'ऐतिहासिक व सांस्कृतिक (मानसिक) घटक' समाविष्ट होतो असे तो सांगतो. देशकाल परिस्थितीमानाने हा घटक बदलता राहतो. पण हा घटक मार्क्सने एकूण गौण मानलेला आहे असे म्हणायला हरकत नाही.

तेव्हा श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे ती श्रमशक्ती अस्तित्वात येण्यासाठी ज्या निर्वाह-वस्तू [ मीन्स ऑफ सब्-सिस्टन्स ] लागतात त्यांचे श्रममूल्य होय. एका कामगारात एका दिवसाची श्रमशक्ती निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या निर्वाह-वस्तू उत्पादन करण्यासाठी जर सहा तासांचे श्रम लागत असतील तर सहा तास ही त्याच्या श्रमशक्तीची किंमत झाली. ही किंमत भांडवलदार कामगाराला देतो. अशा रीतीने कामगाराचे श्रम त्या श्रमाच्या मूल्यानेच खरेदी करण्यात येतात. म्हणजेच श्रम-सिद्धांत मजुरीच्या दरालाही लागू होतो.

मार्क्सला पुढे असे म्हणावयाचे आहे की, भांडवलदार जरी श्रमशक्ती विकत घेतो तरी तिचा **वापर** कसा करायचा हे सर्वस्वी त्याच्या अधीन असते. ह्या ठिकाणी मार्क्स करीत असलेला 'श्रमशक्ती' व 'श्रम' यांमधील भेद लक्षात घेतला पाहिजे. श्रम म्हणजे कामाचे तास किती ठेवावयाचे हे भांडवलदार ठरवितो. तो विकत घेतो ती श्रमशक्ती आणि वापरतो ते कामाचे तास. पूर्वीचे अर्थशास्त्रज्ञ हा भेद करीत नसत आणि श्रम किंवा कामाचे तास विकत घेतले जातात असे समजत असत. श्रमशक्तीची किंमत म्हणजे विनिमय-मूल्य [ एक्स्चेंज व्हॅल्यू ] आणि श्रम म्हणजे उपयुक्तता-मूल्य [ यूस व्हॅल्यू ] अशीही नावे मार्क्सने दिली आहेत. (हा महत्त्वाचा फरक अर्थशास्त्रात आपणच प्रथम केला आहे असा मार्क्सचा दावा आहे.[१७])

वरील उदाहरण पुढे चालवून असे म्हणता येईल की, श्रमशक्ती निर्माण करण्यासाठी सहा तास लागत असले तरी श्रमांचा वापर सहा तासांहून अधिक होऊ शकतो. उदाहरणार्थ, तो बारा तास असू शकेल. आपण असे समजू की कामाचा दिवस बारा तासांचा आहे. मग असे निष्पन्न होते की, कामगार जी वस्तू निर्माण करतो तिच्यात त्याचे बारा तासांचे श्रम समाविष्ट झालेले असतात. त्यामुळे उत्पादित वस्तूचे श्रममूल्य बारा तासांचे असते. अशा तऱ्हेने सहा तासांची किंमत देऊन भांडवलदार बारा तासांचे मूल्य मिळवितो. म्हणजेच ह्या उदाहरणात सहा तासांचा 'वाढावा' किंवा 'अतिरिक्त मूल्य' [ सरप्लस व्हॅल्यू ] निर्माण झाले व ते भांडवलदाराच्या खिशात गेले. हाच भांडवलदाराचा नफा. दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर मजुराचे सहा तास शोषण होते. त्याने केलेल्या एकूण बारा तासांच्या कामापैकी सहा तास काम त्याने स्वतःसाठी म्हणजे स्वतःच्या (व कुटुंबाच्या) उपजीविकेसाठी केले आणि उरलेले मालकासाठी केले. त्याने स्वतःच्या उपजीविकेसाठी जे काम केले त्याचे मोल त्याला मिळाले [ पेड लेबर ]. मालकासाठी जे काम त्याने केले ते मालकाला विनामूल्य मिळाले [ अनपेड लेबर ]. जे मालकाला मिळाले ते 'अतिरिक्त श्रम' [ सरप्लस लेबर ] आणि तेच 'शोषण'.

वर जो हिशेब कामाच्या तासांच्या संख्येत दिला आहे तो पैशाच्या रूपाने दिला तर समजूत अधिक चांगल्या रीतीने पडेल. म्हणून आपण असे म्हणूया की कामगाराला दिवसाची सहा रुपये मजुरी मिळते. ह्याचे कारण त्या सहा रुपयांत त्याला निर्वाहाची साधने म्हणजे श्रमशक्ती निर्माण करणारी साधने मिळू शकतात. मात्र तो जी वस्तू निर्माण करतो तिची बाजारातील किंमत बारा रुपये होते. कारण तीत बारा तासांचे श्रम समाविष्ट झालेले असतात. अशा रीतीने सहा रुपये खर्चात भांडवलदाराला बारा रुपये किमतीची वस्तू निर्माण करून विकता येते. म्हणजे त्याला सहा रुपयांचा वाढावा किंवा नफा मिळतो. कामगाराच्या दृष्टीने पाहिले तर त्याने बारा रुपयांची वस्तू निर्माण केली असली तरी त्याला मजुरी सहाच रुपये मिळालेली असते. म्हणून बारा **उणे** सहा **बरोबर** सहा रुपये ही त्याच्या शोषणाची मात्रा.

फार तपशिलात न जाता मार्क्सचा शोषण-सिद्धांत मी वर ढोबळमानाने सांगितला आहे व आपल्या विवेचनाच्या दृष्टीने तो पुरेसा आहे. आता मार्क्सची जी शोषणाची संकल्पना आहे तिचे एक वैशिष्ट्य सांगून नंतर तिचा नेमका अर्थ काय हे पाहायचे आहे.

मार्क्सच्या मते त्याने केलेला श्रमशक्ती व श्रम किंवा श्रमाचे विनिमय-मूल्य आणि उपयुक्तता-मूल्य ह्यामधील फरक फार मूलभूत स्वरूपाचा आहे. तसे केल्याशिवाय वाढाव्याचा किंवा शोषणाचा सिद्धांत उपलब्धच होत नाही. पूर्वीचे अर्थशास्त्रज्ञ कामगाराला श्रमांचे मूल्य दिले जाते असे समजत. कामगाराला श्रमांचे मूल्य दिले (उदा. बारा तासांचे बारा रुपये) आणि त्याने उत्पादित केलेली वस्तूही श्रममूल्यानेच (बारा तास–बारा रुपये) विकली तर उत्पादनखर्च=एकूण प्राप्ती असा निष्कर्ष निघतो. यात नफा राहात नाही. म्हणजे कामगारांना श्रमांचे मूल्य मिळते असे गृहीत धरले म्हणजे श्रममूल्यसिद्धांताच्या चौकटीत नफा किंवा वाढावा निष्पादित करता येत नाही. नफा कसा निर्माण होतो हे सांगण्यासाठी मक्तेदारी, भांडवलदाराची लबाडी इत्यादी गृहीतकृत्यांचा आधार घ्यावा लागतो. पण अशी गृहीतकृत्ये करणे म्हणजे कामगाराचे श्रम त्याच्या श्रममूल्यापेक्षा कमी किमतीने विकत घेणे किंवा वस्तू त्यांच्या श्रममूल्यापेक्षा अधिक किमतीने विकणे असा अर्थ होतो. म्हणजेच विवेचन श्रम-सिद्धांताला विरोधी होते. दुसरे असे की प्रत्येकजण आपल्या वस्तूची किंमत जास्त लावू शकत नाही. एकाला श्रममूल्यापेक्षा जास्त किंमत मिळणे ह्याचा अर्थ दुसऱ्याला कमी मिळणे असा आहे. म्हणजेच एकाला नफा मिळाला तर दुसऱ्याचा तोटा होतो असा ह्याचा अर्थ. थोडक्यात सबंध भांडवलदारवर्गाचा नफा अशा प्रकारच्या सिद्धांतातून स्पष्ट होत नाही. फसवाफसवी, लबाडी, मक्तेदारी इत्यादींपासून पूर्ण स्पर्धेच्या अवस्थेतही वाढावा निर्माण होतो आणि शोषण संभवते असे मार्क्सचे म्हणणे आहे.[१८] हेच म्हणणे निराळ्या भाषेत सांगायचे तर असे म्हणता येईल की मार्क्सच्या सिद्धांतानुसार शोषण **विनिमयाच्या** प्रक्रियेत म्हणजेच वस्तूंच्या किंवा सेवांच्या देवघेवीच्या क्षेत्रात निर्माण होत नाही तर **उत्पादनाच्या** क्षेत्रात निर्माण होते. मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे कामगाराला त्याच्या श्रमशक्तीचे योग्य मूल्य म्हणजे श्रममूल्य मिळते आणि भांडवलदारालाही त्याने निर्माण केलेल्या वस्तूंचे योग्य मूल्य म्हणजेच श्रममूल्य मिळते. अशा तऱ्हेने विनिमयाच्या क्षेत्रात सर्व मूल्ये श्रमसिद्धांतानेच ठरतात. तरीही शोषण घडते आणि वाढावा निर्माण होतो. केवळ विनिमय-प्रक्रियेतूनही शोषण उत्पन्न होते असे दाखविण्याचा प्रयत्न मार्क्सनंतरच्या विचारवंतांनी केला.[१९] पण मार्क्स स्वतः विनिमय-प्रक्रियेतून शोषण निर्माण होण्याची शक्यता अट्टाहासाने नाकारतो.[२०]

हे मार्क्सचे मुख्य विवेचन आहे. शोषणाच्या मार्क्सच्या संकल्पनेचे मर्म सारभूत स्वरूपात सांगायचे तर इतकेच सांगता येईल की, मजुराची श्रमशक्ती पैदा होण्यासाठी जितके कामाचे तास लागतात त्याहून अधिक तास काम तो करू शकतो. त्याच्या मजुरीपेक्षा त्याच्या उत्पादनाचे मूल्य जास्त असते.

मार्क्सचा शोषणाचा मुख्य सिद्धांत म्हणून जो सांगितला त्याच्याकडे सुरुवातीला एक दृष्टिक्षेप टाकून काय आढळते ते बघू. मार्क्सच्या मते भांडवलदार श्रमशक्ती विकत घेतो आणि श्रम किंवा कामाचे तास वापरतो. श्रमशक्ती म्हणजे 'लेबर पॉवर किंवा लेबरिंग पॉवर' म्हणजे 'कपॅसिटी टु लेबर' असा अर्थ मार्क्सने दिला आहे. 'कपॅसिटी' म्हणजे कमाल शक्ती, काम करण्याची कामगाराच्या अंगी असलेली अधिकात अधिक शक्ती असाच अर्थ केला पाहिजे. आपण असे समजू की, दिवसाच्या चोवीस तासांतले बारा तास कामगाराला झोप, शारीरक्रिया, करमणूक, घरकाम, कौटुंबिक किंवा सामाजिक व्यवहार यासाठी लागतात. हे सर्व हवे याचे कारण दुसऱ्या दिवशी कामावर येताना धडधाटक अवस्थेत आणि ताजातवाना होऊन तो कामावर आला पाहिजे. उरलेले बारा तास तो काम करण्यासाठी मोकळा आहे. म्हणजे त्याची काम करण्याची अधिकात अधिक शक्ती—लेबर पॉवर—बारा तास आहे असे ठरले. असे असेल तर श्रमांचा वापर तेरा तास होऊ शकणार नाही. तो एखाद्या वेळी बारा तासांपेक्षा कमी होईल पण जास्त होणार नाही. जेव्हा एखादा कामगार शरीरप्रकृतीने सर्वसाधारण अवस्थेत राहून आपल्या कुटुंबाचे व मुलाबाळांचे तशाच स्थितीत पोषण करून बारा तासांचे काम निर्वेधपणे करू शकतो तेव्हा तितके तास काम करताना त्याला कसलाही अपाय होत नाही, त्याला कसलीही 'वास्तव किंमत' [ रिअल कॉस्ट ] द्यावी लागत नाही असा ह्याचा अर्थ होतो. मग सहा तास किंमतीची मजुरी देऊन सात, दहा किंवा जास्तीत जास्त बारा तास काम त्या बदल्यात घेण्यात आले तर एक, चार किंवा सहा तास 'शोषण' झाले असे म्हणायचे ते कोणत्या अर्थाने ?

स्वतः मार्क्सनेच ह्या संदर्भात काय म्हटले आहे ते पाहूया.

"एका बाजूला, श्रमशक्तीचा एका दिवसाचा पुरवठा अर्ध्या दिवसाच्या खर्चात उपलब्ध होतो आणि

दुसऱ्या बाजूला तीच श्रमशक्ती सबंध एक दिवस काम करू शकते, परिणामी तिच्या वापरामुळे एका दिवसात जे मूल्य निर्माण होते ते भांडवलदाराने त्या वापरासाठी दिलेल्या पैशाच्या दुप्पट असते. ही गोष्ट म्हणजे त्याच्या (भांडवलदाराच्या) दृष्टीने पाहिले तर तो त्याच्या नशिबाचा भाग [ ए पीस ऑफ गुडलक ] आणि विक्रेत्याच्या (कामगाराच्या) दृष्टीने पाहिले तर तीत त्याला काही अपाय [ इंजरी ] नाही, असे नि:संशयपणे म्हणता येते."[२१]

हेच अवतरण टकर ह्यांनी उद्धृत केले आहे आणि मार्क्सची शोषणाची संकल्पना मूल्यरहित [ न्यूट्रल ] आहे असा निष्कर्ष काढला आहे. कामगाराला 'अपाय' नाही किंवा त्याच्यावर 'अन्याय' (—हा शब्द एंगल्सने वापरला आहे—) नाही असे मार्क्स व एंगल्स स्वत:च म्हणत असताना शोषण ही संकल्पना नापसंती व्यक्त करते असे कसे म्हणावे, असा प्रश्न टकर उपस्थित करतात.

टकर ह्यांना आपल्या मताच्या समर्थनार्थ आणखीही एक पुरावा देता येईल असे वाटते. तो असा की, आपले शोषण होते आहे, आपल्यावर अन्याय होतो आहे ह्याची कामगाराला जाणीव नसते असे संसूचनही मार्क्सच्या विवेचनातून निघते. मार्क्सचे विवेचन असे आहे की, भांडवलशाहीपूर्व समाजातही शोषण होत असे आणि भांडवलशाही समाजातही ते होते. मात्र भांडवलीपूर्व समाजात ते स्पष्टपणे दृग्गोचर होत असे, उलट भांडवली समाजात ते अधिक सूक्ष्मपणे (कामगाराच्या ध्यानात न येता) घडत राहाते आणि ह्यामुळे भांडवलशाही शोषण अधिक ढोंगीपणाचे आहे असा मार्क्सचा दावा आहे. ते ढोंगीपणाचे आहे की नाही हा प्रश्न प्रस्तुत संदर्भात आपल्या दृष्टीने महत्त्वाचा नाही; शोषिताला ते कळत नाही हे मार्क्सचे संसूचन मात्र आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

हे कसे घडते हे मार्क्सने पुढीलप्रमाणे विशद केले आहे : भूदास पद्धतीत श्रमिक आपल्या स्वत:च्या जमिनीवर आठवड्यातले काही दिवस काम करतो व काही दिवस सरंजामदाराच्या [ 'लॉर्ड'च्या ] शेतावर विनामूल्य काम करतो. तो स्वत:च्या शेतावर जे श्रम करतो त्यातून त्याला त्याच्या निर्वाहाच्या वस्तू मिळतात. मालकाच्या शेतावर जे तो श्रम करतो त्याचे सगळे मूल्य मालकाला मिळते. तीन दिवस घरच्या शेतीत आणि तीन दिवस मालकाच्या शेतीत अशी स्पष्ट विभागणी ह्या पद्धतीत असल्यामुळे आपण तीन दिवस मालकासाठी काम करतो, स्वत:साठी नाही, हे भूदासाच्या स्पष्टपणे ध्यानात येते. त्याला आपले शोषण होत आहे, आपले श्रम मोल न देता वापरले जात आहेत हे कळत असते, थोडक्यात त्याला शोषणाची जाणीव असते.

गुलामपद्धतीत तर दुसऱ्या टोकाचा प्रकार आहे. गुलाम सर्वच श्रम मालकासाठी करतो असे वरवर पाहता दिसते. वास्तविक तो बारा तास काम करीत असेल तर त्यातले सहा तास तो स्वत:च्या उपजीविकेसाठी राबत असतो. म्हणजेच तो गुलाम नसता तरी सहा तास त्याला स्वत:च्या उपजीविकेसाठी श्रम करावेच लागले असते. म्हणजे बारा तास मालकाकडे काम केल्यामुळे बारा तास त्याचे शोषण होते असा भास निर्माण होतो, मात्र खरे शोषण सहा तासांचेच असते.[२२]

भूदासपद्धती आणि दासपद्धती ह्यांच्याशी तुलना करता भांडवलदारी पद्धतीत मात्र कामगाराला आपल्याला आपल्या श्रमांचे संपूर्ण मूल्य मिळाले आहे असे वाटत असते. वस्तुत: संपूर्ण श्रमांचे मूल्य त्याला मिळाले नसून सहा तासांचेच मिळालेले असते; आपले शोषण होत आहे ह्याची त्याला जाणीव नसते, असा मार्क्सच्या विधानांचा अर्थ करता येईल.

पुन्हा मघासारखाच प्रश्न निर्माण होतो. ज्या परिस्थितीत शोषणाची बोचरी जाणीवच नाही तीत शोषण होत आहे असे कसे म्हणायचे ?

कामगाराला शोषणाची जाणीव असो किंवा नसो, वस्तुनिष्ठ दृष्ट्या पाहिले तर त्याचे शोषण घडतच असते असा एक युक्तिवाद करता येईल.

उदाहरणार्थ, असे म्हणता येईल की, श्रमिकाला त्याच्या उदरनिर्वाहासाठी सहाच तास लागतात आणि तो बारा तास काम करतो. हे कसे घडते ? तर त्याच्याजवळ उत्पादनसाधने नाहीत, ती आहेत भांडवलदारवर्गाकडे. आपली उपजीविका मिळविण्यासाठी त्याला भांडवलदारावर अवलंबून राहावे लागते आणि ह्या परिस्थितीचा फायदा

घेऊन भांडवलदार त्याला बारा तास राबवितो आणि अतिरिक्त मूल्य मिळवितो. म्हणजे उत्पादनसाधने श्रमिकाच्या मालकीची असती तर त्याला आपल्या निर्वाहासाठी सहाच तास काम करावे लागले असते. मग असे म्हणता येईल की, श्रमिकाच्या दोन स्थितींची (म्हणजे उत्पादनसाधनसहित आणि उत्पादनसाधन-विरहित) तुलना करता एकीपेक्षा दुसरीत त्याला अधिक काम करावे लागते. बारा तासांची श्रमशक्ती त्याच्याकडे आहे म्हणजे तो बारा तास काम करू शकतो हे खरे असले तरी ज्या ठिकाणी सहा तास काम पुरेसे झाले असते त्या ठिकाणी तो बारा तास काम करतो, म्हणजे सहा तासांचा संभाव्य विरंगुळा [ लीजर ] तो गमावतो हे सत्य उरतेच आणि त्या अर्थाने त्याचे शोषण वस्तुनिष्ठ दृष्टया घडतेच.

हे स्पष्टीकरण स्वीकारण्यात एक अडचण उद्भवते आणि ती अडचण मार्क्सवादीच आहे. जेव्हा उत्पादन-साधने कामगाराच्या मालकीची असतात ती अवस्था भांडवली-पूर्व समाजरचनेची असते. उत्पादनसाधनांचे मालक व उत्पादनसाधनविरहित मजूर असे दोन स्पष्ट वर्ग उद्भवतात त्यावेळी भांडवलशाही आलेली असते. आणि मार्क्स-वादी सिद्धांताप्रमाणे उत्पादनतंत्रात [ फोर्सेस ऑफ प्रोडक्शन ] बदल झाल्याशिवाय उत्पादनसंबंधात [ रिलेशन्स ऑफ प्रोडक्शन ] बदल होत नाही. भांडवलीपूर्व लघुप्रमाण वस्तु-उत्पादनव्यवस्थेतून [ पेटी कमोडिटी प्रोडक्शन ] भांडवली व्यवस्थेत संक्रमण होताना तंत्र बदललेले असले पाहिजे, ते जास्त उत्पादक झाले असले पाहिजे. म्हणजे भांडवली व्यवस्थेत जी उत्पादनसाधने अस्तित्वात आहेत त्यांच्यामुळे आज सहा तासांत उपजीविका मिळविता येते. पण भांडवलीपूर्व अवस्थेत, म्हणजेच मागास तंत्राच्या कारकिर्दीत सहा तास श्रम करून उपजीविका मिळाली असती असे म्हणता येणार नाही. त्या अवस्थेत उपजीविकेसाठी कदाचित बारा तासच श्रम करावे लागले असते. म्हणजे दोन्ही अवस्थांत कामगार बारा तासच काम करीत असल्यामुळे त्याचा विरंगुळा हिसकावून घेतला जातो असे म्हणता येत नाही. होते ते एवढेच की आताच्या बारा तासांत तो पूर्वीपेक्षा दुप्पट उत्पादन करू शकतो. म्हणजे सुधारलेल्या तंत्रामुळे त्याची उत्पादनशक्ती वाढलेली असते आणि म्हणून उदरनिर्वाहाची साधने वजा जाता समाजात 'आधिक्य' किंवा 'वाढावा' निर्माण होतो.

तेव्हा टकर यांचेच म्हणणे खरे ठरते असे वाटेल. पण शोषणाचा मूल्यभारित अर्थ ज्यामधून निघतो असे एक भाष्य केले गेले आहे आणि तेच यथार्थ आहे असे मला वाटते.

ते भाष्य असे की सर्व मूल्य (किंवा उत्पादन[२३]) केवळ कामगारांच्याच श्रमामधून निर्माण होते तरी ते सगळेच्या सगळे त्यांच्या पदरात पडत नाही, त्यातला काही भागच त्यांना मिळतो. कामगारांनी जे निर्माण केले आहे त्या सगळ्यावर त्यांचाच, म्हणजे कामगारवर्गाचाच हक्क आहे असे यात गृहीत आहे.

सर्वच उत्पादन कामगार तयार करतो असे मार्क्सचे गृहीत आहे असे का म्हणायचे ? तर इतर उत्पादनघटक मूल्य उत्पादनात सहभागी होत नाहीत म्हणून नव्हे, तर इतर घटकांचे म्हणजे जमीन, भांडवल यांचे मालक कसलेही श्रम न करता खंड, नफा, व्याज इत्यादी उत्पन्ने केवळ मालकी हक्काच्या अधिकारातून घेतात म्हणून. हे वर्ग काम करणारे नाहीत, उत्पादक कामात त्यांचा सहयोग नाही, असे मार्क्सचे मत आहे. हे मत बरोबर की चूक हे तपासण्याचे येथे कारण नाही. मार्क्सला शोषण म्हणताना काय अभिप्रेत आहे एवढेच आपणाला पाहायचे आहे. स्पष्ट दिसते ते असे की, मार्क्सच्या मते केवळ श्रमानेच संपत्ती निर्माण होते आणि म्हणून तीवर कामगारवर्गाचाच हक्क आहे.

हे भाष्य डॉब, स्वीझी ह्यासारखे मार्क्सवादी नाकारतात.[२४] त्याचे कारण असे दिसते की 'श्रमाच्या संपूर्ण उत्पादनावर हक्क' [ राइट टु दि होल प्रोडयुस ऑफ लेबर ] हे सूत्र मार्क्सपूर्वीच्या रिकार्डियन समाजवाद्यांनी[२५] आपल्या विचारसरणीचा आधार म्हणून स्वीकारले होते. विल्यम थॉमसन (१७८५–१८३३) ह्याने म्हटले होते : 'श्रमाशिवाय संपत्ती नाही', 'श्रम हाच संपत्तीचा एकमेव जनक आहे'. टॉमस हॉजस्किन (१७८३–१८६९) ह्याचे असेच प्रतिपादन आहे. जे. एफ. ब्रे, ग्रे यांचेही हेच सूत्र आहे. मार्क्सचा विरोधक रॉडबर्टस् (१८०५–१८७५) ह्यानेही 'सर्वच वस्तू श्रमातून आणि केवळ श्रमातून निर्माण होतात' असे म्हटले आहे. प्रूद्वाँ, फर्डिनंड लासाल ह्या मार्क्सविरोधात असणाऱ्या विचारवंतांची धारणाही अशीच होती.

डॉब ह्यांनी **क्रिटीक ऑफ पोलिटिकल इकॉनमी**-मधील मार्क्सचे पुढील वाक्य उद्धृत केले आहे : "श्रम

हाच सर्व संपत्तीचा मूलस्रोत आहे हे म्हणणे चूक आहे." पण मार्क्स व एंगल्स ह्यांची ह्याविरुद्ध अर्थाची वाक्येही काढून दाखविता येतील. उदाहरणार्थ, **कॅपिटल** ग्रंथाच्या पहिल्या खंडातील एका पदटीपेत चेरब्युलिज ह्या लेखकाचे जे वाक्य मार्क्सने उद्धृत केले आहे त्यात श्रमाच्या सर्व संपत्तीवरील हक्काचा पुरस्कार आहे.[२६] एंगल्सने मार्क्सच्या **वेज लेबर अँड कॅपिटल** ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत "केवळ कामगारवर्गच सर्व मूल्यांचे उत्पादन करतो" असे म्हटले आहे.[२७]

पण एरव्हीही मार्क्सच्या शोषणसंकल्पनेचा योग्य अर्थ काढायचा तर हेच गृहीत कृत्य मानले पाहिजे. मार्क्स-विषयी सहानुभूतीपर विचार करणाऱ्या जोन रॉबिन्सन, शुंपीटर ह्या लेखकांनीही हाच अर्थ काढला आहे.[२८] शुंपिटरने तर मार्क्सचे 'रिकार्डियन समाजवाद्यांमधला सर्वांत थोर' असे वर्णन केले आहे.

म्हणजे मार्क्सच्या शोषणविषयक संकल्पनेतून आर्थिक न्यायाचे एक तत्त्व उपलब्ध होते ते म्हणजे कुणाला अनर्जित उत्पन्न मिळू नये, समाजाने ऐतखाऊंना पोसू नये. याचबरोबर हेही ध्यानात येते की, शोषण-संकल्पना मूल्यरहित नसून मूल्ययुक्त आहे.

मार्क्सचे शोषणाचे मुख्य विवेचन म्हणून जे वर सादर केले आहे त्यापुरतीच शोषणाची संकल्पना मर्यादित नाही. **कॅपिटल** ग्रंथाच्या पहिल्या खंडात कामगारांच्या, कामाच्या तासांच्या प्रश्नाला वाहिलेले 'दि वर्किंग डे'ह्या नावाचे एक सबंध प्रकरण (प्र. १०) आहे आणि त्यातही शोषणाचे एका वेगळया दृष्टिकोणातून वर्णन केले आहे. वरच्या विवेचनातून शोषणाचा जो अर्थ निष्पन्न होतो असे आपण पाहिले त्याहून वेगळ्या प्रकारचा अर्थ उपरोल्लिखित प्रकरणातून निष्पन्न होतो असे मला दाखवायचे आहे. (दुसरा अर्थ पहिल्या अर्थाशी आणि पर्यायाने श्रमसिद्धांताशी सुसंगत नाही ही माझी शंका मी परिशिष्टात मांडली आहे.)

भांडवलदार लोभाने प्रवृत्त होऊन कामगाराचे कामाचे तास वाढविण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणून आठ, दहा, बारा, चौदा, सोळा किंवा अठरा तासांचाही कामाचा दिवस कुठेकुठे दिसून येतो, असे मार्क्सने म्हटले आहे [२९]. किंबहुना याहीपलीकडच्या कामाच्या तासांची अंगावर शहारे आणणारी उदाहरणे मार्क्सने दिली आहेत. उदाहरणार्थ, कुठे सात वर्षाच्या मुलाला पंधरा तास काम करावे लागते. एका ठिकाणी बारा ते पंधरा या वयोगटातील मुलांना सकाळी सहा वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चार वाजेपर्यंत म्हणजे चौतीस तास कामाला लावल्याचे उदाहरण आहे. ह्या सलग चौतीस तासांत फक्त जेवणाची काही सुट्टी आणि मध्यरात्री दीड तास झोप एवढीच काय ती विश्रांती. मेरी ॲन वॉकले ह्या वीस वर्षांच्या मुलीला २६½ सात सलग काम करून कोंदटलेल्या खोलीत श्वासोच्छ्वासालाही पुरेशी हवा नाही अशा अवस्थेत मृत्यू आला. छत्तीस, पन्नास तास काम अशीही उदाहरणे मार्क्सने दिली आहेत.

कामाचा दिवस अशा रीतीने ताणण्याच्या प्रयत्नाचे काय परिणाम होतात ह्याचेही दिग्दर्शन मार्क्सने केले आहे. उदा. मेरिलिबोनमध्ये लोहारकाम करणाऱ्यांचा मृत्युदर दरसाल दरहजारी ३१ म्हणजे प्रौढ पुरुष कामगारांच्या मृत्युदराच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा (२०) अकराने अधिक आहे.[३०] कुंभारकाम करणाऱ्यांमध्ये श्वसनविषयक रोगांचे प्रमाण फार वाढले आहे. त्यांची प्रत्येक उगवती पिढी अधिकाधिक रोगट आणि खुजी बनत चाललेली आहे.[३१] थोडक्यात भांडवलशाहीमुळे श्रमशक्तीच अकाली संपुष्टात येऊन ती मृत्युपंथाला लागते.[३२] हा सर्व प्रकार गुलामीलाही लाज आणणारा आहे. ज्या ज्या देशांमध्ये भांडवलशाही विकसित झाली आहे त्या त्या देशांत कामगारवर्गाची शरीर-प्रकृती ढासळली आहे आणि क्षांत झाली आहे असे मार्क्सने म्हटले आहे.[३३] ज्याला 'पिळवणूक' हे नाव यथार्थतेने देता येईल असा, कामगाराच्या शरीरातील जणूकाही शेवटचा रक्तबिंदू शोषून घेणारा, हा शोषणाचा प्रकार आहे.

आपल्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट अशी की, कामगाराच्या शरीराला अतिश्रमाने होणारी प्रत्यक्ष इजा असा येथे शोषणाचा अर्थ आहे. ह्यात कामगाराला वास्तव किंमत द्यावी लागते आणि अर्थातच ह्या शोषणाची त्याला जाणीव असते असे म्हणावे लागते.

× × ×

ज्यांना मार्क्सने शोषण म्हटलेले नाही पण जे शोषण–सदृशच आहेत असे आणखी दोन प्रकार मार्क्समध्ये सापडतात. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय शोषणाची चर्चा पूर्ण होणार नाही.

एक संकल्पना पुढीलप्रमाणे आहे : भांडवलदार-वर्ग आणि कामगार-वर्ग हे परस्पर-संघर्षात असलेले दोन वर्ग आहेत. मात्र भांडवलदार-वर्ग संघटित असतो, उलट कामगार-वर्ग असंघटित व विस्कळित असतो. १८४४ च्या हस्तलिखितात मार्क्सने हे पुढीलप्रमाणे मांडले आहे :

"भांडवलदारांमधील संघटन [ कँबिनेशन ] ही नित्याची गोष्ट असते आणि ते प्रभावी असते, उलट कामगारांच्या संघटनाला बंदी असते आणि (त्यांनी संघटन केलेच तर) त्यांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात."[३४]

ह्या प्रतिपादनात भांडवलदारांची सौदाशक्ती [ बार्गेनिंग पॉवर ] कामगारांपेक्षा जास्त असते असे सूचित केले आहे. ह्यातील गृहीत असे असावे की, भांडवलदार कामगाराशिवाय जगू शकतो, निदान बराच काळ तग धरू शकतो, उलट कामगार मात्र भांडवलदाराशिवाय फार वेळ जगू शकणार नाही. उदाहरणार्थ, एंगल्सने म्हटले आहे :

"कामगार असहाय आहे, स्वतःच्या बळावर तो एकही दिवस जगू शकणार नाही." [३५]

ह्या विषम द्वंद्वाचा परिणाम म्हणून मजुरीची पातळी खाली ठेवली जाते असे मार्क्स किंवा एंगल्स ह्यांनी कुठे स्पष्टपणे म्हटले आहे की नाही हे मला माहीत नाही. पण तसा परिणाम होईल आणि मजुरी निर्वाहपातळीच्या खाली जाऊ शकेल हे स्पष्ट आहे.

दुसरा प्रकार पुढीलप्रमाणे मांडता येईल. भांडवलशाहीत श्रमाला जी मागणी असते तीहून त्याचा पुरवठा नेहमीच जास्त असतो ही मार्क्सची आणखी एक विचारधारा आहे. हस्तलिखितात ह्या विचाराचे प्रतिबिंब पुढीलप्रमाणे पडले आहे :

"काम मिळाले तर कामगार स्वतःला नशीबवान समजतो."[३६]

"कामगाराला काम मिळविण्यासाठी झगडावे लागते." [३७]

पुढे ही संकल्पना एंगल्सच्या **कंडिशन्स ऑफ दि वर्किंग क्लास** ह्या पुस्तकात[३८] आणि मार्क्सच्या **कॅपिटल** मध्ये कामगारांच्या 'राखीव दला'च्या [ रिझर्व आर्मी ] किंवा 'सापेक्ष अतिरिक्त लोकसंख्ये'च्या [ रिलेटिव्ह सरप्लस पॉप्युलेशन ] सिद्धांताच्या स्वरूपात प्रकट होते. हे राखीव दल निर्माण होण्याची प्रक्रिया अशी की, भांडवलशाहीच्या विकासाच्या ओघात यांत्रिकीकरणाचे प्रमाण वाढत जाऊन तज्जन्य बेकारी वाढत जाते. व्यवसायाच्या तेजी-मंदीप्रमाणे ही बेकारी कमीजास्त होते असे मार्क्स म्हणतो हे खरे, पण हे राखीव दल कधीही सर्वस्वी रोजगारात गुंतून पडत नाहीत.

बेकार कामगारांचे हे राखीव दल सारखे उपस्थित असल्यामुळे मजुरीचा दर तिच्या मूल्यापेक्षा खाली जातो असे मार्क्सने म्हटले आहे.

"राखीव दलाच्या पुरात श्रमविपणि [ लेबर मार्केट ] बुडून जाते आणि श्रमशक्तीची किंमत [ प्राईस ] त्याच्या मूल्याच्या खाली घसरते."[३९]

शोषणाचे हे जे दोन प्रकार सांगितले त्यांचे उगम भिन्न असले तरी परिणाम एकच आहे, तो म्हणजे मजुरी निर्वाहाच्या पातळीच्या खाली जाण्याचा. आपण दारिद्र्याची व्याख्या किमान निर्वाह पातळीच्या खालची राहणी असा करतो. त्या अर्थाने मार्क्स येथे दारिद्र्यसंकल्पनेच्या जवळ येतो असे म्हटले पाहिजे. ह्या संकल्पनेतही कामगाराला वास्तव किंमत भरावी लागते आणि त्याला शोषणाची जाणीव होते असे म्हणावे लागेल. (ह्या शेवटच्या दोन संकल्पनांचीही मार्क्सच्या श्रमसिद्धांताशी संगती लागत नाही हे परिशिष्टात विशद केले आहे.)

मात्र मार्क्सवादात जिला सैद्धांतिक दर्जा आहे ती शोषणाची संकल्पना म्हणजे जिला आपण 'मुख्य' संकल्पना असे नाव दिले आहे ती.

शोषणाच्या सर्व मार्क्सीय संकल्पना एकत्र करून विचार केला तर आर्थिक न्यायाच्या दृष्टीने काय निष्पन्न होते हे सारांशाने सांगितले पाहिजे. मुख्य संकल्पना म्हणून जी सांगितली तिचा अर्थ समाजात अनर्जित उत्पन्न कुणाला

मिळू नये असा आहे. दुसऱ्या संकल्पनेत अतिश्रमामुळे कामगाराच्या शरीरस्वास्थ्यावर होणारे दुष्परिणाम सूचित आहेत. शोषणाच्या तिसऱ्या आणि चवथ्या संकल्पनेत गरिबी ह्या संकल्पनेला स्पर्श होतो. पण मार्क्सच्या एकूण शोषणविषयक लिखाणात तिला मध्यवर्ती स्थान नाही. (शिवाय तिसरी म्हणून जी संकल्पना मी दिली आहे तिचा संदर्भ मार्क्सच्या अगदी प्रारंभीच्या लिखाणाचा दिला आहे. मार्क्सच्या परिपक्व वयातील लेखनात तिचे प्रतिबिंब पडलेले आहे की नाही ह्याचा मी शोध घेतलेला नाही.)

× × ×

जिला शोषण म्हणता येणार नाही पण जी शोषणाशी संलग्न आहे अशीही एक संकल्पना मार्क्समध्ये आहे, तिचा विचार आता केला पाहिजे. ही संकल्पना म्हणजे 'गुलामगिरी'ची, 'वेतनदास्या'ची [ 'वेज स्लेव्हरी' ] संकल्पना होय.

मार्क्सच्या १८४४ च्या हस्तलिखितातच वेतन-दास्याचा विचार मांडलेला आहे आणि ह्या ना त्या प्रकारे मार्क्स व एंगल्स ह्यांच्या लिखाणात पुढेही त्याचा प्रतिध्वनी उमटत राहिलेला आहे. हस्तलिखितामध्ये एक प्रकरण 'परात्मभूत श्रम' [ एलियनेटेड लेबर ] ह्या विषयावर आहे. परात्मभावाची किंवा 'तुटलेपणा'ची संकल्पना बहुवंशी आहे, त्याचे अनेक प्रकार मार्क्सने नोंदले आहेत. त्यातील एक प्रकार वेतन-दास्याचा आहे. ह्यात श्रमिक वर्ग हा भांडवलदारवर्गाच्या मानाने 'कनिष्ठ' [ सबॉर्डिनेट ] आहे, भांडवलदारवर्ग म्हणजे 'गुलामांचा वर्ग' [ स्लेव्ह क्लास ] आहे, कामगाराचे श्रम म्हणजे 'सक्तीचे श्रम' [ फोर्स्ड लेबर ] असतात, अशी किंवा अशा प्रकारची विधाने आहेत. थोडक्यात भांडवलशाहीने कामगाराचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे, त्याला पराधीन आणि लाचार केले आहे, असा वेतनदास्याचा अर्थ आहे.

किंबहुना वेतन-दास्य हे मध्ययुगातील भूदासाचे दास्य किंवा गुलामी समाजातील गुलामाचे दास्य यापेक्षाही भयानक आहे असेही मार्क्सीय वाङ्मयात म्हटले आहे. फरक इतकाच आहे की, भांडवलशाहीत काम करण्याचे वा न करण्याचे स्वातंत्र्य आहे, आपला भांडवलदार कोणता असावा ह्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र हे स्वातंत्र्य 'औपचारिक' [ फॉर्मल ] आहे, 'खरे' [ रिअल ] नाही, तो वरवरचा 'देखावा' [ ॲपिअरन्स ] आहे असे त्यांनी जागोजाग म्हटले आहे. एंगल्सने कामगाराला काही 'खरे स्वातंत्र्य' असल्याची जाताजाता कबुली दिली आहे,[४०] पण त्याचाही मुख्य जोर गुलामीवरच आहे. उदाहरणार्थ, एंगल्सची पुढीलप्रमाणे काही विधाने आहेत :

> "कामगार हा कायद्याने आणि वस्तुस्थितीतही त्याच्या जीवनमरणावर सत्ता चालविणाऱ्या भांडवलदार वर्गाचा गुलाम आहे."[४१]
>
> "एक तर भांडवलदाराने घातलेल्या अटी पाळाव्यात नाहीतर उपास काढावेत, थंडीने गारठून मरावे किंवा जंगली जनावरांमध्ये जाऊन विवस्त्र झोपावे. फारच छान स्वातंत्र्य !"[४२]
>
> "पूर्वीच्या सरळसरळ गुलामीशी तुलना करता फरक इतकाच की, आजचा कामगार एकदम सगळा विकला जात नाही, तो तुकड्या-तुकड्याने विकला जातो...तो एका विशिष्ट मालकाचा गुलाम बनत नाही पण संपूर्ण मालमत्ताधारी वर्गाचा गुलाम बनतो."[४३]

ही गुलामी पूर्वीच्या अर्थव्यवस्थांतील गुलामीपेक्षा सूक्ष्म आहे. रोमन गुलाम साखळदंडांनी बांधलेला असे, कामगारवर्गाला बांधणारे दोर अदृश्य आहेत. ह्या मुद्याचा परामर्श मागे आलाच आहे.

गुलाम (किंवा भूदास) आणि कामगार ह्यांच्यामध्ये आणखीही फरक आहेत. गुलामीत गुलाम एकाच मालकीशी जोडलेला असतो, मालक निवडण्याचे स्वातंत्र्य त्याला नसते, पण ज्या मालकाने गुलाम विकत घेतलेला असतो तो गुलामाचा वापर अशा रीतीने करतो की त्यात गुलामाची शारीरिक कार्यक्षमता नीट अवस्थेत राहील ह्याची काळजी त्याला घ्यावी लागते. आपली उत्पादनसाधने मोडकळीस येऊ नयेत, दुरुस्तीत राहावीत याची काळजी तो जशी घेतो तशीच गुलामाची घेतो. म्हणजेच गुलामाचा शक्तिक्षय किंवा घसारा [ वेअर ॲंड टेअर ] भरून काढण्यासाठी मालक खर्च करतो. भांडवलदारी कामगाराची स्थिती ह्याच्या उलट असते. एकाच विशिष्ट गुलामावर मालक

अवलंबून असल्यामुळे गुलामाची जशी देखभाल होते तशी कामगाराची होत नाही. कारण एकाच भांडवलदाराला कामगार कायमचा जोडलेला नसतो. त्यामुळे कामगाराच्या शरीरप्रकृतीकडे दुर्लक्ष करून त्याच्याकडून जादा काम करून घेणे भांडवलदाराला शक्य होते.[४४]

कामगाराची दुर्दशा आणखी तीव्र होते ह्याची कारणे भांडवलदाराचे हेतू आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे स्वरूप हीही आहेत. भांडवली अर्थव्यवस्थेवर 'पैसा' ह्या वस्तूची अधिसत्ता असते आणि अधिकात अधिक पैसा मिळवून त्याची गुंतवणूक करणे हा भांडवलदाराचा छंद असतो. अशा रीतीने भांडवलदाराला लोभ [ ग्रीड ] अधिक असतो. भूदास-आधारित किंवा गुलाम-आधारित अर्थव्यवस्थांमध्ये उत्पादन उपयुक्ता-मूल्याचे असे, विनिमय-मूल्याचे नसे. त्यामुळे वस्तूंच्या (किंवा सेवांच्या) स्वरूपात जे अतिरिक्त मूल्य घ्यायचे ते घेऊन घेऊन किती घेणार ? त्याला काही मर्यादा असते. उलट भांडवली अर्थव्यवस्थेत पैशाची हाव अमर्याद असते आणि तिचा परिणाम कामगाराची वाढती पिळवणूक होण्यात होतो.[४५] कामगाराला 'औपचारिक' (किंवा कागदोपत्री) म्हणजेच कायद्याच्या दृष्टीने स्वातंत्र्य असते हा मुद्दाही कधीकधी बाजूला टाकला जातो. कारण एंगल्स म्हणतो की 'कायद्याने आणि वस्तुस्थितीतही' [ 'इन लॉ अॅन्ड इन फॅक्ट ] कामगार गुलामीतच असतो.[४६]

ह्या गुलामीचा नेमका अर्थ काय हे पाहण्याचा आपण यत्न करू. गुलामी ही एक दर्जाविषयक संकल्पना आहे. म्हणजे तिचे अधिष्ठान सामाजिक आणि मानसिक आहे. मोठ्या उद्योगपतीला सल्ला देणारा बड्यात बडा अधिकारी जड धनाच्या अपेक्षेत गरीब नसतो पण त्याला उद्योगपतीपुढे मान तुकवावी लागते, तुच्छपणाने वागविले गेले तर ते सहन करावे लागते. मंत्र्यापुढे सचिवाला कधीकधी स्वाभिमान गुंडाळून ठेवावा लागतो, मग तो सचिव आर्थिक दृष्ट्या मंत्र्याच्या वरच्या पातळीवर का असेना. अशा रीतीने दर्जाच्या संदर्भात मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न मूलभूत असतो; आर्थिक पातळीशी, राहणीमानाशी त्याचा संबंध असतोच असे नव्हे. अर्थात तसा तो अनेक उदाहरणात असतो हे स्पष्टच आहे. पण निरपवादपणे तो तसा असतो असे म्हणता येणार नाही. कामगाराची आर्थिक स्थिती जरी सुधारली तरी त्याची गुलामी शिल्लक उरतेच असे मार्क्सनेही म्हटलेले आहे.[४७]

ही गुलामी कशी निर्माण होते ह्याबद्दलचे मार्क्सीय विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे. भांडवलशाहीपूर्व अवस्थेत कामगार आपापल्या उत्पादनसाधनांचे मालक होते. दुसऱ्या कुणावर अवलंबून राहण्याची त्यांना जरूर नव्हती. भांडवलशाहीच्या उदयाबरोबर उत्पादनसाधने भांडवलदार वर्गाच्या हातात केंद्रित झाली आणि कामगार उत्पादन-साधन-विहीन किंवा मालमत्ता-विहीन बनले. त्यामुळे आपल्या उपजीविकेसाठी त्यांना दुसऱ्याकडे म्हणजे भांडवल-दाराकडे राबणे भाग झाले. त्यांच्यात पराधीनता आली. (ह्या ठिकाणी भांडवलीपूर्व अवस्थेतील भूदास किंवा गुलाम ह्यांच्याशी तुलना नसून औद्योगिक कामे करणाऱ्यांशी आहे हे ध्यानात घ्यावे.)

× × ×

मार्क्सच्या सामाजिक न्यायविषयक सर्व कल्पनांचा परामर्श घेतल्यावर त्यांचा आता एकत्रितरित्या विचार करणे जरूर आहे. सारांशाने पुढीलप्रमाणे विधाने करणे बरोबर दिसते : सामाजिक धनाच्या वाटपाविषयी मार्क्सची भूमिका अस्पष्ट आहे, पण विशिष्ट मर्यादेपलीकडे विषमता जाऊ नये असा त्याच्या म्हणण्याचा अन्वय लावणे शक्य दिसते. विषमतेचा स्पष्ट शब्दात मार्क्सने धिक्कार केल्याचे मात्र दिसून येत नाही. धन कामाच्या प्रमाणात वाटले जावे असे जेव्हा मार्क्स म्हणतो तेव्हा काम न करणाऱ्याला ते मिळू नये हा अर्थ अध्याहृतच आहे. पण शोषणाचा मुख्य सिद्धांत म्हणून जो सांगितला त्याच्यातून अनर्जित उत्पन्न कुणाला मिळू नये असा अर्थ अधिक निश्चितपणे सूचित होतो. मात्र वितरणाच्या न्यायाचा प्रश्न मार्क्सच्या दृष्टीने एकूण दुय्यम स्वरूपाचा आहे याबद्दल मार्क्स, एंगल्स, लेनिन स्टालिन आपल्या मनात कसलीही शंका उरू देत नाहीत.

मार्क्सचा जो मजुरी-सिद्धांत आहे त्यात गरिबी बसत नाही कारण मजुराला त्याचे आरोग्य व ताजेतवानेपणा सांभाळता येईल आणि पुढची पिढी काम करण्यासाठी निर्वेधपणे उपलब्ध होईल इतकी मजुरी मिळते. ह्या सिद्धांताला छेद देणारे विवेचन काही संदर्भात आहे (परिशिष्ट पाहा). दोन संदर्भात तरी मजुरीचा दर निर्वाहपातळीच्या खाली

येतो असे मार्क्सचे पुसटते विवेचन येते पण हा भाग एकूण गौण आहे. वाढत्या दैन्याचा अर्थ कामगारांना निर्वाहपातळी-पेक्षा कमी मजुरी मिळते असा नसून तीपेक्षा ती फारशी अधिक वाढत नाही, एवढाच आहे असे काही भाष्यकारांचे म्हणणे आहे. म्हणजे भांडवलशाहीत कामावर असणारा माणूस गरीब नसणार असे सूचित होते. अर्थात भांडवल-शाहीच्या आणि यांत्रिकीकरणाच्या प्रगतीबरोबर बेकारांचा तांडा वाढत जातो आणि ते बेकार म्हणून गरिबीत राहतात हे ओघानेच येते. (कामावर असणारे कामगार आणि बेकार कामगार असे स्पष्ट दोन वर्ग मानले तर एक सुखी आणि दुसरा गरीब असे मानता येईल. पण ही विभागणी कृत्रिम आहे. मजुरीसिद्धांताला कशाही परिस्थितीत चिकटून राहण्याच्या प्रयत्नातून हा कृत्रिमपणा निर्माण झाला आहे असे दिसते.)

थोडक्यात मार्क्सवादी भूमिका पुढीलप्रमाणे मांडता येईल :

( १ ) भांडवलशाहीचे मुख्य अशिव वेतनदास्य हे आहे; वितरणात्मक अन्याय हे नाही.

( २ ) समतेबद्दलची मार्क्सची विधाने परस्परविरोधी आहेत. तीव्र विषमता मार्क्सला मान्य नसावी असे त्याच्या लिखाणातून सूचित होते पण विषमतेचा स्पष्ट धिक्कार केलेला नाही.

( ३ ) वितरणात्मक न्यायाशी संबद्ध असा एकमात्र विचार मार्क्सवादातून निघतो तो शोषण-संकल्पने-तून. अर्जित उत्पन्न अन्याय्य आहे असा तो विचार आहे.

( ४ ) भांडवलशाहीत कामगार असणारा मजूर गरीब असत नाही.

मार्क्सला काय म्हणायचे आहे एवढेच आपण आतापर्यंत पाहिले. हे करण्यासाठीच आपणाला बरीच झटपट करावी लागली पण ती अपरिहार्य होती. पुढच्या विभागात शोषण संकल्पनेचा विस्तार करून काय हाती लागते ते पाहूया.

## ३. शोषण संकल्पनेचे परीक्षण आणि विस्तार

मार्क्सच्या शोषण संकल्पनेचा आशय काय हे मागच्या विभागात पाहिले. आता या संकल्पनेची सामाजिक न्याय ह्या व्यापक संकल्पनेच्या संदर्भात उपयुक्तता काय हे पाहिले पाहिजे.

हक्क नसताना काही घेणे असा शोषणाचा अर्थ मार्क्समधून निष्पन्न होतो. पण हक्क म्हणजे काय ? 'काम-गारांचा त्यांनी उत्पादन केलेल्या संपूर्ण धनावर हक्क आहे' असे मार्क्सचे हक्कविषयक तत्त्व आहे. काम न करणाऱ्यांना काही मिळू नये, दुसऱ्याच्या जिवावर, बांडगुळी [ पॅरॅसिटिक ] वृत्तीने कुणी जगू नये, असा ह्याचा अर्थ आहे. ही न्यायाची मनाला पटेल अशी एक कल्पना आहे.

पण हक्काचे हे तत्त्व येथेच थांबते. जे जे कुणी काम करणारे सगळे आहेत त्यांच्यामध्ये एकूण उत्पादित धनाची विभागणी कशी करणार, हा प्रश्न शिल्लक राहतोच.

ह्या प्रश्नाचे उत्तर 'कामाच्या प्रमाणात' असे मार्क्सने दिले आहे. वरवर पाहता हे उत्तर समाधानकारक दिसते, पण तसे ते नाही. कामांचे वेगवेगळे प्रकार त्यांच्या कौशल्यावरून ठरतात. केवळ कामाच्या तासावरून वेतन ठरविता येणार नाही. आणि गुंतागुंतीच्या आर्थिक व्यवस्थेत, ती भांडवली असो की समाजवादी असो, एकूण धन-निर्मितीत प्रत्येकाचा भाग किती आणि म्हणून तीवर त्याचा हक्क किती हे ठरविता येत नाही. म्हणजे समाजात निर-निराळ्या प्रकारची कामे करणाऱ्या माणसांना एकूण धनाचा किती वाटा मिळावा हे ठरविण्याला हक्काची संकल्पना पुरी पडत नाही. जे. बी. क्लार्क ह्यांनी पूर्णस्पर्धेच्या परिस्थितीत एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उत्पादन-घटकाची सीमान्त उत्पादकता [ मार्जिनल प्रोडक्टिव्हिटी ] हीच त्या घटकाची एकूण उत्पादनाला देन [ कॉन्ट्रिब्यूशन ] असे मानले आहे आणि त्याआधारे होणारे विभाजन हक्काचे म्हणून न्याय्य मानले आहे. पण सीमांत उत्पादकतेचा असा अर्थ करणे अप्रयुक्त आहे. सीमांत उत्पादकतेचा सिद्धांत उत्पादनघटकाची मागणी कोणत्या आधारे ठरते हे दाखविण्याचे तत्त्व आहे; ते परमार्थाने न्यायाचे तत्त्व असू शकत नाही. ते तसे मानले तर कामगारांचा मागणीच्या तुलनेत पुरवठा वाढल्या-वर कमी होणारा मजुरीचा दरही न्याय्य मानावा लागतो. अनेक भूमिहीन शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न तुटपुंजे असते ;

ते मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वानेच ठरते, पण म्हणून ते न्याय्य असते असे म्हणता येत नाही. म्हणजेच वितरणात्मक न्यायाच्या किंवा शोषणाच्या संदर्भात उत्पादनाधारित 'हक्कार्चो' संकल्पना एका मर्यादेपलीकडे उपयुक्त ठरत नाही. म्हणजेच त्या संकल्पनेची नकारात्मक बाजू 'शोषण' हीही एका मर्यादेपलीकडे उपयुक्त ठरत नाही.

'हक्क' कसा निर्माण होतो ह्या प्रश्नाला दुसरे संभाव्य उत्तर 'पात्रते'चे आहे. आपल्याला अमुक इतके मिळण्याची आपली 'योग्यता' आहे म्हणून तितक्यावर आपला हक्क असे म्हणता येईल. ('योग्यता' किंवा 'पात्रता' ह्यांचेही वेगवेगळे अर्थ करता येतील. पण आपण 'गरज' असा अर्थ केला तरी ठीक होईल.)

अगदी सर्वसामान्य स्वरूपाच्या किमान भौतिक गरजा भागाव्यात एवढे धन प्रत्येकाला मिळाले पाहिजे, ती त्याची माणूस म्हणून गरज आहे, 'पात्रता' आहे असे म्हणता येईल. गरिबीचा प्रश्न ह्या निकषाशी संबंधित आहे. मार्क्सच्या शोषण संकल्पनेच्या काही छटांतून हा अर्थ निघतो असे आपण पाहिले आहे. त्याच्या समाजवादाच्या चित्रातही सार्वत्रिक उपभोगासाठी काही निधी आहे आणि असा निधी सर्वसामान्य किमान गरजांसाठीच असतो. हे जे किमान व म्हणून हक्काचे आहे ते एखाद्याला मिळाले नाही तर त्याचे शोषण झाले असे म्हणता येईल. पण एकदा ही किमान राहणीची पातळी ठरली म्हणजे पात्रतेचीही संकल्पना थांबून राहाते. कमीतकमीच्या वरचे जे आहे त्याबाबत पात्रता ठरविणे मुष्कील आहे. उदाहरणार्थ, खाणकामगाराच्या तुलनेने कवीला जास्त धन मिळावे का? हा एका स्तरावरचा प्रश्न झाला. दुसरा प्रश्न, अर्थांच्या भाषेत 'कवी' आणि 'कवडा' ह्यांच्यातला फरक कोणी आणि कसा ओळखायचा? आणि कवी कोणकोण हे ठरविले तरी पुन्हा त्यांच्यातली वर्गवारी कशी करायची? जशी हक्काची संकल्पना मर्यादित उपयोगाची आहे तशीच पात्रतेचीही आहे.

म्हणजे शोषणाची संकल्पना, ती उत्पादनावरच्या हक्कावरून ठरविलेली असो किंवा पात्रतेवरून ठरविलेली असो, समाजात धनाचे वाटप कसे व्हावे या प्रश्नावर कसलाच प्रकाश टाकीत नाही. काम करणाऱ्यांनाच धन मिळावे आणि निर्वाहपातळीच्या खाली कुणी पडू नये ह्यापलीकडे शोषणाची संकल्पना आपणाला आणखी काही सांगत नाही; म्हणजेच सामाजिक न्यायाचा समग्र प्रश्न शोषण-संकल्पनेच्या आवाक्यात येत नाही.

शोषण हे भांडवलशाहीचे मुख्य वैगुण्य आहे आणि भांडवलशाही म्हणजे खाजगी मालकी नष्ट केली की न्याय्य स्थापना झाली असे अनेकदा समजले जाते. उदाहरणार्थ, एंगल्सने **हाऊसिंग क्वेश्चन** ह्या पुस्तकात म्हटले आहे, "शोषण हे मूलभूत अशिव आहे आणि सामाजिक क्रांतीचा उद्देश भांडवलशाही उत्पादनपद्धतीचा नाश करून त्याची समाप्ती करणे हा आहे." पण शोषण नष्ट करणे म्हणजे न्यायप्रस्थापना करणे असे समीकरण होत नाही हे वरच्या विवेचनावरून लक्षात येईल.

समता म्हणजे काय व ती कशी आणावी ह्या विषयात तपशिलाने जाण्याला येथे अवधी नाही. पण काही ढोबळ गोष्टींचा उल्लेख करता येईल. 'पात्रते'च्या किंवा 'गरजे'च्या तत्त्वातून समाजातील उत्पन्नाची किमान पातळी आपणाला सर्वसाधारणपणे वस्तुनिष्ठ रीतीने ठरविता येते. त्यावरच्या सर्व गटांची उत्पन्ने ठरविण्यात आपणाला कुठलाच वस्तुनिष्ठ निकष उपलब्ध नाही हे आपण पाहिलेच. मात्र आणखी एक ठरविता येते ती म्हणजे कमाल उत्पन्नाची मर्यादा. आणि जनतेला जाणवत असतो तो भाग खरे म्हणजे तीव्र विषमतेचा म्हणजे अशा विषमतेचा असतो की जीत एका बाजूला अनेकांना माणसाच्या प्रतिष्ठेने जगता येत नसतानाच दुसऱ्या बाजूला नको इतक्या द्रव्याची उधळपट्टी चाललेली असते. वितरणाचा न्याय ह्यापेक्षा वेगळ्या रीतीने मांडणे कठीण आहे. आणि पूर्वीचा संदर्भ देऊन बोलायचे तर मार्क्सवादात तीव्र विषमतेचा स्पष्ट धिक्कार नाही आणि समाजवादातही उत्पन्न-विषमतेवर मर्यादा घातली पाहिजे असे निःसंदिग्ध दिग्दर्शन नाही.

किमान आणि कमाल उत्पन्नांच्या मधले जे खण आहेत त्यामध्ये न्याय्य वाटपाचे वस्तुनिष्ठ निकष हाताशी नसल्यामुळे त्याबाबतीत दोनच पर्याय उरतात. एक, राजकीय निर्णय. दोन, मागणीपुरवठ्याच्या तत्त्वाचे अवलंबन. दोन्ही तत्त्वे न्यायाशी समानार्थ नाहीत हे स्पष्टच आहे. पण मागणीपुरवठ्याचे तत्त्व हे कार्यक्षम घटक-वाटपाचेही [रिसोर्स ॲलोकेशन] तत्त्व असल्यामुळे ते राजकीय निर्णयापेक्षा अधिक उजवे म्हणता येईल. म्हणून क्लार्क किंवा

पिगू त्याला 'रास्त' [ फेअर ] असे संबोधतात तेव्हा पर्यायी यंत्रणेपेक्षा अधिक स्वीकारार्ह ह्या अर्थाने ते योग्य म्हणावे लागेल. शिवाय राजकीय निर्णयालाही मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वापासून फार दूर जाता येणार नाही.

माणसांची उत्पन्ने बाजारपेठेतल्या मागणी-पुरवठ्यावर म्हणजेच अस्थिर घटकांवर अवलंबून ठेवणे आणि परिणामतः यदृच्छेचे [ चान्स ] आधिपत्य स्वीकारणे ही अविवेकी [ इररॅशनल ] क्रिया आहे अशी टीका केली जाते. पण कित्येकदा माणसे नशिबाचा न्याय मान्य करतात पण मानवी निर्णयाचा करीत नाहीत. फ्रीडमन ह्यांनी म्हटल्या-प्रमाणे माझ्या सहकाऱ्याला लॉटरी फुटून एकदम धनलाभ झाला तर मला त्याचे फारसे वैषम्य वाटत नाही. पण माझ्यापेक्षा तो जास्त विद्वान किंवा अधिक चांगला शिक्षक आहे असे हेतुतः ठरवून विद्यापीठाने त्याला माझ्यावर बढती दिली तर माझ्या जळफटाला पारावार राहत नाही.

× × ×

हक्क कसा निर्माण होतो ह्याबद्दल तिसरे एक सरधोपट उत्तर देणे शक्य आहे. ते म्हणजे रूढीने, संकेताने, कराराने किंवा कायद्याने जे हक्काचे म्हणून ठरविले आहे ते. अर्थात रूढी, संकेत, कायदे हे न्याय्य असतातच असे नव्हे हे सर्वांना माहीत आहे. कायद्यानेही मालमत्तेचे किंवा उत्पन्नाचे वितरण अत्यंत विषम असू शकते. पूर्वी जमीनदारांचे बरेच हक्क अन्याय्य होते. म्हणजे हक्काची हीही संकल्पना अंतिम अर्थाने न्याय्य ठरत नाही.

मात्र करार, संकेत इत्यादींशिवाय समाजाचा गाडा सुरळीत चालत नाही हे विसरता कामा नये. म्हणून किमान-कमाल मर्यादा आणि त्यामधल्या खणांमध्ये निरनिराळ्या माणसांची व्यवस्था (कोणत्याही तत्त्वाने) एकदा प्रस्थापित झाल्यावर आहे ती स्थिती **सुरक्षित** राहिली पाहिजे. म्हणजे एखाद्याला कराराप्रमाणे जो पगार ठरलेला आहे तो कितीही मोठा किंवा थोडा असो त्यातून काही कमी झाले, उदा. सही एका रकमेच्या पावतीवर आणि पदरात पडणारी रक्कम कमी असे झाले तर ते शोषण म्हटले पाहिजे. मुळातला पगार तो मिळविणाऱ्यांना अन्याय वाटत असेल तर लोकशाहीत तो बदलून घेण्याचे वैध मार्ग आहेत. मात्र करार व कायदा जोपर्यंत बदललेला नाही तोपर्यंत तो हक्क अर्थातच सुरक्षित राहिला पाहिजे. मात्र त्या अर्थाचे शोषण कुणाचेही होऊन शकते, गरिबाचे तसेच श्रीमंताचेही, हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे शोषण आणि गरिबी, शोषण आणि विषमता ह्यांचा ह्या अर्थाने काही संबंध नाही. मात्र शोषणरहितता हे येथे समाजधारणेचे महत्त्वाचे तत्त्व ठरते.

भांडवलशाहीत काय किंवा समाजवादात काय, हे हक्क जपण्याची जबाबदारी प्रामुख्याने शासनाची असते. भांडवलशाहीत उत्पादनसाधने धरून इतर मालमत्तेवर खाजगी हक्क असतो. समाजवादातही खाजगी मालकी असतेच. मात्र ती उपभोगसाधनांवर किंवा मजूर न लावता उपयोगिल्या जाणाऱ्या उत्पादनसाधनांवर असते आणि दोन्हीकडे त्यांचे शासकीय संरक्षण अभिप्रेतच असते. म्हणूनच मालकी-हक्क संरक्षणाचे कायदे दोन्ही पद्धतीत अस्तित्वात असतात व चोरी इत्यादी गुन्हे दोन्हीकडे दंडार्ह असतात.

ज्याला आपण भ्रष्टाचार म्हणतो तो ह्या मालकी-हक्काच्या सुरक्षिततेवर घाला असतो. चोरीचाच तो एक (संभावित) प्रकार असतो. मार्क्संच्या मर्यादित हक्क-कल्पनेमधून भ्रष्टाचार ह्या घटितावर कसलाच प्रकाश पडत नाही; त्या संकल्पनेचा आपणाला विस्तार किंवा अतिदेश [ एक्स्टेंशन ] करावा लागतो हे आता लक्षात येईल.

× × ×

मार्क्सच्या हक्काच्या संकल्पनेकडे पुन्हा वळू. उत्पादक श्रम केल्यावरच त्याला अनुरूप अशा धनावर काम-गाराचा हक्क पोचतो. म्हणजेच हक्क हा एका विशिष्ट कर्तव्याशी जोडलेला असतो. जे मिळावयाचे त्याच्या बदल्यात काहीतरी द्यावे लागते. हक्क आणि कर्तव्य यांचा हा समतोलसुद्धा संकेत, रूढी, करार, कायदा यांनी ठरतो. किंबहुना हक्क या कल्पनेतच कर्तव्य समाविष्ट आहे. मात्र कधीकधी हे विसरले जाते म्हणून मुद्दाम दृष्टीपुढे आणणे जरूर पडते. ह्यावरून आपण काढायचा निष्कर्ष असा की, जेव्हा पुरेसे काम न करता एखादी व्यक्ती हक्काचे म्हणून काही घेते तेव्हा ती शोषण करते. तीही बांडगुळी जीवन जगते.

भगवद्गीतेत (३–१२) आणि जुन्या वाङ्मयात इतरत्र देव आणि मानव ह्यांच्यामधील विनिमयाची, देवघेवीची कल्पना आलेली आहे. देव जे देतात त्यांच्या बदल्यात माणसाने योग्य ते देवांना परत दिले पाहिजे. असे जो देत नाही तो 'चोर' होय असे गीतेत स्पष्ट म्हटले आहे. (स्तेन एव सः). हाच कायदा अर्थात माणसामाणसांमधील देवघेवीला लागू आहे. जसा भ्रष्टाचारी तसा पुरेसे काम न करणाराही बांडगुळी वृत्तीचाच समजला पाहिजे. सामाजिक वास्तवाचे योग्य रीतीने आकलन होण्यासाठी शोषण-संकल्पनेचा हाही एक अतिदेश स्वीकारावा लागेल.

आपण येथे काय केले आहे हे लक्षात आणून देणे जरूर आहे. मुळात आपण मार्क्सचीच शोषणाची (मुख्य) संकल्पना घेतली. अनधिकाराने दुसऱ्या कुणाचे धन काढून घेणे, 'अपहार' करणे, बांडगुळाप्रमाणे दुसऱ्याच्या जिवावर जगणे हा त्या संकल्पनेचा खरा मथितार्थ आहे. (शोषणाचा कोशगत अर्थही तोच आहे). असा शोषण-संकल्पनेचा अर्थ ध्यानात घेतला तर मार्क्स म्हणतो त्याशिवाय इतर रूपांतही शोषण अभिव्यक्त होते हे स्पष्ट आहे. मुख्यत: भ्रष्टाचार आणि (आर्थिक–) कर्तव्यच्युती ही दोन रूपे आपल्या नजरेस येतात. केवळ भांडवलशहाच (किंवा माल-मत्तावाले) शोषण करतात असे नसून इतरही करू शकतात हे शोषण-संकल्पनेच्या येथे केलेल्या अतिदेशातून स्पष्ट होते. आपल्या आजच्या जीवनाचे वास्तव समजण्याच्या दृष्टीने हा अतिदेश वैध आहे आणि उपयुक्तही आहे असे मला वाटते.

## ४. भांडवलशाही, समाजवाद व शोषण

सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून मार्क्सने भांडवलशाहीवर केलेली टीका कितपत समर्थनीय आहे ह्या प्रश्नात विस्ताराने जाण्याची माझी इच्छा नाही, कारण अनेक ग्रंथांतून व लेखांतून मार्क्सच्या विचारांचे परीक्षण करण्यात आलेले आहे. काही ठळक मुद्यांचाच येथे मी उल्लेख करतो.

कामगारांची वास्तव मिळकत कमी होत जाईल असे विधान मार्क्सने आपल्या परिपक्व लिखाणात केलेले नाही, मात्र ती मिळकत वाढली तरी फार वाढणार नाही असे त्याला निश्चित वाटत होते आणि मार्क्सचे हे भविष्य चुकले आहे असे रोनाल्ड मीक ह्या मार्क्सविषयी उदार भूमिका घेणाऱ्या अर्थशास्त्रज्ञाने म्हटले आहे. [४८]

शोषणाचा सिद्धांत 'अनर्जित उत्पन्न' ह्या अर्थाने घेतला तर त्यातील न्यायअन्याय ह्यांचा प्रश्न खाजगी मालकीच्या प्रश्नाशी जोडलेला आहे. आपण जर खाजगी मालकीचे तत्त्व मान्य ठरविले तर अनर्जित मिळकतीला जागा राहते, अमान्य ठरविले तर राहात नाही. (पण ह्या विषयाला आपण पुढे थोडासा स्पर्श करणार आहोत.) ह्याशिवाय खाजगी मालकीविषयी दोन प्रश्न महत्त्वाचे आहेत. आपल्या श्रमाने मिळवलेली मालमत्ता (जी लॉक ह्या ब्रिटिश तत्त्वज्ञाने समर्थित केली) आणि वारसा हक्काने मिळालेली मालमत्ता ह्यामध्ये फरक करणे अगत्याचे आहे. दुसरा प्रश्न मालकी हक्क ही संस्था दोषार्ह गणावी की विषम मालकी हक्क दोषार्ह ठरवावा असा आहे. हे दोन्ही प्रश्न आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भात महत्त्वाचे आहेत. विकसित भांडवलशाही देशात ह्या दोन्ही बाबतींत न्यायाच्या दृष्टीने प्रगती झाल्यासारखे दिसते; वारशाने मिळणाऱ्या संपत्तीवर करांचा भार अधिक ठेवला जातो आणि जॉईन्ट स्टॉक कंपन्यांमुळे मालकी हक्क अधिक विखुरला आहे.

मार्क्सच्या विवेचनात भांडवलदार हा ऐतखाऊ आहे असे गृहीत धरलेले आहे. 'भांडवलदारांचा' अर्थ केवळ वित्तपुरवठा करणारा [ फायनान्सियर ] असा केला तरच हे विधान काहीसे सत्य ठरेल. पण तो उद्योजक [ आंत्र-प्रिन्यूर ] आहे हे मान्य केले तर त्याला ऐतखाऊ म्हणणे कठीण आहे. धोका पत्करणे, उत्पादनघटकांचे संयोजन करणे, देखरेख करणे इत्यादी महत्त्वाची कामे उद्योजकाला करावी लागतात, ह्या गोष्टींकडे मार्क्सचे संपूर्ण दुर्लक्ष आहे. मार्क्सचे ह्या बाबतीतले विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. मार्क्सचा भांडवलदार म्हणतो, "मी स्वत: काम केले नाही काय? व्यवस्थापनाचे [ सुपरिटेंडन्स ] आणि देखरेखीचे [ ओव्हरलुकिंग ] काम मी केलेले नाही काय?" भांडवल-दाराचे हे भाषण ऐकून "त्याचा व्यवस्थापक आणि देखरेखनवीस हे गालातल्या गालात हसतात" असे मार्क्सचे ह्यावर भाष्य आहे.[४९] पण पगारी व्यवस्थापक आणि देखरेखनवीस ह्यांच्यावर देखरेख कोण करतो असा प्रश्न मार्क्सला विचारता येईल.

भांडवलशाहीच्या विकासात मक्तेदारी वाढते असे मार्क्सचे विवेचन आहे. पण शोषणाचा सिद्धांत मार्क्सने पूर्ण स्पर्धेचे गृहीतकृत्य स्वीकारूनच मांडला आहे. अर्थशास्त्राच्या मर्यादित अर्थाने मक्तेदारी आणि विशेषत: मोठ्या उद्योग-घराण्यांचे वर्चस्व व त्यातून निर्माण होणारे भांडवलशाहीतील शोषण सापेक्षपणे दुर्लक्षित राहिले आहे. म्हणजे काही ठिकाणी शोषण नसताना ते लादले गेले आहे आणि काही ठिकाणी ते घडत असताना उपेक्षित राहिले आहे. (ही तुटी भरून काढण्याचा प्रयत्न जे. बी. क्लार्क, ए. सी. पिगू, जोन रॉबिनसन् इत्यादींनी नंतर केला आहे. पण तोही अर्थशास्त्रातल्या मर्यादित अर्थाच्या मक्तेदारीच्या संदर्भात केलेला आहे.)[५०]

भांडवलशाहीतल्या 'अशिवा' बद्दलचा मार्क्सचा मुख्य मुद्दा वेतन-दास्यासंबंधीचा आहे. त्या संबंधात मार्क्सने केलेले विवेचन संक्षेपाने तपासून पाहण्यासारखे आहे.

कामगार भांडवलदारावर 'अवलंबून' असतो. ही बाजारपेठेची फक्त एक बाजू झाली. भांडवलदारही कामगारावर अवलंबून असतो हे विसरता कामा नये. फरक फक्त प्रमाणाचा आहे. शिवाय अवलंबनाची मात्रा पुरवठ्याच्या प्रमाणावर अवलंबून राहील. मजुरांचा पुरवठा अतिरिक्त असेल तर त्यांचे भांडवलदारावरील अवलंबन वाढेल, टंचाई असेल तर कमी होईल. मार्क्स आणि एंगल्स लिहीत होते त्या काळी इंग्लंडातील लोकसंख्या वेगाने वाढत होती आणि आयर्लंड वगैरेतून मजुरांची मोठ्या प्रमाणावर आवक होत होती. (औद्योगिक क्रांतीमुळे संपत्तीत जी भर पडत होती तिचाच हा परिणाम होता असे आर्थिक इतिहासतज्ञ म्हणतात. [५१]) ह्या स्थलकालविशिष्ट परिस्थितीचा मार्क्स-एंगल्स ह्यांच्या विचारावर बेप्रमाण प्रभाव पडलेला आहे.

गुलामगिरी, भूदास्य ह्यांपेक्षाही भांडवलशाहीतील मजुरांचे दास्य मोठे आहे ह्या म्हणण्यास सरळसरळ ऐतिहासिक सत्याचा अपलाप आहे. कारण भांडवलशाहीच्या अनुषंगाने आलेल्या शक्तींनीच माणसांच्या शरीरावरची व मनावरची कायदा आणि रूढी यामधून आलेली मध्ययुगीन बंधने तोडली आणि माणसाला मुक्त केले.[५२]सर हेन्री मेन ह्यांनी सांगितल्याप्रमाणे सामाजिक दर्जाच्या तत्त्वापासून कराराच्या तत्त्वाकडे [ फ्रॉम स्टेटस् टु कॉन्ट्रॅक्ट ] व रूढीपासुन स्पर्धेकडे [ फ्रॉम कस्टम टु कॉंपिटेशन ] असे जे संस्कृतीच्या विकासात मार्गक्रमण झाले त्यात भांडवलशाहीचे योगदान मोठे आहे. ह्याचा मार्क्सच्या मनावर काहीच परिणाम झालेला दिसत नाही. मार्क्स-एंगल्स ह्यांनी कम्युनिस्ट जाहीरनाम्यात भांडवलशाहीच्या कर्तबगारीचे काव्यमय वर्णन केले आहे, पण ही कर्तबगारी केवळ जड धनाच्या उत्पादनाच्या क्षेत्रातीलच आहे असे त्यांचे मत असल्याचे ध्यानात येते. भांडवलशाहीतल्या मानसिक प्रेरणांचा उल्लेख आहे पण त्यांची वाईट बाजूच फक्त दाखविली आहे.

गुलामगिरी पद्धतीत गुलाम ही मालकाची **कायदेशीर मालमत्ता** असते हे विसरता कामा नये, म्हणजेच प्रतिष्ठेच्या दृष्टीने पाहता गुलाम आणि पशू यांमध्ये फरक नसतो. अशी गुलामगिरी गुलामाची आर्थिक स्थिती कामगारापेक्षा बरी असते —हेही खरे नाही— ह्या कारणास्तव मार्क्सने उजवी ठरवावी ही आश्चर्याची गोष्ट आहे, कारण खरे म्हणजे त्याची गुलामगिरीची संकल्पना आर्थिक परिस्थिति-निरपेक्ष आहे. मार्क्स जेव्हा गुलामाची देखभाल कामगारांपेक्षा चांगली होते असे म्हणतो तेव्हा तो गुलामाच्या मालकावरच्या वैयक्तिक अवलंबनाचे कारण देतो. पण सर्वांत लाचार करणारे दास्य हे एका व्यक्तीवर अवलंबून असण्यातून निर्माण होते, 'वर्गा'वर अवलंबून असण्यातून नाही. त्याची उदाहरणे जुन्या संस्थानिकांच्या दरबारातून तरी काढावी लागतील, नाही तर नव्या समाजवादाच्या एकतंत्री कारभारातून.

भांडवलशाहीची मध्यवर्ती अनैतिकता संपत्तीचे विषम वाटप, बेरोजगारी, दारिद्र्य ह्यांमध्ये नसून वेतन-दास्यात सामावलेली आहे असे मार्क्सचे मत असेल तर त्याचा घाव भलत्याच ठिकाणी पडतो आहे आणि सामान्य माणसे म्हणून तुम्हां-आम्हांला ज्या सामाजिक न्यायविषयक प्रश्नाची खरीखुरी कदर वाटते त्याबद्दल त्याला विशेष चीड नाही असे म्हणावे लागेल.

× × ×

भांडवलशाहीचा परिसर मागे टाकून आता मार्क्सच्या समाजवादाकडे थोडासा दृष्टिक्षेप टाकूया. येथेही फार विस्तार करण्यास मला अवसर नाही म्हणून काही महत्त्वाच्या मुद्यांचाच मी उल्लेख करणार आहे.

सामाजिक मालकी स्थापन झाल्यावर वर्गयुक्त समाज संपुष्टात येईल आणि शोषण संपेल असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. खाजगी भांडवलदाराकडे मजूर काम करीत असेल तरच त्याचे शोषण होते अशीच शोषणाची व्याख्या केली तरच समाजवादात शोषण नष्ट होते हे दाखविणे अगदीच सोपे आहे, कारण असे विधान शोषणाच्या व्याख्येतच समाविष्ट आहे. मूळ गोष्ट अशी आहे की, कायदेशीर मालकी आणि नियंत्रण (किंवा व्यवस्थापन) ह्यांमध्ये फरक करावयास हवा. एखादा भांडवलदार आपली सर्व उत्पादनसाधने भाड्याने घेईल आणि मजूर लावून उत्पादन करील. अशा अवस्थेतही मार्क्सच्या तर्कशास्त्राप्रमाणे शोषण शक्य आहे आणि ही अवस्था अगदीच काल्पनिक नाही. सनातन अर्थशास्त्रात (उदा. रिकार्डोच्या खंड-सिद्धांतात) शेतीतला भांडवलदार [ 'फार्मर', 'पेझंट' नव्हे ] जमीन भाड्यानेच घेतो, तो तिचा मालक नसतो. (हा वर्ग आपल्याकडेही उदयाला येतो आहे असे जाणकार म्हणतात.) एकूण मार्क्सच्या शोषणाच्या विवेचनात मालकी हक्काला अवास्तव महत्त्व दिले आहे. समाजवादात खाजगी मालकी नष्ट होईल; पण सबंध समाजाच्या संपत्तीचे व्यवस्थापन काही थोड्या लोकांच्या हातात केंद्रीभूत होईल. मग ह्या संपत्तीचे खरेखुरे मालक असलेल्या लोकांचे नियंत्रण केवळ कागदावरच राहते, जसे जॉईंट स्टॉक कंपनीच्या भागधारकांचे राहते तसेच. ह्यातून संपत्तीचा व सत्तेचा ओघ आपणाकडे वळविणाऱ्या वर्गाचा उदय होतो. जिलास, इंकलेस वगैरेंनी हे दाखविले आहे.[५३] समाजवादी समाजात वर्गनिर्मिती होत नाही हे तर्कत: निष्पादित करता येत नाही आणि समाजवादी देशांच्या अनुभवावरूनही तसे सिद्ध होत नाही. आणि वितरणात्मक न्यायाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी मार्क्स जिला गुलामगिरी म्हणतो ती अवस्था तर समाजवादी देशात शतगुणित झाल्यासारखी दिसते. मार्क्सने शोषणक्रियेचा आणि सत्ताप्रवृत्तींचा फार खोलात जाऊन विचार केला आहे असे दिसत नाही.

× × ×

समाजवादाविषयी एक मूलभूत नैतिक प्रश्न उपस्थित करणे जरूर आहे. प्रश्न जुनाच आहे; पण जुना म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. जेथे सर्व प्रकारच्या सत्ता केंद्रीभूत झालेल्या आहेत अशा समाजातील सत्ताधारी लोककल्याण आणि न्याय ह्या हेतूंनी कायमचे प्रेरित राहतील हे कोणत्या आधारावर समजायचे ? किंबहुना त्यांच्या ताब्यात असलेल्या अवाढव्य सत्तेमुळे ते नीतिभ्रष्ट होण्याचाच अधिक संभव नाही काय ?

आदर्श समाजाचे आपण जेव्हा चित्रण करतो तेव्हा ते काळजीपूर्वक करावयास हवे असे मला वाटते. अन्याय आणि विषमता सर्व प्रकारच्या समाजात चालू राहणार हे आपण धरूनच चालले पाहिजे. कारण केवळ मालमत्तेचे मालकच शोषण करतात हे खरे नाही असे आपण वर पाहिले. मात्र ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांना किंवा त्यांच्यातर्फे इतरांना त्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची, संघटना करण्याची, दबाव आणण्याची संधी हवी. ही संधी लोकशाही आणि तिचा आधार असलेली मूलभूत स्वातंत्र्ये देतात आणि खाजगी मालमत्तेचा हक्क, त्यामधून निर्माण होणारे खाजगी व्यवसाय करण्याचे व खाजगी मालकांकडे नोकऱ्या करण्याचे स्वातंत्र्य, म्हणजेच सरकारवर आपली उपजीविका अवलंबून नाही अशी स्थिती ह्या गोष्टींशिवाय अन्यायाविरुद्ध झगडण्याला फार माणसे तयार होणार नाहीत. ह्या अर्थाने स्वातंत्र्य हीच न्यायाची, शोषणरहिततेची, समतेची हमी आहे. एका कोणत्या तरी क्रांतीच्या क्षणी जगातले सगळे अन्याय संपतात असे होत नाही. आदर्श समाजाचे हे चित्र मनुष्यस्वभावाला धरून नाही. तो समाज आदर्श समजायला हवा की ज्यात अन्यायाविरुद्ध भांडण्याची मुभा आहे. अर्थात ही फार मोठी हमी नाही. पण आपल्या अपूर्ण जगात तेवढीच एक हमी आहे.

अनर्जित उत्पन्नाच्या विशिष्ट संदर्भात समाजवाद हे एक पुढचे पाऊल आहे असे अनेकांना वाटते. समाजवादात खाजगी मालकी नष्ट झाल्यामुळे निदान ऐतखाऊंचा वर्ग तरी संपुष्टात येईल की नाही, असा उत्तरगर्भ [ ऱ्हेटॉरिकल ] प्रश्न ते विचारतात. खरे उत्तर असे आहे की, समाजवादात काय घडते हे समाजवादी समाजाच्या नियंत्रकांवर अवलंबून असते आणि ह्या नियंत्रकांच्या हाती अनिर्बंध सत्ता असल्यामुळे ते स्वतःच नीतिभ्रष्ट होण्याचा संभव निर्माण होतो, हे मागे म्हटलेच आहे.

ह्या संदर्भात हेही ध्यानात ठेवावे की, मुळीच काम न करता काही उत्पन्नाचे धनी होणे, थोडेसे काम करून बेप्रमाण धन मिळविणे किंवा दिखाऊ अथवा शोभेचे काम करून धन मिळविणे ह्या तीन प्रकारांतल्या सीमारेषा फार

अस्पष्ट आहेत. यातल्या पहिलीवरच जोर देऊन ती संपुष्टात आली की, न्यायप्रस्थापना झाली असे म्हणणे भाबडेपणाचे आहे. समाजवादात पहिली गोष्ट नष्ट झाली तरी दुसऱ्या दोन्हींचा प्रादुर्भाव शक्य आहे. ज्या न्यायाने काम न करणारा माणूस उत्पन्न मिळवीत असेल तर तो काम करणाऱ्यांच्या जिवावर बांडगुळी जिणे जगतो, म्हणजेच शोषण करतो असे आपण म्हणतो, त्याच न्यायाने पुरेसे काम न करणारा किंवा पुरेसे महत्त्वाचे काम न करणारा माणूस जर बेप्रमाण उत्पन्न घेत असेल तर तोही शोषकच समजला पाहिजे.

## ५. भारतीय संदर्भात मार्क्सीय सामाजिक न्याय

भारतातील प्रमुख प्रश्न गरिबीचा आहे. त्यावर मार्क्सवादी वाङ्मयातून काय प्रकाश पडतो ? गरिबीची आपल्या देशात जी व्याख्या केली जाते ती 'निर्वाहपातळीपेक्षा खालची राहणी' अशी आहे. सनातन अर्थशास्त्रज्ञांचे विवेचन पाहिले तर भांडवलशाही बाजारपद्धतीत दीर्घकालात कोणीही निर्वाहपातळीच्या खाली येत नाही. मजुरी निर्वाहपातळीच्या वर गेली तर राहणीमान सुधारते, मृत्युदर कमी होतो, श्रमिकांची संख्या व पुरवठा वाढतो आणि मजुरीचे दर खाली येतात. उलट मजुरी निर्वाहपातळीच्या खाली गेली तर राहणीमान घसरते; मृत्युदर वाढतो; श्रमिकांची संख्या कमी होऊन पुरवठा कमी होतो व मजुरीचा दर पुन्हा वर चढतो. म्हणजे दीर्घकालीन अवस्थेत मजुरीचा दर निर्वाहपातळीवर समतोल राखून असतो. निर्वाह आणि लोकसंख्या ह्यांच्या परस्परसंबंधात माल्थसचा जो सिद्धांत आहे त्यावर हे विवेचन आधारलेले आहे. हे विवेचन गृहीत धरले तर गरिबी कधीच अस्तित्वात असत नाही असे होत नाही, फक्त ती थोडा काळ [ शॉर्ट टर्म ] शिल्लक राहील असे निष्पन्न होते. (अर्थात गरिबाच्या दृष्टीने ऱ्हस्व कालखंड आणि दीर्घ कालखंड ह्यांमधील फरक दिलासा देणारा नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.) माल्थसचा सिद्धांत मार्क्सला मान्य नाही. 'मनुष्यजातीची बदनामी' [ लायबेल ऑन द ह्यूमन रेस ] ह्या शब्दांत त्याने त्याची संभावना केली आहे. म्हणून मार्क्स निर्वाहपातळीच गृहीत धरतो पण ती मूल्याच्या श्रमसिद्धांताच्या आधारे. श्रमशक्ती विकत घ्यायची म्हणजे श्रमशक्ती निर्माण करील इतक्या निर्वाहसाधनांची किंमत दिली पाहिजे आणि म्हणून वेतन निर्वाहपातळीवर राहील. मार्क्सही अर्थातच ऱ्हस्वकाळात मजुरीचा दर निर्वाहपातळीपेक्षा कमीजास्त असेल असे मानतो. थोडक्यात असे म्हणता येईल की सनातन अर्थशास्त्र आणि मार्क्सीय अर्थशास्त्र ह्या दोहोंप्रमाणे भांडवलशाहीत दीर्घकालीन दृष्ट्या गरिबीला स्थान नाही. मात्र सनातन आणि मार्क्सीय मजुरी सिद्धांतात एक फरक आहे हे लक्षात घेणे जरूर आहे. मार्क्सच्या सिद्धांतनात भांडवलदार मजुरी देताना कामगाराचे आरोग्य आणि त्याच्या कुटुंबाची देखभाल ह्यांचा विचार करतो. (ह्याचे विवेचन मागे आलेच आहे) उलट सनातन अर्थशास्त्रात निर्वाहपातळीवर मजुरीची पातळी कायम राहण्याचा परिणाम लोकसंख्येच्या गतिशास्त्रातून साकार होतो. म्हणजे मार्क्सचा भांडवलदार अधिक दयाळू आहे म्हणून अधिक अवास्तव आहे. मार्क्स ह्या भूमिकेशी सुसंगत नाही हे मी परिशिष्टात दाखविले आहे. पण मार्क्सचा सैद्धांतिक आग्रह मी म्हणतो त्या प्रकारचा आहे आणि त्याच्या मजुरी-सिद्धांतात तो प्रकट झाला आहे.

मजुरी-दराचे हे सनातन किंवा मार्क्सीय सिद्धांतन अमान्य केले आणि नवसनातन सीमांत उत्पादकतेच्या सिद्धांताचा आधार घेतला तर मजुरीचा दर आणि निर्वाहपातळी यांचा स्पष्ट संबंध असण्याचे कारण नाही. दीर्घकाळातही मजुरीचा दर निर्वाहपातळीत, निर्वाहपातळीच्या वर, किंवा निर्वाहपातळीच्या खालीही राहण्याचा संभव आहे. मग भांडवलशाहीत गरिबी राहणार नाही, असे प्रमेय निश्चयाने स्वीकारावे लागत नाही. तेच भारतातील भांडवली क्षेत्राच्या बाबतीत, उदा. भांडवली शेतीत, वास्तव आहे असे मला वाटते. (उदाहरणार्थ, भूमिहीन शेतमजुरांची स्थिती पाहा). मग कामाच्या दिवसाबद्दलचे, अतिश्रमाबद्दलचे, मार्क्सचे जे विवेचन आहे तेही ह्या सिद्धांतात बसू शकते. (उदा. निपाणीचे बिडी कामगार[५४])

अविकसित (पारंपरिक) देशातही, गरिबी असू शकणार नाही, असे चमत्कारिक सूचन प्रा. शुल्टझ् ह्यांच्या **ट्रॅन्सफॉर्मिंग ट्रॅडिशनल ॲग्रिकल्चर** (१९६४) ह्या पुस्तकातून मिळते. ह्याचे कारण शुल्टझ् ह्यांनी मजुरी-दराचा सनातन सिद्धांतच स्वीकारला आहे असे दिसते. ह्यावर आक्षेप घेऊन प्रा. दांडेकर ह्यांनी लोकसंख्यावाढ, गरिबी,

भांडवलभक्षण [ कॅपिटल कन्झमशन ] आणि एकूणच 'सततची घसरण' [ कंटीन्यूअस डिटीरिअरेशन ] ही प्रक्रिया शेतीच्या बऱ्याच मोठ्या भागावर कशी होत राहते हे दाखविले आहे. मी असे सुचविले आहे की प्रा. शुल्टझ् आणि प्रा. दांडेकर ह्यांचे निष्कर्ष एकमेकांना विरोधी आहेत ह्याचे कारण दोघांची गृहीतकृत्ये वेगळी आहेत. प्रा. शुल्टझ् ह्यांचे गृहीतकृत्य भांडवली बाजारपेठेचे (श्रम बाजारपेठेचे) आहे तर दांडेकर ह्यांचे गृहीतकृत्य कौटुंबिक शेतीचे म्हणजे कौटुंबिक श्रमावर आधारित असलेल्या अ-भांडवली शेतीचे आहे. दांडेकरांची निगमने अधिक वास्तव आहेत कारण त्यांचे (अव्यक्त-इंप्लिसिट) गृहीतकृत्य पारंपरिक समाजाच्या दृष्टीने अधिक वास्तव आहे.[५५]

आपल्या देशातील बव्हंश अर्थव्यवस्था अजून भांडवली पंखाखाली आलेली नाही. अशा स्थितीत कौटुंबिक व्यवसाय आणि लोकसंख्येचे गतिशास्त्र ह्यांच्या संदर्भातच मुख्यतः आपणाला गरिबीचा विचार करावा लागेल. लोकसंख्येच्या प्रश्नाला बगल देता येणार नाही. मार्क्सवादी विचारप्रणाली तिच्या भांडवलशाही चौकटीमुळे व लोकसंख्याविषयक प्रश्नांच्या उपेक्षेमुळे ह्या बाबतीत आपणाला उपयोगी पडण्यासारखी नाही आणि गरिबांच्या प्रश्नाला हात घालायचा तर श्रीमंतांवर भार घालूनच म्हणजे अधिक समता आणूनच आपणाला हे केले पाहिजे हे स्पष्ट आहे.

मार्क्सचे जे भांडवलीपूर्व दास्य आहे त्याचे काहीसे प्रतिबिंब ग्रामीण भागात आपणाला दिसेल. एखादे बड्या शेतकऱ्याचे कुटुंब निरनिराळ्या स्तरांवरील सत्तास्थाने बळकावून, कायदा आणि नीतिमत्ता ह्यांना न जुमानता गरीब लोकांना पकडीत ठेवते, वेठीला धरते, त्यांच्या जमिनी बळकावते. हे आदिवासी भागात विशेष घडते. बांधील मजूर, लग्नगडी इत्यादी प्रकार घृणा आणणारे आहेत. अनेक भाग असे आहेत की, ज्यात सरकारचे राज्य नाही, जंगलाचा कायदा आहे असे वाटते. मार्क्स ह्या संदर्भात प्रस्तुत आहे पण नुसता मार्क्स येथे उपयोगी पडणार नसून भांडवली-पूर्व आणि भांडवली समाजाच्या सांधेजोडीमधून निर्माण होणाऱ्या वेगळ्या प्रकारच्या वास्तवाचे आपल्याला विश्लेषण करावे लागणार आहे.

× × ×

विभाग ३ मध्ये शोषणसंकल्पनेचा जो मी अतिदेश केला त्यातील कर्तव्यच्युतीच्या मुद्याचा भारताच्या संदर्भात विशेष उल्लेख करणे जरूर आहे.

त्रि. ना. आत्रे ह्यांच्या **गावगाडा** (१९१५) ह्या पुस्तकात बलुतेदार बलिराजाकडून म्हणजे शेतकऱ्याकडून पुरेसे काम न करता नुसते हक्कच कसे 'उकळतात' ह्याचे विदारक वर्णन आहे. कर्तव्यविषयक संकेत बाजूला पडले आणि केवळ हक्कविषयक संकेत जिवंत राहिले तर समाजाचे काय होते हे त्यावरून नीट कळून येईल.

ही स्थिती आज आपल्या देशात अनेक पटींनी अधिक दुर्धर झाली आहे. कर्तव्यभावना जवळजवळ सर्वस्वी लुप्त झालेल्या आपल्या आजच्या समाजात एकही वर्ग असा दाखविता येणार नाही की, जो 'कमी देऊन जास्त उपटावे' ह्या अर्थाने शोषक नाही. गीतेतल्या कर्मयोगाचे, निष्काम कर्मयोगाचे, आम्ही उपासक पण शुभायू दासगुप्ता ह्यांनी म्हटल्याप्रमाणे गीतेचा संदेश बरोबर उलटा करून 'निष्कर्म काम', म्हणजे कष्ट न करता केवळ अधिक धनाची इच्छा हा सिद्धांत आम्ही "राष्ट्रीय जीवनात प्रस्थापित केला आहे." आज कामावरचा सगळा विश्वास उडालेला आहे. आपणाला सुखे मात्र सर्व हवी आहेत. आणि ही परिस्थिती आपल्या भवितव्याच्या दृष्टीने अस्वस्थ करणारी आहे. ह्या परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी आपणाला मार्क्सपासून बरेच पुढे गेले पाहिजे. ह्या संदर्भात कदाचित मॅक्स वेबरचा आपल्याला जास्त उपयोग होईल.

मग कर्म-नीती [ वर्क एथिक ] ज्याला म्हणतात ते तत्त्व आपण ह्या समाजात कसे निर्माण करू शकू हा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. आपणाला उपयुक्त अशा आर्थिक व्यवस्था आणि संस्था हाही निकष लावून आपल्याला जोखाव्या लागतील आणि त्या आधारांनी भांडवलशाही समाजवाद, लोकशाही समाजवाद, मिश्र अर्थव्यवस्था इत्यादींचा आपणाला विचार करावा लागेल.

बांडगुळी वृत्ती [ पॅरासिटिझम ] अशी शोषणाची व्यापक व्याख्या केली आणि तिच्या दृष्टिकोणातून भारताच्या आजच्या अवस्थेकडे नजर टाकली तर काय दिसते ?

(१) राजकारणी लोक धनवंतांचे शोषण करून निवडणुकीसाठी म्हणजे पर्यायाने स्वतःसाठी पैसा जमा करतात.

(२) सत्तास्थाने प्राप्त करून घेतल्यावर राजकारणी लोक धनवंतांच्या, सामान्य जनतेच्या व सरकारच्या धनाचा अपहार करतात.

(३) धनवंत सरकारच्या पैशाचा कर वगैरे बुडवून आणि सवलती उपटून अपहार करतात.

(४) धनवंत काळा बाजार, मक्तेदारी किमती इत्यादींमधून ग्राहकांचे शोषण करतात.

(५) औद्योगिक भांडवलदार मजुरांचे शोषण करतात.

(६) सामान्य जनतेतील संघटित वर्ग त्यांच्या खाजगी किंवा सरकारी मालकांचे व त्यामार्फत पुन्हा ग्राहकांचे शोषण करतात.

(७) सरकार ही संस्था कर आणि चलनफुगवटा ह्याद्वारे सामान्य जनतेचे शोषण करते.

(८) प्रशासक भ्रष्टाचाराच्या मार्गाने सर्वसामान्य जनतेचे शोषण करतात.

(९) काही स्थितीत जमीनमालक कुळांचे शोषण करतात.

(१०) काही स्थितीत कुळे जमीनमालकांचे शोषण करतात.

(११) मोठे शेतकरी मजूर, लहान शेतकरी, दलित ह्यांचे शोषण करतात.

(१२) कर्तव्यच्युतीच्या अर्थाने बहुतेक गट समाजाचे शोषण करतात.

प्रचलित परिस्थितीकडे वरवर नजर टाकली असता शोषणाच्या ज्या धारा [ चॅनेल्स ] मला दिसतात त्यांची यादी वर दिली आहे. ही यादी कदाचित आणखीही लांबविता येईल. तूर्त तिच्यातून काय दृष्टोत्पत्तीस येते ते पाहू.

(१) शोषणाच्या वरील धारांचा विचार करताना शोषक आणि शोषित असे दोनच आणि परस्पर-व्यावर्तक [ म्युच्युअली एक्स्क्लूझिव ] गट न दिसता अनेक गट दिसून येतात. ही अवस्था ह्यूमने वर्णन केलेल्या 'प्रत्येकाची इतर सर्वांविरुद्ध लढाई' [ वॉर ऑफ ईच अगेन्स्ट ऑल ] ह्या अवस्थेचीच आठवण करून देणारी आहे.

(२) शोषण एकदेशीय म्हणजे एकाच सरळ दिशेने चालत नाही. एकदेशीयत्वाला दोन तऱ्हांनी काट लागतो : (अ) शोषक स्वतः शोषित असू शकतो. (आ) परस्परशोषण ही एक वस्तुस्थिती असू शकते.

(३) शोषणाची प्रवृत्ती सार्वत्रिक असते. ती अमलात आणण्याची संधी किंवा शक्ती सार्वत्रिक नसते एवढेच.

(४) शोषणाचे उगम केवळ आर्थिक किंवा मालमत्ताविषयक अधिकारांमधून निर्माण होत नाहीत.

भारताच्या संदर्भातील शोषण ह्या घटिताचे मी जे वर चित्र काढले आहे त्याचे सम्यक् आकलन होईल अशी वैचारिक चौकट आज आपणाजवळ उपलब्ध नाही. मार्क्सवादी चौकट अपुरी पडते ह्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत : (१) मार्क्सवादात शोषक आणि शोषित अशा दोन रेखीव आणि परस्पर-व्यावर्तक गटात समाजाची विभागणी केली आहे. ती आपला समाज समजावून घेण्यास पुरेशी नाही. (२) मार्क्सचे मुख्य विवेचन भांडवलशाही शोषणाविषयी आहे. आजच्या भारतात, विशेषतः शेती आणि ग्रामीण क्षेत्रात भांडवलशाही प्रभावी नाही. अर्थात मार्क्सवादात भांडवलशाही-पूर्व समाजामधील शोषणाचे विवेचन आहे पण ते अपुरे आहे. (३) मार्क्सवादात शोषणाचा एकमात्र स्रोत आर्थिक सत्ता, विशेषतः खाजगी मालमत्ता हा आहे. प्रशासक, मजूर-संघटना, राजकारणी लोक इत्यादींची शक्ती केवळ आर्थिक सत्तेतून निर्माण होत नाही. (४) मार्क्सवादात शोषणाच्या प्रवृत्तीची मीमांसा नाही. त्यामुळे शोषणाचे विश्लेषण पुरेसे मूलगामी होत नाही. भांडवलशाही शोषणात भांडवलदार पैसारूप नफ्याच्या प्रेरणेने शोषणास प्रवृत्त होतो आणि भांडवलशाहीपूर्व समाजाच्या तुलनेने ही प्रेरणा अधिक निर्दय बनते असे मार्क्सने म्हटले आहे. पण ह्यामागे लोभ हा मूळ हेतू असेल तर समाजाच्या एकाच भागापुरता तो मर्यादित राहणार नाही. तो सर्वसामान्य सांस्कृतिक आविष्कारच बनून राहील.

दुसऱ्याचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करणे ह्या अर्थाने शोषण-प्रवृत्तीचा अधिक खोलात जाऊन विचार केला तर तिचा उगम कुठल्यातरी 'सामर्थ्या'च्या [पॉवर] स्वरूपाचा असतो असे दिसून येईल. मार्क्सने आर्थिक सामर्थ्य महत्त्वाचे मानले. रसेल ह्यांनी सामर्थ्याचे इतर उगम दाखविले आहेत.[५६] शारीर [ 'नेकेड', फिजिकल ] शक्ती, बौद्धिक शक्ती, ज्ञानाचे सामर्थ्य, वैयक्तिक करिश्मा किंवा संमोहनशक्ती इत्यादी अनेक गोष्टींचा माणसे शोषणाचे साधन म्हणून उपयोग करून घेऊ शकतात आणि दुसऱ्यांना वाकवितात. सिकंदर, चेंगीजखान, नेपोलियन, हिटलर इत्यादींची शक्ती प्रामुख्याने शारीर होती. आर्य चाणक्यांची त्यांच्या बुद्धिमत्तेत होती असे म्हणतात. ब्राह्मणांची शक्ती त्यांच्या धार्मिक ज्ञानाच्या मक्तेदारीत होती आणि आज जे डॉक्टर [५७], वकील, इंजिनियर शोषण करतात ते विशिष्ट प्रकारच्या तज्ज्ञतेतून निर्माण होते. क्लिओपॅट्रासारख्या स्त्रिया किंवा अनेक आचार्य, गुरू, जोगिणी इत्यादी मंडळी आपल्या वैयक्तिक मोहजालात माणसांना अडकवून ठेवतात.[५८]

म्हणजे ज्या ज्या बाबतीत एक माणूस दुसऱ्यापेक्षा वरचढ असतो त्या त्या बाबतीत त्याच्याकडे शोषणाची सुप्त शक्ती वास करीत असते, तिचा वापर करण्याची इच्छा असावी लागते आणि संधी मिळावी लागते एवढेच. म्हणजेच मुळात ज्या कारणांनी माणसे विषम ठरतात त्या त्या कारणांमधून शोषणक्रियेचा उगम होऊ शकतो. ह्यातून एक भयानक अर्थ पैदा होतो तो असा की, समाजव्यवस्था कोणतीही असो; निसर्गदत्त विषमतेमुळे अधिक सामर्थ्यवान माणसे कमी सामर्थ्यवानांचे शोषण करीतच राहतील. काहीजणांनी इतर काही जणांच्या दातांखाली भरडले जाणे हे अपरिहार्यच आहे. "तुझी माझी धाव आहे, दातांपासून दातांकडे" ह्या विंदा करंदीकरांच्या ओळीत एका अर्थाने जगाचा समग्र इतिहास आणि भवितव्य ही साररूपाने सामावली आहेत. म्हणूनच पूर्वीच्या मुद्यांची आठवण करून द्यायची तर एका विशिष्ट समाजरचनेत शोषण नष्ट होते असे मानता येत नाही. मात्र शोषणाला प्रतिरोध करण्याचे स्वातंत्र्य कायम राहील असा समाज निर्माण करणे महत्त्वाचे ठरते.

सामर्थ्याचे व सत्तेचे वर सांगितलेले उगम पुन्हा परस्पर-व्यावर्तक नसतात. म्हणजे एकाच व्यक्तीच्या किंवा गटाच्या कबजात अनेक स्रोत एकाच वेळी असू शकतात. ह्यामुळे मूळची सत्ता अनेक-गुणित होते. कधी वेग-वेगळ्या सत्ता परस्परपूरक असतात तर कधी त्यांची देवाणघेवाण [ ट्रेड-ऑफ ] होऊ शकते. शिवाय सर्वच सत्ता-साधनांचे उद्दिष्ट अधिक आर्थिक लाभ एवढेच असते असे नाही. सत्ता एकाच वेळी साधन आणि साध्य असू शकते. मार्क्स जेव्हा भांडवलदारांच्या प्रेरणेविषयी बोलतो तेव्हा आर्थिक प्रेरणेबरोबर सत्ताप्रेरणाही ध्यानात घेतो असे मला वाटते आणि ही जाण निःसंशय अधिक वास्तवदर्शी आहे. ह्याही आणखी काही गुंतागुंती लक्षात घेतल्याशिवाय कोण-त्याही समाजाचे, विशेषतः भारतीय समाजाचे आणि त्यातील सर्वगामी शोषणाचे स्पष्ट आकलन आपणाला होणार नाही.

सारांशाने बोलायचे तर मार्क्सवादामधली सामाजिक न्यायाची कल्पना फारच परिमित आहे. ज्याच्या प्रस्थापनेसाठी प्लेटोपासून जयप्रकाशापर्यंतच्या विचारवंतांनी व कृतिशूरांनी प्रयत्न केले तो सामाजिक न्याय मार्क्समध्ये गौणत्वाने येतो. आपल्यापुढच्या आजच्या समस्यांच्या संदर्भात मार्क्स हा एक फक्त प्रारंभबिंदू धरून आपणाला बरेच पुढे जावे लागेल.

मार्क्सचा शोषणाचा अर्थ मर्यादित आहे. पण त्याच्या शोषणसंकल्पनेचा तार्किक विस्तार करून सामाजिक वास्तवाच्या अनेक अंगांना कवेत घेणे शक्य आहे, असे दाखविण्याचा यत्न ह्या ठिकाणी मी केला आहे. मात्र मी फक्त दिग्दर्शन केले आहे. परपुष्टतेची [पॅरॅसिटिझम] आपल्या जुन्या समाजव्यवस्थेतील मुळे शोधून काढणे, सलीकडच्या काळात तिला आलेली नवी रूपे तपासणे, त्यांच्या संदर्भात आपण उभारीत असलेल्या नव्या संस्था आणि संघटना ह्यांचे मूल्यमापन करणे, ही कामे अजून व्हावयाची आहेत.

## ६. दोन व्यापक प्रश्न

माझे मुख्य विवेचन संपले आहे. पण शोषणाच्या संदर्भात जरा वेगळ्या स्तरावरचे आणि अधिक व्यापक स्वरूपाचे प्रश्न आपणापुढे मांडण्याची मी परवानगी घेतो.

मार्क्सच्या शोषण सिद्धांताला जसे एक नैतिक अंग आहे तसे आर्थिक अंगही आहे. किंबहुना मार्क्सने केलेले भांडवलशाहीचे आर्थिक विश्लेषण शोषण-सिद्धांताच्या पायावरच उभे आहे. ह्या अर्थशास्त्रात जाण्याचे आपल्याला कारण नाही. पण त्यातला एक मुद्दा अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. तो असा की, शोषणातून प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त मूल्यातून भांडवलाची उभारणी होते व अर्थातच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास होतो. म्हणजे मार्क्सवादी अर्थशास्त्रात विकास आणि शोषण यांचा जन्म-जनक संबंध आहे. हे खरे आहे की काय ह्याचा आपण मनापासून विचार करावयास हवा हे उघड आहे.

मार्क्सने चित्रिलेल्या भांडवलदाराची सतत भांडवल-संग्रहापासून [ अॅक्युम्युलेशन ] सुटका नाही. ह्याचे कारण त्याची नफ्याची प्रेरणा आणि बाजारातील स्पर्धेचे दडपण. ह्याही विचारावर टीका करता येते पण हे आपण वादासाठी ग्राह्य मानू. मात्र भांडवलदारांखेरीज इतर जे शोषण करतात त्यांच्या अतिरिक्त धनाचे काय होते ? त्याचा किती अंश भांडवल-गुंतवणुकीत जातो आणि किती डामडौली उपभोगात ? [ कॉन्स्पीक्युअस कंझंप्शन ]. मार्क्सवादी शोषण, भ्रष्टाचार, कर्तव्यविमुखता ह्यांनी एकूण समाजाचा आर्थिक विकास होतो असे म्हणण्यापेक्षा आर्थिक विकासाला खीळ बसते असे म्हणणे जास्त योग्य होईल. आपला अनुभवही तसाच आहे. अनैतिक किंवा अन्याय्य वर्तनातून समाजाचा विकास साधतो हे संसूचन आपण फारच काळजीपूर्वक पारखून घेतले पाहिजे.

दुसरा व्यापक स्तरावरचा प्रश्न तंत्रविद्या आणि शोषण ह्यांच्या परस्पर-संबंधाचा आहे. यांत्रिकीकरणामुळे शोषण वाढते असे मार्क्सने म्हटले आहे. यंत्रामुळे खरे म्हणजे मानवी सुखात भर पडावयास हवी, उलट बहुसंख्य जनता त्यामुळे आर्थिक अधोगतीच्या गर्तेत अधिकाधिक खोल जात आहे असे त्याला वाटत होते.[५९]

तंत्रविद्या [टेक्नॉलॉजी] आणि शोषणादी अन्याय ह्यांचा नेमका काय संबंध आहे असा हा प्रश्न आहे. ह्याबाबत पुढीलप्रमाणे पूर्वपक्ष मांडता येईल. ज्या समाजात तांत्रिक प्रगती कुंठित आहे आणि सर्व उत्पादनसाधनांचा पूर्ण वापर होतो आहे त्या समाजात एखाद्याला अधिक धन मिळावेसे वाटले तर ते दुसऱ्याच्या धनाचा अपहार करूनच मिळविता येणार; आपल्या उत्पादनतंत्रात सुधारणा करून अधिक धन मिळविण्याचा मार्ग त्याला उपलब्ध नसतो. अधिक धन मिळविण्याची जबर इच्छा ज्यांना आहे त्यांच्यापुढे एकमात्र मार्ग आहे, अपहार, म्हणजेच शोषण.[६०] मला संदर्भ नेमका आठवत नाही. महाभारतात बहुधा कृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे की, तुला जगात उत्कर्ष प्राप्त करून घ्यायचा असेल तर दुसऱ्यांच्या सुखावर तिलांजली सोडूनच तो घ्यावा लागेल.

मात्र नवे तंत्रज्ञान उपलब्ध झाले की आपले धन वाढविण्याचा आणखी एक मार्ग मोकळा होतो. अपहाराशिवाय श्रीमंती साध्य करून घेता येते. क्रीडन सिद्धांताच्या [ गेम थिअरी ] भाषेत बोलायचे तर असे म्हणता येईल की, तंत्रदृष्ट्या कुंठित समाजात ज्यांची बेरीज शून्य आहे अशी क्रीडने [ झीरो सम गेम्स ] पैदा होतात म्हणजे असे की अपहाराचा परिणाम एकाचा लाभ ती दुसऱ्याची हानी असा असल्यामुळे समाजाच्या संपत्तीत कसलीच भर पडत नाही- (लाभ + हानि = शून्य). उलट तंत्रदृष्ट्या गतिमान समाजात अपहाराशिवाय संपत्तीची वाढ होणे शक्य असल्यामुळे धनात्मक क्रीडने [ पॉझिटिव्ह सम गेम्स ] संभाव्य ठरतात आणि समाजाच्या संपत्तीत भर पडते.[६१] हे विवेचन ग्राह्य धरले तर असे निष्पन्न होईल की, तंत्रविद्येच्या प्रसाराने शोषणाला आळा बसेल, माणसे अधिक नीतिमान होतील.

हे पूर्णपणे खरे नसावे असे माझे मलाच वाटते. निदान तत्त्वतः असे निष्पन्न होत असले तरी जगाचा इतिहास त्याप्रमाणे घडत आला नसावा. कारण समाजाचा नीतिमत्तेच्या दिशेने प्रवास होण्याच्या मार्गात दुसऱ्या काही ह्या प्रवृत्तीला छेद देणाऱ्या घटना घडल्या असतील. कदाचित लोभप्रवृत्ती वाढली असेल. कदाचित तंत्रविद्येनेही शोषणाची आणखी क्षेत्रे उपलब्ध केली असतील. कदाचित शोषणाचे तंत्रही प्रगत झाले असेल.

काहीही असले तरी हा प्रश्न जागतिक संदर्भात आणि आपल्या संदर्भातही महत्त्वाचा आहे. औद्योगिक क्रांतीनंतर जगात जे बदल झाले आहेत ते समजण्यासाठी तंत्रविद्या व शोषण ह्यांचे परस्पर संबंध जाणून घेतले पाहिजेत.

त्यावर प्रकाश पडला तर शोषणाविषयी प्रस्थापित झालेल्या ऐतिहासिक आकलनास आपणास कदाचित मुरड घालावी लागेल.

× × ×

मार्क्सने मुक्त आणि शोषणरहित मानवाचे एक उदात्त स्वप्न पाहिले आणि आपल्याला भावलेले स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी तो एखाद्या उग्र तपस्या केलेल्या ऋषींसारखा 'शापात अपि, शरात् अपि' म्हणजे भावनेच्या एका विलक्षण तीव्रतेने आणि बौद्धिक शरसंधानासाठी एक अक्षय्य भाता उघडा ठेवून तात्त्विक आणि व्यावहारिक पातळ्यांवर जन्मभर झगडला. त्यामुळे तो महापुरुष ठरलेला आहे. त्याची आणि माझी स्वप्नभूमी दुर्दैवाने एक नाही, पण ते महत्त्वाचे नाही. कोणत्याही विचारवंताच्या संकल्पना पारखून घेणे, त्यांना मुरड घालणे, अवश्य तर त्यांचा आटोप विस्तारणे आणि आपल्या भोवतालच्या जीवनाचे आपले अवलोकन अधिक तीक्ष्ण करणे हीच त्याला आदरांजली असते. अशी आदरांजली वाहण्याचा मी केलेला तोडका-मोडका प्रयत्न आपण मानून घ्याल अशी मी आशा करतो.

**परिशिष्ट : विनिमयातून शोषण**

शोषण उत्पादनाच्या क्रियेतून घडते, विनिमयाच्या नाही असे मार्क्सचे म्हणणे आहे. पण काही संदर्भातील त्याचे विवेचन या म्हणण्याला विसंवादी आहे असे मला वाटते.

'**कॅपिटल**' खंड–१, प्रकरण १० मध्ये 'कामाच्या दिवसा'चा विचार आहे. ह्यात कामगारांच्या अतिश्रमाचे [ ओव्हर वर्क ] वर्णन आहे. ते मार्क्सच्या मजुरी-सिद्धांताशी विसंगत असल्याचे ध्यानात येते. मार्क्स आपल्या मूळ सिद्धांतात म्हणतो की, भांडवलदार कामगाराची 'श्रमशक्ती' विकत घेतो. पण या प्रकरणात दिलेली उदाहरणे (१२ ते क्वचित् ५० तास) अशी आहेत की त्यात कामगार आपल्या 'शक्तीपलीकडे' काम करतात. त्यातून त्यांच्या शरीर-प्रकृतीची दैना होते, मृत्युदर वाढतो व कामगारांचा वंशच संपून जाईल अशी भीती निर्माण होते. पण याचा सरळ अर्थ असा होतो की, श्रमशक्तीच्या मूल्यात श्रमशक्तीहून अधिक काही घेतले जाते. म्हणजेच श्रमशक्तीचे योग्य मूल्य मिळत नाही.

श्रमशक्ती म्हणजे काय व ती उत्पन्न होण्यासाठी आवश्यक असलेली मजुरी म्हणजे किती याचा सविस्तर खुलासा मार्क्सने अनेक संदर्भात केला आहे आणि मागेच आपण तो पाहिला आहे. तो म्हणजे मजूर धडधाकट राहिला पाहिजे आणि त्याच्याबरोबर त्याच्या कुटुंबाच्याही गरजा भागल्या पाहिजेत. असे झाले तरच पुढची पिढी कामाला हजर होईल.

मार्क्सने ह्या संदर्भात कामगाराने मालकाला उद्देशून केलेले एक काल्पनिक भाषण दिले आहे. त्यातून हा विचार अधिक स्पष्ट होईल.

"मी तुला जी वस्तू विकली आहे ती इतर वस्तूंपेक्षा वेगळी आहे. कारण ती स्वतःच्या मूल्याहून अधिक मूल्य (अतिरिक्त मूल्य) निर्माण करते. म्हणून तर ती तू विकत घेतलीस.... बाजारपेठेत एकच कायदा चालतो तो म्हणजे वस्तूंच्या विनिमयाचा हे तुला आणि मला दोघांनाही माहीत आहे. वस्तू एकदा विकत घेतल्यावर तिचा वापर कसा करायचा हे खरेदीदार ठरवतो, विक्रेता नव्हे हे मला माहीत आहे म्हणून माझ्या श्रमशक्तीचा वापर तुझ्या अधीन आहे. पण तू मला जी मजुरी देतोस तिच्यातून माझी श्रमशक्ती पुन्हा निर्माण झाली पाहिजे आणि मला ती पुन्हा विकता आली पाहिजे. वाढत्या वयामुळे मी गलितगात्र होणे वगैरे शक्य आहे, पण ते सोडता सर्वसाधारण क्षमतेने, सर्वसाधारण शरीरप्रकृतीने आणि सर्वसाधारण उत्साहाने मला पुन्हा उद्या सकाळी कामावर येता आले पाहिजे. तू 'बचत' आणि 'उपभोगरहितते'च्या [ ॲबस्टिनन्स ] गप्पा नेहमी मारतोस. छान ! मग मलाही माझ्या शक्तीची बचत केली पाहिजे आणि तिचा अपव्यय होऊ देणे टाळले पाहिजे. माझ्या श्रमशक्तीचा मी तेवढाच अंश तुला देईन की जो सर्वसाधारण मुदतीचा असेल आणि ज्यामुळे माझ्या शरीराची निरोगी अवस्थेत वाढ होईल. पण तू माझा कामाचा दिवस अमर्याद

वाढविलास तर माझी शक्ती एका दिवसात इतकी संपवशील की, जी मला तीन दिवसांतही भरून काढता येणार नाही. तुला माझे श्रम मिळतात पण माझा जीव जातो. [ आय् लूज इन् सब्स्टन्स ]....हे आपल्या कराराच्या आणि विनिमयाच्या कायद्याच्या विरुद्ध आहे. म्हणून कामाचा दिवस सर्वसाधारणच असला पाहिजे अशी माझी मागणी आहे– मी कामाचा सर्वसाधारण दिवस मागतो ह्याचा अर्थ कोणत्याही इतर विक्रेत्याप्रमाणे मी माझ्या कामाचे योग्य मूल्यच मागतो."[६२]

भांडवलदाराने कामाचा दिवस सर्वसाधारण मर्यादेपेक्षा वाढवला तर ते 'कराराच्या आणि विनिमयाच्या कायद्याविरुद्ध' आहे, सर्वसाधारण दिवस मागणे म्हणजे 'कामाचे योग्य मूल्य' मागणे, ही वरील उताऱ्यातील विधाने मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहेत. कामगाराने आपल्या शक्तीपलीकडचे काम करणे म्हणजे त्याला त्याच्या योग्य मूल्यापेक्षा कमी मूल्य मिळणे हाच त्याचा अर्थ आहे. भांडवलदार 'श्रमशक्ती' तिच्या मूल्याने घेतो हे खरे पण वापरतो ते श्रमशक्तीपेक्षा काहीतरी अधिक. कमी किमतीत जास्त किमतीची वस्तू तो घेतो. आता आपल्या लक्षात येईल की, मजुराची श्रमशक्ती भांडवलशाहीत त्याच्या योग्य त्या श्रममूल्यानेच विकत घेतली जाते, विनिमयमूल्यातून शोषण घडत नाही, ते फक्त उत्पादनाच्या प्रक्रियेत घडते, हे सर्व म्हणणे या ठिकाणी गळून पडते.

पण तरीही हे भांडवलशाहीच्या नियमात बसते असे दाखविण्याचा मार्क्सचा खटाटोप आहे. त्याने असे म्हटले आहे की, एकदा श्रमशक्ती विकत घेतल्यावर तिचा वापर करण्याचा सर्व अधिकार भांडवलदाराला आहे. उलट श्रमशक्तीपलीकडे काम करणे नाकारण्याचा श्रमिकाचा हक्क आहे आणि दोघांचेही हे हक्क बरोबरच आहेत. हक्क विरुद्ध हक्क [ राईट अगेन्स्ट राईट ] असे हे द्वंद्व आहे आणि या द्वंद्वात जी बाजू प्रभावी ठरेल तिला अनुकूल असे कामाचे तास पडतील असे मार्क्सचे म्हणणे आहे.[६३] भांडवलदारांचा पक्ष प्रबळ असेल तर कामाचे तास अधिकतम मर्यादेच्या बाजूकडे झुकतील; मजुरांचा पक्ष अधिक प्रबळ असेल तर ते न्यूनतम बाजूकडे झुकतील. या दोन पक्षांच्या सापेक्ष प्रबलतेला अनुसरून कामाचे तास स्थिरावतील.

शाकुंतलाच्या पाचव्या अंकात कालिदासाने 'राईट अगेन्स्ट राईट' असे एक बिनतोड नाट्य उभे केले आहे. त्यात दुष्यंताची बाजू न्यायाची आहे. कारण आपण शकुंतलेशी लग्न केले आहे हे दुर्वासाच्या शापामुळे तो पूर्णपणे विसरून गेलेला आहे. शकुंतलेची बाजू न्याय्य आहे याचे कारण तिचे दुष्यंताशी लग्न झालेले आहे आणि तिच्या पोटात दुष्यंताचे बीज आहे ही वस्तुस्थिती आहे. पण मार्क्सने उभे केलेले भांडवलदार-कामगार ह्यांचे नाट्यमय द्वंद्व कृत्रिम आहे. 'राईट अगेन्स्ट राईट' असा प्रकार खरे म्हणजे त्यात नाही, कारण 'राईट' ची बाजू वरचे भाषण करणाऱ्या कामगाराकडे फक्त आहे. मार्क्सच्याच अगोदरच्या विवेचनाप्रमाणे श्रमशक्तीतून जादा काही घेण्याचा भांडवलदाराला काही अधिकार नाही.

श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा कमी मजुरी देणे काय किंवा श्रमशक्तीचे मूल्य देऊन श्रमशक्तीपेक्षा अधिक कामाचे तास विकत घेणे काय या दोन्हीत तत्त्वतः फरक नाही. दोन्हींचे परिणाम एकच आहेत: कामगारवर्गाच्या शरीर-प्रकृतीची वाढती दैना. आणि दोन्हींमध्ये श्रममूल्य सिद्धांताला छेद जातो. एकूण, श्रमिकाला त्याचे योग्य मूल्य मिळते आणि मिळत नाही अशा दोन परस्पर विरुद्ध भूमिकांमध्ये मार्क्सचे विवेचन हेलकावे खाते. ह्याचे कारण असे दिसते की, डोळ्यांना दिसत असणारे कामाच्या दिवसाच्या दीर्घीकरणाचे [ लेंग्दनिंग ऑफ द वर्किंग डे ] प्रत्यक्ष वास्तव मार्क्सला आपल्या सिद्धांताच्या चौकटीत बसवता आलेले नाही.

ही अडचण मार्क्सच्या लक्षात आलेली नाही असे नाही. कामगारांचा 'वंश' कायम राहिला पाहिजे, वंशछेद होता कामा नये इतकी मजुरी किंवा कामाचे तास त्याला मिळाले पाहिजेत, ह्या आपल्या मूळ गृहीतकृत्याशी भांडवल-दाराचे वास्तवातले वर्तन सुसंगत नाही हे त्याच्या ध्यानात आले आहे. खरे म्हणजे हा वंशच्छेद भांडवलदारांच्या स्वार्थाच्या दृष्टीनेही धोक्याचा आहे; कारण कामगारच संपले तर शोषण कोणाचे करणार आणि शोषण नाही तर अतिरिक्त मूल्य कुठले? म्हणून मार्क्सने म्हटले आहे, "भांडवलाच्या स्वहिताच्या दृष्टीने पाहिले तर कामाचा दिवसच बेताचा [ नॉर्मल ] असला पाहिजे असे दिसून येईल."[६४]

पण या अडचणीतून मार्क्सने काढलेला मार्ग चमत्कारिक आहे. तो म्हणजे कामगारांचा वंश एका अर्थाने

संपत नाही. एका ठिकाणचे कामगार नाहीसे होत आले तर दुसरीकडे उपलब्ध होतात. भांडवलदारांना त्यामुळे कामगारांची वाण पडत नाही. इंग्लंडमध्ये कामगार उद्ध्वस्त झाले तर आयर्लंडमधले हजर होतात. लंडनमधल्या पावरोटीच्या धंद्यातले कामगार संपले की, जर्मनीमधून ओघ सुरू होतो.[६५] म्हणजे बाहेरच्या कामगारांची आवक [इमिग्रेशन] हे भांडवलदारांच्या आपापतः स्वहितविरोधी वाटणाऱ्या वर्तणुकीचे कारण म्हणून मार्क्सने दिले आहे.

पण हेही फारसे समाधानकारक न वाटल्यामुळे की काय मार्क्सने म्हटले आहे, "कामगारांना दैन्य प्राप्त होऊ नये याची काळजी घ्यायला भांडवलदारांना भरपूर कारण आहे. तरीही व्यवहारात मात्र त्याची वर्तणूक अशी असते की, कधी काळी पृथ्विगोल सूर्यावर पडून भस्मसात होणार आहे ह्या शक्यतेचा त्यांच्या मनावर जेवढा परिणाम होईल तेवढाच मानववंशाच्या संभाव्य अधोगतीचा आणि निर्मूलनाचा होईल.....'आप मेला जग बुडाला.' [ आफ्टर मी द डेल्यूज] हेच प्रत्येक भांडवलदाराचे आणि भांडवलशाही राष्ट्राचे घोषवाक्य असते".[६६]

ही दोन्ही स्पष्टीकरणे चिंत्य आहेत. एकात कामगारांची बाहेरच्या देशातून आवक झाल्यामुळे भांडवलदारांची अडचण होत नाही असे म्हटले आहे ते सिद्धांताच्या प्रक्रियेच्या दृष्टीने चूक आहे आणि दुसऱ्यात आपले पहिले म्हणणे सगळेच चूक असल्याची अत्यंत स्पष्ट शब्दांत कबुली आहे. भांडवलदार श्रमशक्तीचे मूल्य देताना कामगारांचे वंशसातत्य राहील आणि त्याची शरीरप्रकृती धड राहील इतकी मजुरी देतो असे विधान मुळात करून आता भांडवलदाराची तशी इच्छाच नसते असे सर्वस्वी उलटे विधान करण्यात आले आहे.

ह्या प्रश्नाचा खोलात जाऊन विचार करता असे दिसून येते की, मुळात मजुरीचा दर कामगारांचे वंशसातत्य आणि आरोग्य हे लक्षात घेऊन भांडवलदार ठरवतो असे मार्क्सचे गृहीतच अवास्तव आहे. व्यक्तिशः कोणत्याही भांडवलदाराला श्रमाचा पुरेसा पुरवठा झाला की त्याचे भागले. दूरवरचा विचार तो करीत नाही आणि समाजाचे भवितव्य काय ह्याच्याशी त्याला कर्तव्य नाही. सामाजिक फायदेतोटे लक्षात घेऊन व्यक्ती आपल्या आर्थिक व्यवहारांचे मूल्यमापन आणि नियमन करीत नाही ही तर भांडवलशाहीवरची मार्क्स धरून अनेकांची मूलभूत टीका आहे आणि शासकीय नियोजनाच्या विचारप्रणालीचा आणि समाजवादी विचाराचा तो पाया आहे. त्यामुळे मुळातले गृहीतकृत्यच अवास्तव आणि म्हणून मार्क्सच्या एकूण विचारधारेशी विसंगत होते.

प्रा. पिगू ह्यांनी कामाच्या दिवसाच्या संदर्भात ह्या प्रश्नाची चर्चा केली आहे. तिच्याकडे आपले लक्ष मी वेधू इच्छितो. कामाचा दिवस लहान असता तर कामगार आणि मालक या दोघांचेही त्यात कल्याण होईल असे असूनसुद्धा भांडवलदाराच्या आपल्या पायापुरते पाहणाऱ्या ऱ्हस्वदृष्टीमुळे असे घडत नाही असे ते म्हणतात. "या धंद्याच्या एका विशिष्ट शाखेत विशिष्ट प्रकारच्या कामाची मक्तेदारी पेढीकडे [फर्म] आहे आणि म्हणून तेच कामगार कायमचे ठेवून घेणे तिला जरूर आहे, त्याच धंद्यात कामगारांना अतिश्रमापासून वाचविण्याची मालक दक्षता घेतील. पण ज्या–ज्या ठिकाणी मालक आणि मजूर यांच्यामध्ये कायमचा संबंध नाही त्या–त्या ठिकाणी कामगारांना जादा काम करायला लावणे मालकाच्या फायद्याचे ठरते, मग एकूण उत्पादनाचे काहीही होवो."[६७]

प्रा. पिगू ह्यांनी ह्या संदर्भात एका कारखानदाराचेच म्हणणे उद्धृत केले आहे. ते ह्या प्रश्नावर अधिकृत प्रकाश टाकणारे आहे असे समजायला हरकत नाही.

> "कामगारवर्गाला सुस्थितीत ठेवण्यात मालकाला काही स्वारस्य नसते. आपल्या तात्कालिक मागणीला पुरेसा इतका कार्यक्षम श्रमांचा पुरवठा व्हावा इतकीच त्याची इच्छा असते. आणि ह्या धोरणामुळे अखेरीस कामगारांची टंचाई निर्माण होणार असली तरी स्पर्धेवर आधारलेल्या आपल्या प्रचलित अवस्थेत एवढा दूरवरचा विचार करणे त्याला परवडत नाही. अशा रीतीने सार्वत्रिक आणि अंतिम हितापेक्षा तात्कालिक आणि मर्यादित हिताचेच तो प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे त्याचा दृष्टिकोण समग्र राष्ट्राच्या हिताच्या स्पष्टपणे विरोधी असतो."[६८]

खरे म्हणजे मार्क्सनेच गुलाम आणि मुक्त कामगार ह्यांची तुलना करताना प्राध्यापक पिगू ह्यांनी केलेला फरक लक्षात आणून दिलेला होता. गुलाम हा एकाच मालकाशी जोडलेला असतो म्हणून त्याला सर्वसाधारण सुस्थितीत

ठेवणे मालकाच्या दृष्टीने गरजेचे असते, भांडवलशाहीत मात्र कामगार एका मालकाशी जोडलेला नसल्याने त्याची देखभाल करण्याचे मालकाला कारण नसते, आणि म्हणून कामगाराची स्थिती गुलामापेक्षा वाईट असते असे मार्क्सचे प्रतिपादन आहे.* असे असताना मजुरीच्या दराचे विवेचन करताना मार्क्सने वेगळे गृहीत करावे ही आश्चर्याची गोष्ट आहे.

मूळ भाषणात शोषणाचे तिसरा व चवथा असे दोन प्रकार दिले आहेत. त्यात तर स्पष्टपणे मजुरीची पातळी मूल्याच्या म्हणजे सममूल्याच्या खाली जाण्याचा प्रकार आहे. येथेही वरचाच दोष मार्क्सच्या पदरी येतो.

---

* अर्थात येथेही मार्क्स पुन्हा सुसंगत नाही. गुलामांच्या पुरवठ्यात कमतरता नसली तर अतिश्रमामुळे गुलाम मेला तरी मालकाला त्याचे काही नाही असे मार्क्स म्हणतोच. पाहा Capital, Vol. I, पृष्ठ २५३–५४.

---

## संदर्भ टीपा :


१. Vladimir G. Simkhovitch, *Marxism Versus Socialism*, Williams and Norgate, London, पृ. ११–१२. पदटीपेत उद्धृत. रोझा लक्झेंबर्ग वगैरेंनीही न्यायाच्या कल्पनेचा उपहास केल्याचे ह्या पुस्तकात दाखविले आहे. स्वत: लेखकानेही अशीच भूमिका मांडली आहे; पण तिच्याशी विसंवादी विधानेही केली आहेत.

२. Robert Tucker, " Marx and Distributive Justice ", in Carl J. Friedrich and John W. Chapman ( ed. ), *Justice*, Atherton Press, New York, 1963.

३. T. B. Bottomore ( Trans., ed. ), *Karl Marx : Early Writings*, C. A. Watts and Co., London, 1963, पृ. १२१.

४. K. Marx and F. Engels, *Selected Works in One Volume*, Progress Publishers, Moscow, 1977, पृ. ४५.

५. तत्रैव पृ. ८३.

६. तत्रैव पृ. ८७.

७. K. Marx, *Capital*, Vol. I, Progress Publishers, Moscow, 1978, पृ. २६०, पदटीप १.

८. K. Marx, *Value, Price and Profit*, George Allen and Unwin, London, 1938, पृ. ५७–५८.

९. K. Marx, *Critique of the Gotha Programme*, Foreign Languages Press, Peking, 1976, पृ. १६.

१०. K. Marx, *Critique of the Gotha Programme*, with Appendices by Marx, Engels and Lenin, National Book Agency, Calcutta, 1944.

११. तत्रैव.

१२. K. Marx, *Critique* ... उपरोक्त.

१३. उदा. बाब्वेफ्, सॉं सीमॉं, ग्रे, हॉल प्रूधॉं इ. पाहा Alexander Gray, *The Socialist Tradition from Moses to Lenin*, Longmans, Green and Co., London, पृ. १०५, १६४, २३९, २६८, २९५.

१४. *Oxford English Dictionary*, *Webster's English Dictionary*.

१५. K. Marx, *Capital,* Vol. I, पृ. १९८.

१६. तत्रैव.

१७. तत्रैव पृ. ४९.

१८. पाहा शुंपीटर : " His (Marx's) merit and achievement were that he perceived the weakness of the various arguments by which the tutors of the mass mind before him had tried to show how exploitation came about... None of the usual slogans about bargaining power and cheating satisfied him. " J. A. Schumpeter, *Capitalism, Socialism and Democracy,* George Allen and Unwin, London, 1957, p. 26.

तसेच Maurice Dobb, "Classical Political Economy and Marx", in David Horowitz (ed), *Marx and Modern Economics,* Monthly Review Press, New York, 1968, p. 53.

१९. संदर्भासाठी पाहा, V. M. Dandekar, *Peasant-Worker Alliance : Its Basis in the Indian Economy,* Central for Studies in Social Sciences, Calcutta, 1979.

२०. "Every condition of the problem is satisfied, while the laws that regulate the exchange of commodities, have been in no way violated. Equivalent has been exchanged for equivalent " *Capital,* Vol. I, पृ. १८९. पण हे सर्वस्वी खरे दिसत नाही. उदा० कम्युनिस्ट जाहिरनाम्यात पुढील विधान आहे–"कारखानदारांनी केलेले शोषण संपते न संपते आणि मजुरांच्या हातात त्याची मजुरीची रोकड पडते न पडते तोच, बूर्झ्वा वर्गातील इतर घटक म्हणजे घरमालक, दुकानदार, गहाणवटीचा धंदा करणारा सावकार (हे सगळे) त्यांच्यावर तुटून पडतात. " *The Communist Manifesto,* in K. Marx and F. Engels, *Selected Works,* Progress Publishers, Moscow, Fourth Printing, 1977, पृ. ४२. 'तुटून पडणे' (Set upon) ह्यात शोषणाचा ध्वनी आहे.

२१. "The circumstance that on the one hand the daily substance of labour-power costs only half a day's labour, while on the other hand the very same labour-power can work during a whole day, that consequently the value which its use during one day creates, is double what he pays for its use, this circumstance is, without doubt, a piece of good luck for the buyer, but by no means an injury to the seller". K. Marx, *Capital,* Vol. I, पृ. १८८. पुढे जवळजवळ ह्याच शब्दांत एंगल्सने हेच विधान केले आहे : "The circumstance that the value which the use of it (i. e. the labour power) creates is double its own value for a day is a piece of especially good luck for the buyer, but on the basis of the law of exchange of commodities by no means an injustice to the Seller", F. Engels, *Herr Eugen Duhring's Revolution in Science,* 1947, पृ. ३०५, शिवाय, Robert C. Tucker, उपरोक्त पृ. ३१५ वर उद्धृत. मात्र ह्याच्या विरुद्ध जाणारा ध्वनी मार्क्सच्या पुढील उताऱ्यात आहे :

" He ( i. e. the capitalist ) sells not only what has cost him an equivalent, but he sells also what has cost him nothing, although it has *cost his workman labour.* The cost of the commodity to the capitalist and its *real cost* are different things ". K. Marx, *Value, Price and Profit,* George Allen and Unwin, London, 1938, पृ. ६५–६६.

२२. *Capital,* Vol. I, पृ. ५०५.

२३. हा फरक G. A. Cohen ह्यांनी केला आहे आणि त्यांच्या मते उत्पादन हा शब्द ह्या संदर्भात अधिक नेमका आहे, पहा " The labour Theory of Value and the Concept of Exploitation ", in Ian Steedman, Paul Sweezy and others, *The Value Controversy,* Verso Edition, London, 1981.

२४. Maurice Dobb, *Theories of Value and Distribution since Adam Smith,* Cambridge, 1973, पृ. १३७–३८, १४६ शिवाय " Classical Political Economy and Marx ", in David Horowitz ( ed. ), *Marx and Modern Economics,* Monthly Review Press, 1968.

२५. रिकार्डियन समाजवाद्यांसाठी पाहा Alexander Gray, उपरोक्त. शिवाय Anton Menger, *The Right to the Whole Produce of Labour, Macmillan, London,* 1899.

२६. *Capital,* Vol. I, पृ. १८०–८१.

२७. K. Marx and F. Engels, *Selected Works,* उपरोक्त पृ. ६९–७०.

२८. पाहा, Arun Bose, *Marxian and Post–Marxian Political Economy : An Introduction,* Penguin Books, 1975, पृ. ६४; Joan Robinson, *An Essay on Marxian Economics.* व्हेब्लेन, मॅंडेल ह्यांचेही मत असेच आहे असे बोस म्हणतात. शिवाय पाहा R. N. Carew Hunt, *The Theory and Practice of Communism,* Pelican, 1978, पृ. ८२.

२९. *Capital,* Vol. I, पृ. २२३.

३०. तत्रैव पृ. २४४–२४६.

३१. तत्रव पृ. २३४–३५.

३२. तत्रैव पृ. २५३.

३३. तत्रैव पृ. १९२, पदटीप १.

३४. T. B. Bottomore......उपरोक्त पृ. ६९.

३५. F. Engels, *The Condition of the Working Class in England,* Progress Publishers, Moscow, 1977, पृ. १०४.

३६. T. B. Bottomore, उपरोक्त, पृ. ६९–७०.

३७. तत्रैव पृ. ७१.

३८. F. Engels, *The Condition*......उपरोक्त, पृ. १०४.

३९. *Capital,* Vol. I, पृ. ४०६.

४०. F. Engels, *The Conditions,*...पृ. १०७.

४१. तत्रैव पृ. १०४.

४२. तत्रैव पृ. १०४ " तुकड्या-तुकड्याने " विकले जाण्याचा उल्लेख मार्क्सनेही वेज् लेबर ॲण्ड कॅपिटलमध्ये केला आहे.

४३. तत्रैव पृ. १०४, शुंपीटर व स्वीझी ह्यांनी मार्क्सच्या गुलामी संकल्पनेचा असाच अनुवाद केला आहे. पाहा Schumpeter, उपरोक्त, Paul M. Sweezy, *The Theory of Capitalist Development*, Dennis Dobson, London, 1949, पृ. ५९.

४४. *Capital*, Vol. I, पृ. २२६–२९.

४५. तत्रैव.

४६. वर टीप ४१ पाहा.

४७. K. Marx, *Critique of the Gotha*...उपरोक्त, पृ. २३.

४८. Ronald L. Meek, "Marx's Doctrine of Increasing Misery", in *Economics, Ideology and Other Essays*, Chapman and Hall, London, 1967, पृ. ११७.

४९. *Capital*, Vol. I, पृ. १८७.

५०. J. B. Clark, *The Distribution of Wealth : a Theory of Wages, Interest and Profits*, The Macmillan Co., New York, 1927, A. C. Pigon, *Economics of Welfare*, Macmillan, London, 1950, पृ. ८५, ४६७, ५५६–७१, Appendix III, पृ. ८१३–१४. Joan Robinson, *Economics of Imperfect Competition*, Macmillan and Co., London, 1933, प्रकरणे २५ आणि २६.

५१. पाहा, F. A. Hayek (ed.), *Capitalism and the Historians*, Routledge and Kegan Paul, London, 1954.

५२. पाहा, प्रभाकर पाध्ये, *मानव आणि मार्क्स*, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८०, पृ. १३५–१३६.

५३. Milovan Djilas, *The New Class : An Analysis of the Communist System*, F. A. Praeger, New York, 1957. Alex Inkeles, "Social Stratification and Mobility in the Soviet Union", in Reinhard Bendix and Seymour Martin Lipset (ed.), *Class, Status and Power*, Routledge and Kegan Paul, London, 1954.

५४. अनिल अवचट, *माणसं*, मौज, मुंबई १९८०.

५५. स. ह. देशपांडे, "गैरलागू सिद्धांतनाचा एक नमुना", अर्थसंवाद, खंड १, अंक ३, ऑक्टोबर–डिसेंबर १९७७ आणि "Transforming Traditional Agriculture : A Delayed Critique of T. Schultz." *Economic and Political Weekly*, Vol. XII, No 53, Dec. 31, 1977.

५६. Bertrand Russell, *Power : A New Social Analysis*, George Allen and Unwin, London, 1938.

५७. अरुण लिमये, क्लोरोफॉर्म.

५८. अनिल अवचट, संभ्रम, अमेय प्रकाशन, नागपूर, १९८०.

५९. *Capital*, Vol. I, प्रकरण १५.

६०. पाहा, George M. Foster, "Interpersonal Relations in Peasant Society", *Human Organisation*, Vol. 19, No. 4, Winter 1960-61, also *American Anthropologist*, Vol. 67, 1965, Edward C. Benfield, *Moral Basis of a Backward Society*, The Free Press, Illinois.

६१. Harvey Leibenstein, *Economic Backwardness and Economic Growth*.

६२. *Capital*, Vol. I, पृ. २२४–२५.

६३. तत्रैव, पृ. २२५.

६४. तत्रैव, पृ. २५३.

६५. तत्रैव, पृ. २५३–५४ शिवाय एंगल्स *Conditions of the Working Class*, उपरोक्त, पृ. १०४, ११६–१९.

६६. *Capital*, Vol. I, पृ. २५६–५७.

६७. A. C. Pigou, *Economics of Welfare*, उपरोक्त, पृ. ४६६.

६८. तत्रैव.

## लेखक परिचय

**स. ह. देशपांडे** : अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद. प्राध्यापक, कृषि अर्थशास्त्र, मुंबई विद्यापीठ.

**नीळकंठ रथ** : संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

**व. श्री पटवर्धन** : प्रपाठक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

**नी. वि. सोवनी** : कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.

**व. गो. सहस्रबुद्धे** : सेवानिवृत्त प्राध्यापक, प्राचार्य. अर्थशास्त्रावरील अनेक पाठ्यपुस्तकांचे मान्यवर लेखक.

# अर्थशास्त्राचे अध्ययन-अध्यापन*

( नीळकंठ रथ )

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे हे सातवे अधिवेशन आयोजित करणाऱ्या, एस्. एन्. डी. टी. विद्यापीठाच्या स्थानिक समितीने एका अमराठी अर्थशास्त्र शिक्षकाला उद्घाटनाला बोलावण्याची जी उदारता दाखविली त्यामुळे खरं तर मी थोडासा भारावून गेलो आहे. अशीच उदारता इथे जमलेले प्रतिनिधी आणि इतर आमंत्रित मंडळी दाखवतील आणि माझ्या भाषणाचा हा मराठी अनुवाद वाचताना होणाऱ्या चुकांबद्दल क्षमा करतील अशी मला आशा आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेसारख्या संस्थेची स्थापना ही एक आवश्यक आणि म्हणूनच स्वागतार्ह अशी घटना आहे. गेल्या दहापंधरा वर्षांत, विद्यार्थी, मोठ्या संख्येने आणि वाढत्या प्रमाणात, पदवी आणि पदव्युत्तर वर्गांतून अर्थशास्त्र आणि तत्सम इतर सामाजिक शास्त्रांचा अभ्यास मराठीतून करू लागले आहेत. अर्थातच, शिकण्या आणि शिकविण्यासाठी, मोठ्या प्रमाणात मराठीतून अर्थशास्त्रीय वाङ्मय उपलब्ध होण्याची गरज आहे. याचबरोबर अर्थशास्त्राच्या शिक्षकांनी आणि अभ्यासकांनी वेळोवेळी एकत्र जमून अर्थशास्त्रीय प्रश्नांची चर्चाही निखळ मराठीतून करायला हवी. ही परिषद या दोन्हीही गोष्टी घडवून आणण्यात प्रयत्नशील आहे ही आनंदाची बाब आहे.

एकीकडे असा मराठी भाषेचा माध्यम म्हणून उच्च शिक्षणात वापर वाढत असतानाच दुसरीकडे घडून येत असलेल्या एका गोष्टीकडे मला आपले लक्ष वेधायचे आहे. आवश्यक ते वाङ्मय इंग्रजीतून वाचण्याची आणि समजावून घेण्याची, विद्यार्थ्यांची आणि तरुण शिक्षकांची क्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. परिणाम असा झाला आहे की, उपलब्ध अशा प्रचंड अर्थशास्त्रीय वाङ्मयापर्यंत, केवळ ते इंग्रजीतून आहे म्हणून, हे विद्यार्थी पोचूही शकत नाहीत. ही मोठी चिंतेची बाब आहे. जरी यातून उपयुक्त वाङ्मय मराठीतून निर्माण होण्यास काहीसे प्रोत्साहन मिळाले तरी नजीकच्या भविष्यकाळात तरी निदान, यातून उच्च अभ्यासासाठी पुरेसे वाङ्मय उपलब्ध होईल असे मला वाटत नाही. विशेषतः पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासाची गरज यातून भागविली जाणे खचितच कठीण आहे. युरोपातील अनेक राष्ट्रांतून तसेच जपानमध्ये त्यांच्या त्यांच्या भाषांमधून आपल्या मराठीपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात अर्थशास्त्रीय वाङ्मय उपलब्ध आहे. तरीही ती राष्ट्रे, इंग्रजीतील अर्थशास्त्रीय आणि इतर विषयांचे जे ज्ञान उदंड वाढत चालले आहे त्याचा लाभ घेण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकायला उद्युक्त करीत आहेत. आपल्या बाबतीतही ही गोष्ट अपरिहार्य अशीच आहे. आपल्या शाळा-कॉलेजांतून माध्यम जरी मराठी (किंवा प्रादेशिक भाषा) हे असले तरी इंग्रजी हा एक सक्तीचा विषय म्हणून शिकविण्यामागे हीच भूमिका प्रामुख्याने आहे. इंग्रजी सुलभतेने बोलता

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पुणे येथे दि. २८–३० ऑक्टोबर, १९८३ ह्या दिवसांत भरलेल्या सातव्या वार्षिक अधिवेशनातील उद्घाटनाचे भाषण

किंवा लिहिता येणे यापेक्षाही इंग्रजीतील वाङ्मय सहजतेने वाचता येईल व समजावून घेता येईल अशी तयारी विद्यार्थ्यांची होईल यावरच मुख्य भर दिला गेला पाहिजे. यामुळेच मला असे वाटते की इंग्रजीचे, एक 'ग्रंथालयीन भाषा' म्हणून आपल्या विद्यापीठीय शिक्षणात असलेले स्थान नाकारून चालणार नाही. तसे करणे हे अंतिमत: उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात तरी धोक्याचे आहे. हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत आहे, आणि माझे येथील सहकारी-शिक्षक याचा तितक्याच गंभीरतेने विचार करतील अशी मला खात्री आहे.

या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला करायचा आहे. परिषद किंवा तिचे नियतकालिक यांनी या गोष्टींकडे आपले लक्ष वळविले आहेच. माझा मुद्दा आहे तो मराठीतून प्रकाशित होणाऱ्या शास्त्रीय साहित्याच्या दर्जाबद्दलचा. हा दर्जा उत्तम असावा निदान प्रसिद्ध होणारे वाङ्मय चुकीचे नसावे याबद्दल कुणाचे दुमत असेल असे वाटत नाही. इंग्रजीत प्रसिद्ध होणाऱ्या दर्जेदार अर्थशास्त्रीय साहित्यापासून आपले विद्यार्थी आणि अनेक तरुण शिक्षक देखील वंचित होत असल्याने अर्थशास्त्राच्या मराठीतील पुस्तकांमधून, त्यातही प्रामुख्याने क्रमिक पुस्तकांतून, केले जाणारे अर्थशास्त्रीय विश्लेषण किमानपक्षी चुकीचे असणार नाही याची खबरदारी घेतलीच पाहिजे. याकरिताच मराठीतून प्रसिद्ध होणाऱ्या अर्थशास्त्रीय पुस्तकांचे नेटकेपणाने केलेले टीकात्मक परीक्षण हे 'अर्थसंवाद'चे किंवा अशा वार्षिक अधिवेशनांचे एक महत्त्वाचे काम असायला हवे. आणि ते सातत्याने करत राहायला हवे. लेखकांनाही उपयुक्त ठरणारी अशीच ही बाब असून त्यांना त्यांच्या ग्रंथांच्या पुढील आवृत्त्या तरी यामुळे सुधारता येतील.

अर्थशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन याबाबतचे प्रश्न अर्थातच केवळ माध्यमाच्या प्रश्नापुरते मर्यादित नाहीत. गेली अनेक वर्षे अर्थशास्त्र शिकविताना आपण त्याचे सरळसरळ दोन भाग केलेले आहेत. एक म्हणजे सैद्धांतिक अर्थशास्त्र आणि दुसरे म्हणजे भारतीय अर्थशास्त्र. विद्यार्थ्यांची ठाम समजूत अशी असते की यातील पहिला भाग हा निव्वळ विश्लेषणात्मक असा असून दुसरा केवळ वर्णनात्मक असा आहे. त्यांच्या मनात तरी या दोन्हींचा मेळ कुठे घातला जातो असे दिसत नाही. वास्तविक आपल्या सगळ्यांनाच हे माहीत आहे की अर्थशास्त्रात काय किंवा कोणत्याही सामाजिक शास्त्रात काय, प्रत्यक्ष समाजस्थितीचे स्पष्टीकरण करण्यासाठीच केवळ अमूर्त पातळीवर तर्कशुद्ध अशी सैद्धांतिक मांडणी केली जाते. त्यामुळे हे सिद्धांत कितपत सुसंगत आहेत हे, त्यांच्यामुळे प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेचे कार्य किती नेमकेपणाने कळून येते, यावरून ठरते. परंतु बहुधा आपल्या शिकण्याशिकविण्यातून या संबंधाचे प्रतिबिंब क्वचितच पडलेले दिसून येते. उदाहरणार्थ, आपण जेव्हा चलनविषयक सिद्धांत शिकवितो तेव्हा त्याचा भारतीय चलनव्यवस्थेशी असलेला संबंध क्वचितच जोडून दाखवतो. याउलट जेव्हा भारतीय अर्थशास्त्रात चलनव्यवस्था समजावून दिली जाते तेव्हा त्याचा सैद्धांतिक संदर्भ सांगितला जात नाही. आपण जेव्हा रोजगार किंवा उत्पन्न याबाबतची समष्टी स्तरावरील प्रतिमाने शिकवितो तेव्हा त्यांचे भारतीय परिस्थितीशी असलेले नाते लक्षात आणून देत नाही. एखादे प्रतिमान कोणत्या संदर्भात आणि का महत्त्वाचे आहे हे सांगितलेच जात नाही. उत्पादनाचे सिद्धांत, उत्पादनखर्च, पुरवठा या बाबी सैद्धांतिक पातळीवर मांडताना त्यांचा संबंध, शेतमालाच्या किमान किमती ठरविण्याची शेतकऱ्यांची जी मागणी होते त्याच्याशी जोडला जात नाही; हा दुसरा भाग अभ्यासकाच्या दृष्टीने भारतीय अर्थशास्त्रात मोडतो. किंवा या परिषदेत तुम्ही ज्यावर चर्चा करणार आहात तो सहकारी संस्थांबाबतचा विषय घ्या. सबंध देशातच अशा संस्थांचे जाळे पसरले आहे. त्यातही महाराष्ट्रात तर पतपुरवठा, खरेदी-विक्री, प्रक्रिया उद्योग या क्षेत्रांमध्ये सहकारी संस्था खूपच विकसित झालेल्या आहेत. आपले ग्रामीण भागातले बहुसंख्य विद्यार्थी तर, संयुक्त भांडवली संस्थांपेक्षाही या सहकारी संस्थांशी अधिक जवळून परिचित आहेत. परंतु आपण जे सैद्धांतिक अर्थशास्त्र शिकवतो त्यामध्ये या इतक्या महत्त्वाच्या अशा संस्थांचा विश्लेषणात्मक अभ्यास अभावानेच आढळतो. हा विषय केवळ भारतीय अर्थशास्त्रात येतो आणि तोही निव्वळ वर्णनात्मक स्वरूपात. ही परिस्थिती अशीच राहिली तर, आपल्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रीय विश्लेषण (ज्याला ते 'सिद्धांत' असे म्हणतात) आणि भारतीय अर्थशास्त्र या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत असे वाटले तर त्यात नवल काय !

मी आपणापुढे मांडत असलेला हा प्रश्न केवळ पारंपरिक असे सैद्धांतिक अर्थशास्त्र आणि भारतीय अर्थशास्त्र यांच्याच संदर्भात निर्माण झालेला आहे असे मानण्याचे कारण नाही. तो इतरही विषय क्षेत्रात दिसून येतो. या अधि-

वेशनात 'मार्क्सचे अर्थशास्त्र' हा विषय चर्चेसाठी ठेवला आहे. या विषयात अनेकांना रस आहे. विशेषतः आपल्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांशी ज्यांना काही कर्तव्य आहे अशा विद्यार्थ्यांना तो खचितच महत्त्वाचा आहे. परंतु पदवी-स्तरावर किंवा पदव्युत्तर स्तरावर जिथे कुठे आपण मार्क्सचे अर्थशास्त्र शिकवतो तिथे तर या विषयाची फारच हेळसांड केली जाते. विद्यार्थ्यांपुढे केवळ अगदी अमूर्त पातळीवर मार्क्सची विधाने किंवा विश्लेषण मांडले जाते आणि त्यावरची शक्य तेवढी अलीकडची टीका सांगितली जाते. परंतु मार्क्स आणि एंगल्स यांनी युरोपच्या, ज्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपले लेखन केले त्या परिस्थितीशी वाचनातून वा अन्य तऱ्हेने विद्यार्थ्यांना ओळख करून दिली जात नाही. त्यामुळे साहजिकच, त्या काळात जी काही काटेकोर टीका या संदर्भात केली गेली आणि जी अजूनही चालू आहे ती खऱ्या अर्थाने त्यांच्यापर्यंत पोचतच नाही. आणि अर्थातच ते भारतातील आजच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीची आणि मार्क्सच्या विश्लेषणाची सांगड घालू शकत नाहीत. सैद्धांतिक अर्थशास्त्र आणि वर्तमान किंवा ऐतिहासिक अर्थव्यवहार यामध्ये उभी केलेली भिंत ही आपण शिकवित असलेल्या प्रत्येक विषयात दिसून येते.

मला या घटनेच्या परिणामांकडे आपले लक्ष वेधायचे आहे. हे परिणाम अतिशय निराशजनक आणि तेवढेच हानिकारकही आहेत. विद्यार्थी सिद्धांत शिकतो ते परीक्षेत पास होण्यासाठी किंवा स्वतःपुढे शिक्षक झालो तर इतर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी. एरवी ते सिद्धांत तो तत्काळ विसरूनही जातो. ज्यामागची विश्लेषणाची चौकट गळून पडली आहे असा भारतीय अर्थव्यवस्थेचा नुसता वर्णनात्मक आढावा घेतला की, हाच विद्यार्थी पुढील आयुष्यात शिक्षक होऊन किंवा शासकीय अधिकारी अथवा लोकनेता बनून त्यांची केवळ पोपटपंची करत राहतो. काहीजण अधिक धिटाईने, सैद्धांतिक अभ्यासाची केवळ 'पुस्तकी ज्ञान' म्हणून संभावना करतात आणि त्यात अगदीच तथ्य नाही असे नाही. आणखी एक गोष्ट, सर्वसामान्य विद्यार्थ्यांना यामुळेच विषयात रसही निर्माण होत नाही. वर्गात शिकवले जाणारे सैद्धांतिक अर्थशास्त्र जर ज्या जगात विद्यार्थी वावरतात त्या जगातील घटनांशी संबंध जोडून शिकवले तर त्यांनाही आपण काही तरी खरोखरच उपयुक्त शिकत आहोत असे वाटेल. दुर्दैवाची गोष्ट अशी की, आपल्या आजूबाजूच्या आर्थिक प्रश्नांची तार्किक मीमांसा करता येणे हा जो अर्थशास्त्र शिकण्याचा मूलभूत हेतू आहे तोच मुळी या संपूर्ण प्रक्रियेत साध्य होत नाही.

माझे मत असे आहे की आपल्या शिकवण्यातून आणि क्रमिक पुस्तकांसारख्या आपल्या शिकविण्याच्या साधनांतून सैद्धांतिक अर्थशास्त्राच्या अभ्यासाला प्रत्यक्ष व्यवहारातील संदर्भांची जोड दिली पाहिजे आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे विश्लेषणात्मक अंगही त्यात उलगडले पाहिजे. विकसित देशांमधील काही क्रमिक पुस्तके या पद्धतीने लिहिलेली आढळतात. परंतु तीच पुस्तके इकडे पूर्णतः उपयोगी ठरत नाहीत कारण त्यांचे संदर्भ वेगळे असतात, ते भारतीय अर्थव्यवस्थेचे नसतात. मराठीतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोगी असे वाङ्मय निर्माण करीत असताना आपल्यापुढे असलेले हे एक आव्हान आहे; आपल्याला मिळालेली एक संधी आहे. आपण, सर्वच जे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सदस्य आहोत ते आता या दिशेने काही प्रयत्न करू या.

आपले या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. सखाराम देशपांडे हे एक मान्यवर असे अर्थतज्ज्ञ असून त्यांनी स्वतः या दिशेने काही प्रयत्न केलेले आहेत. त्यांचा सहकारी शेतीवरचा अभ्यास हा याच दिशेने केलेल्या अभ्यासाचा नमुना आहे. गेली काही वर्षे समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादक या नात्याने ते जे काम करीत आहेत ते परिषदेच्या कल्पनांशी आणि उद्दिष्टांशी मिळते-जुळते असेच आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशनात भरीव आणि उपयुक्त अशी चर्चा होईल याची मला खात्री आहे.

■ ■

# अर्थ शब्दाची वाट पाहे

## अर्थशास्त्र परिभाषा कोश : एक चुकीची नोंद

व. श्री. पटवर्धन

महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने "अर्थशास्त्र परिभाषा कोश" चक्रमुद्रित करून अभ्यासकांच्या सोयीसाठी उपलब्ध केला आहे. त्यात काही संदर्भ पाहात असता net assets आणि net worth या दोन संकल्पनांत गल्लत केली असल्याचे आढळले. पान २७९ वर Net assets (the excess of value of resources over liabilities to creditors...also called *net worth*) असे इंग्रजी स्पष्टीकरण देऊन निव्वळ मत्ता असा अर्थ दिला आहे. पान २८० वर net worth=net assets एवढाच मजकूर छापला आहे.

माझ्या माहितीप्रमाणे net worth आणि net assets या अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. कशा त्या पाहू या.

Net worth म्हणजे भागधारकांच्या मालकीचा एखाद्या कंपनीतील निधी. यालाच इंग्रजीमध्ये असलेला प्रतिशब्द shareholders' fund. भागधारकांनी भरणा केलेले भागभांडवल अधिक वट्ट राखीव निधी किंवा वजा संकलित तोटा. म्हणजे एखादी कंपनी जर लिलावात काढली गेली तर ती कंपनी अखेरीस ज्या निधीतून भागधारकांच्याकडे काही रकमांचे वाटप करू शकेल तो निधी.

याउलट Net fixed assets म्हणजे एखाद्या कंपनीच्या सर्व भांडवली मत्तेचे त्या मत्तेचा घसारा वजा करता उरलेले मूल्य. उदाहरणार्थ, सदर व्यवसायाची मालकीची इमारत, यंत्रसामग्री व इतर स्थिर मत्ता वगैरेचे मूळ खरेदीमूल्य जे असेल (समजा ४० लाख रुपये) त्यातून सालोसाल वर्ग केलेला घसारा निधी (समजा रुपये २२ लाख) वजा उरलेले वट्ट स्थिर मूल्य रु. १८ लाख. उघडच आहे की भांडवली मत्तेची खरेदी करताना वेळोवेळी व्यवसायाच्या भागधारकांच्या भांडवलाबरोबरच वित्तीय संस्था किंवा बँकांकडून दीर्घ/मध्यम मुदतीची कर्जे घेतलेली असणार. तेव्हा या संकल्पनेत मालमत्तेच्या मालकीचा अंश कोणता, कोणाचा व किती या गोष्टींचा संदर्भ येत नाही. फक्त स्थिर मालमत्तेचे विशिष्ट ताळेबंदाच्या दिवशी वट्ट मूल्य काय ते या net fixed assets वरून समजते.

दोन्ही संकल्पना उद्योगव्यवसायांच्या ताळेबंदाशी निगडित आहेत. net fixed assets भांडवली मालमत्ता म्हणजे स्थिर मालमत्ता. त्यात चालू वट्ट येणी ( net current assets ) मिळविल्यास येईल ती रक्कम net assets म्हणजे वट्ट मालमत्ता होईल.

१९८१–८२ च्या ताळेबंदानुसार टेल्कोची वट्ट भांडवली मालमत्ता ( net fixed assets) रुपये २०५.७५ कोटी आणि वट्ट चालू मत्ता (net current assets) रुपये १९२.५८ कोटी होती, शिवाय कंपनीने केलेल्या गुंतवणुकी (investments) ची रक्कम रुपये २.३८ कोटी होती. या तिन्हींची बेरीज म्हणजे net assets (वट्ट मालमत्ता) रुपये ४००.७१ कोटी एवढी होते. याच कंपनीचा भागधारकांचा निधी

( net worth ) रुपये १४५.९५ कोटी एवढा होता. याची फोड भरणा झालेले भागभांडवल रुपये ४३.२० कोटी आणि राखीव निधी रुपये १०२.७५ कोटी अशी होती. याचा अर्थ असा की एकंदर भागधारकांनी वेळोवेळी केलेल्या रुपये ४३.२० कोटी गुंतवणुकीच्या पायावर कंपनीने अनेक वर्षे केलेल्या उलाढालीच्या परिणामी त्या गुंतवणुकीचे १९८१–८२ वर्षअखेरी मूल्य १४५.९५ कोटी रुपये होते. म्हणजेच भांडवल गुंतविणाऱ्यांचा रुपये १०२.७५ कोटीच्या स्वरूपातील राखीव निधी हा वाढावा ( surplus ) होता. म्हणूनच या रकमेस भागधारकांचा निधी (share-holders' fund) असे संबोधिले जाते.

वरील खुलाशावरून net assets (वट्ट मालमत्ता) आणि net worth (भागधारकांचा वट्ट निधी) किंवा shareholders' fund यात फरक आहे हे ध्यानात यावे.

■ ■

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आठवे वार्षिक अधिवेशन

परिषदेचे आठवे वार्षिक अधिवेशन १९८४ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये आंबाजोगाई ( जि. बीड ) येथे स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालयाच्या विद्यमाने होणार आहे. **डॉ. वि. बा. धुगे**, अर्थशास्त्रविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे अध्यक्षस्थानी असतील.

अधिवेशनातील चर्चा-सत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत :

१. केन्स यांचे अर्थशास्त्र आणि नंतर

२. महाराष्ट्रातील नागरीकरण आणि त्याच्या समस्या

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असा असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथाकाल जाहीर करतील.

**निबंधलेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दांत विषय मांडावयाचा असून सोबत १०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. गोषवारा न दिल्यास निबंध स्वीकारला जाणार नाही.**

३१ ऑगस्ट १९८४ ही निबंध पोहोचण्याची अखेरची तारीख असून त्यानंतर निबंध स्वीकारला येणार नाही. निबंधलेखकांनी आपले निबंध **डॉ. वि. बा. धुगे,** अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पत्त्यावर पाठवायचे आहेत.

**रवीन्द्र सवनीस**
कार्यवाह – खजिनदार

# प्रा. सोवनी व विनिमयमूल्ये : प्रत्युत्तरावरील प्रतिक्रिया

नी. वि. सोवनी

जुलै-सप्टेंबरच्या अर्थसंवादच्या अंकातील प्रा. कुलकर्णी यांचे माझ्या एप्रिल-जूनच्या अंकातील उत्तरास 'प्रत्युत्तर' वाचून करमणूक तर झालीच पण हा वाद आता भरकटू लागल्याचेही जाणवले. आपली बाजू कमकुवत असल्यास पृच्छकाच्या (आक्षेपकाच्या) मूळ प्रश्नाला बगल देऊन दुसऱ्याच गोष्टींबद्दल लिहिणे ही वादविवाद तंत्रातील एक सुप्रसिद्ध क्लृप्ती आहे. यामुळे वादविवादातून तत्त्वबोध होण्याचे राहून गोंधळ मात्र निर्माण होतो असा अनुभव आहे. प्रा. कुलकर्णी यांच्या आक्षेपांना उत्तरे देताना असे करण्याचे मला काहीच कारण नसल्यामुळे मी त्यांच्या आक्षेपांना दिलेले उत्तर संपादकांच्याकडे देण्यापूर्वी प्रा. कुलकर्णी यांना दाखविले व त्यांना विचारले की, "यात तुमच्या भूमिकेचा वा प्रश्नांचा कोणताही विपर्यास झालेला आहे का ? मी त्यात केलेला खुलासा तुम्हाला अपुरा वाटतो का ? असे असल्यास त्यात अधिक विवेचन कोठे पाहिजे ?" या प्रश्नांना प्रा. कुलकर्णी यांनी नकारार्थी उत्तर दिले पण 'मला वाटलं तर मी तुमच्या उत्तरावर प्रत्युत्तर लिहीन' असे त्यांनी मला सांगितले. त्याला हरकत घेण्याचे मला काहीच कारण नव्हते व मी घेतलेही नाही. त्यांच्याशी बोलताना त्यांनी आक्षेप घेतलेल्या कोष्टकात 'वाढावा' बदलतो असे काहीसे त्यांना वाटते असे सूचित झाल्यावरून त्यासंबंधीही एक परिच्छेद मी माझ्या उत्तरात लिहिला होता. त्यासंबंधी मी त्यांना म्हटले की "माझ्याशी बोलताना असे काहीसे तुम्ही मला सांगितलेत. पण मी ज्यास उत्तर देत आहे त्या तुमच्या मूळच्या लेखात हे नाही. तेव्हा हा परिच्छेद असावा की नसावा हे मी तुमच्या मर्जीनुरूप ठरविणार आहे. तुम्ही म्हणालात तर ठेवीन, नाही म्हणालात तर काढून टाकीन." त्यांच्या इच्छेनुसारच तो काढून टाकला.

त्यांच्या 'प्रत्युत्तरात' "माझ्या लेखातील मुख्य आक्षेपाला खऱ्या अर्थाने उत्तर देण्याऐवजी इतरच काही गैरलागू मुद्दे प्रा. सोवनी यांनी निर्माण केले आहेत." हा त्यांचा आरोप वाचून मी चकित झालो. जे होऊ नये म्हणून मी वर सांगितलेला खटाटोप केला तेच नेमके मी केले आहे असे प्रा. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. ते कितपत युक्त वा बरोबर आहे ते वाचकांनीच ठरवावे ! पण हा आश्चर्याचा धक्का ओलांडून मी जेव्हा त्यांचे पुढचे विवेचन समग्र वाचले तेव्हा माझ्या ध्यानात आले की खुद्द प्रा. कुलकर्णी यांनाच माझे उत्तर वाचण्यापूर्वी आपल्या स्वतःच्या प्रश्नाविषयी विशेष स्पष्टशी कल्पना नसावी ! पण त्यातही काही बिघडले नाही. निदान आता तरी त्यांनी आपल्याकडून त्यांचा प्रश्न अगदी निखळपणे व निश्चितपणे मांडला आहे, असे मी समजतो. आणि त्याला उत्तर देतो.

माझ्या पुस्तकातील पा. ४०-४१-४२ वरील कोष्टकात मी मजुरीचा दर निम्मा झाला व नफ्याचा शून्यापासून २५ टक्क्यांपर्यंत चढला तर त्या अर्थव्यवस्थेतील विनिमयमूल्ये कशी बदलतील हे दाखवले आहे. प्रा. कुलकर्णी यांचे म्हणणे असे की अशा प्रकारे दोन्ही दर काल्पनिक घेणे चूक आहे; कारण त्या दोहोपैकी एक दर ठरला की दुसरा दर आपोआपच ठरतो व तो डावलून त्याहून निराळा काल्पनिक दर गृहीत घेणे बरोबर नाही. या संदर्भात ते प्रत्युत्तरात लिहितात : "आता या आक्षेपास उत्तर द्यावयाचे तर आपण घेतलेला २५ टक्के दर कसा शास्त्रशुद्ध आहे किंवा साफ

यांच्या विवेचनाशी कसा सुसंगत आहे हे तरी सांगावयास हवे किंवा तो पूर्णपणे काल्पनिक घेतला असून तसा तो काल्पनिक घेणेच बरोबर आहे हे तरी पटवावयास हवे. पण प्रा. सोवनींनी असे काहीच केले नाही." याच संबंधात 'प्रत्युत्तराच्या' शेवटी त्यांनी लिहिले आहे : "अर्थव्यवस्थेतील वाढावा कायम ठेवून त्याचे केवळ वेगवेगळ्या प्रकारे विभाजन करावयाचे ही स्राफा यांची पद्धत आहे व सोवनींनी त्यांच्या कोष्टकात असे केलेले नाही हा माझा मुख्य आक्षेप आहे. या पुढील उत्तरात सोवनींनी मुख्यतः या आक्षेपाला उत्तर द्यावे अशी अपेक्षा आहे." ही त्यांची अपेक्षा पुरी करण्याचा प्रयत्न करतो.

माझ्या पुस्तकातील पा. ४०-४२ वरील आक्षेपार्ह कोष्टकातील २५ टक्के हा नफ्याचा दर पूर्णपणे काल्पनिक आहे व स्राफा विचारसरणीच्या विवेचनाच्या त्या ठिकाणच्या टप्प्यावरील विशिष्ट मुद्द्यांचे स्पष्टीकरण सुलभ व्हावे म्हणून तो तसा घेतला आहे. तेथे "समजा" असे झाले तर अशी वाक्यरचना आहे त्यामुळे तो दर काल्पनिक आहे हे मी तसे पुन्हा न सांगताही समजण्यासारखे आहे. परंतु प्रा. कुलकर्णी यांच्या समाधानासाठी तसे पुन्हा सांगतो. आता विवेचनाच्या त्या टप्प्यावर तसे करणे का आवश्यक व बरोबर आहे ते सांगतो.

कोणत्याही अवघड सिद्धांतनाच्या विवेचनात आकलनाच्या सोयीसाठी सोप्या उदाहरणापासून सुरुवात करून क्रमाने अधिक जटिल व अवघड उदाहरणाकडे जाण्याची पद्धत आहे. प्रा. कुलकर्णी हे शिक्षक आहेत व त्यांना ही पद्धत अपरिचित असेल असे म्हणवत नाही. अशा विवेचनाच्या प्रत्येक टप्प्यावर काही विशिष्ट मुद्दे लक्षात येण्यासाठी कृत्रिम व टोकाची उदाहरणे घेण्याचीही पद्धती सर्वमान्य आहे. ही उदाहरणे त्या त्या टप्प्यापुरतीच तेवढा मुद्दा समजण्याच्या दृष्टीने तयार केलेली असतात व संपूर्ण सिद्धांताशी ती पूर्णपणे सुसंगत असावीत असे कोणीही अपेक्षित नाही. त्यांचा उपयोग तेवढ्या मर्यादित विवेचनासाठीच असतो. माझ्या पुस्तकातील आक्षेपार्ह कोष्टकांचेही तसेच आहे.

स्राफा यांच्या विवेचन अनुक्रमाप्रमाणे फक्त गरजेपुरतेच उत्पादन दर वर्षी करणाऱ्या साध्या काल्पनिक अर्थव्यवस्थेपासून मी सुरुवात केली आहे. दुसऱ्या टप्प्यावर ज्यात वाढावा उत्पन्न होतो अशा अर्थव्यवस्थेचा विचार केला आहे. त्यात वाढावा, त्याचे वाटप व वस्तूंची विनिमयमूल्ये ही एकाच वेळी व एकाच प्रक्रियेने ठरत असल्याने युगपद समीकरणे सोडवून काढावी लागतात हे सांगितले आहे. मग त्याच प्रतिमानात मजुरीचे दर बदलते आहेत हे गृहीतकृत्य स्वीकारण्यासाठी मजुरीचे पद निराळे दाखविण्याची सुधारणा केली आहे. मजुरी ही वर्षाच्या शेवटी दिली जाते असे गृहीतकृत्य आणखी त्यात घालून अर्थव्यवस्थेतील नफा व मजुरी ही दोन्हीही तिच्यातील उत्पादनात निर्माण होणाऱ्या वाढाव्यातून दिली जातात असे त्यामुळे प्रतिमानाचे स्वरूप होते हे सांगितले आहे. ज्यात मजुरीचे दर बदलतात व ज्यात वाढावा उत्पन्न होतो अशा अर्थव्यवस्थेत विनिमयमूल्ये कशी ठरतात हा प्रश्न त्यानंतर विचारात घेतला आहे. विनिमयमूल्ये मोजण्याचे अविचल माप असण्यावर हे अवलंबून आहे हे सांगून मग अशा मापाची सिद्धी कशी करता येईल याकडे विवेचनाचा ओघ वळला आहे. त्यात प्रथम मूलाधार व अतिरिक्त वस्तू यामधील फरक स्पष्ट करून विनिमयमूल्ये ठरविण्यात फक्त मूलाधार वस्तूच प्रस्तुत आहेत हे सांगितले आहे. मजुरीचे दर बदलल्यास विनिमयमूल्यात का व कसे बदल होतात हा प्रश्न नंतर विचारात घेतला आहे व त्या विवेचनातच प्रा. कुलकर्णी यांनी आक्षेप घेतलेली कोष्टके पा. ४०-४२ वर आलेली आहेत. त्यातूनच मग पुढच्या टप्प्यावर आवर्ती क्रांतिक प्रमाण व त्यातून संप्रमाण वस्तूची उभारणी याकडे चर्चा अभिगामी झालेली आहे. हा पुस्तकातील विवेचनाचा क्रम तपशीलवार सांगण्याचे प्रयोजन असे की ही आक्षेपार्ह कोष्टके माझ्या विवेचनात ज्या टप्प्यावर येतात त्याचा मागचा-पुढचा संदर्भ स्पष्ट करणे हे आहे. हा संदर्भ लक्षात न घेणे हा प्रा. कुलकर्णी यांची त्या कोष्टकाबद्दल चुकीची समजूत होण्याचे एक कारण आहे. या कोष्टकात कल्पिलेल्या अर्थव्यवस्थेस अद्यापी संप्रमाण वस्तूमुळे मिळणारी विनिमयमूल्ये, मजुरी व नफ्याचे दर यांना मोजण्याचे अविचल (अविकारी) माप उपलब्ध झालेले नाही व त्या मापाने अर्थव्यवस्थेतील उत्पादन मोजल्यास ज्या प्रमाणात मजुरीचा त्यातला वाटा कमी होईल त्याच प्रमाणात नफ्याचा घटेल हा स्राफा सिद्धांत अजून तिच्या क्षितिजाखालीच आहे. चर्चेच्या या टप्प्यावर युगपद समीकरणांनी एकाच वेळी नफ्याचा दर, मजुरीचा दर वाढावा व विनिमयमूल्ये ठरविणारे प्रतिमानच जारी आहे.[1] अशी युगपद समीकरणे सोडवून विनिमयमूल्ये ठरविणे हे विस्तारभयास्तव व विवेचन आटोपशीर ठेवण्याच्या दृष्टीने मला करावयाचे नव्हते. म्हणून मजुरीचा

दर व नफ्याचा दर हे दोन्ही काल्पनिकरीत्या ठरवून वापरण्याचे मी ठरविले. अशा प्रतिमानात हे दोन्ही दर ठरविल्याशिवाय विनिमयमूल्यात होणारे बदल व वाढावा हे मूर्त करता येणार नाहीत हे थोडेही गणित जाणणाऱ्यास उघड दिसेल. दोनपैकी एकच दर ठरवून का घ्यावयाचा नाही हेही त्यामुळे स्पष्ट व्हावे. एकच दर ठरवून घेतल्यास त्यामुळे व त्याच्या व्यस्त प्रमाणात दुसरा दर ठरतो (प्रा. कुलकर्णी यांच्या समजुतीप्रमाणे व त्यांनी गणित करून दाखविल्याप्रमाणे) असा स्वाभाविक पण अशा प्रतिमानात पूर्णपणे चुकीचा तर्क करण्याचा मोह होतो तो होऊ नये हे त्याचे प्रयोजन आहे. नेमका तोच विपरीत अर्थ प्रा. कुलकर्णी यांना प्रतीत झाला हे त्यांचे वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे!

अशा तऱ्हेने दोन्ही दर ठरवून घेणे हे स्राफा सिद्धांताच्या विरुद्ध आहे असा प्रा. कुलकर्णी यांचा दावा आहे. त्या सिद्धांताप्रमाणे नफ्याचा दर विनिमयमूल्ये ठरण्याअगोदरच स्वतंत्रपणे ठरतो व त्याच्या अनुषंगाने विनिमयमूल्ये ठरून वाढाव्याचे नफा व मजुरी यात वाटप होते व ते एकमेकांच्या व्यस्त प्रमाणात नेटके असते. तेव्हा नफ्याचा दर फक्त कल्पनेने ठरविणे युक्त आहे पण त्याच्याच बरोबर मजुरीचा दरही स्वतंत्रपणे ठरविणे स्राफा सिद्धांताप्रमाणे चूक आहे असे प्रा. कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. ते मान्य करावयास एक 'लहानशी' अडचण आहे. आणि ती म्हणजे अर्थव्यवस्थेतील उत्पादनप्रवाह स्राफा यांनी सिद्ध केलेल्या संप्रमाण वस्तूत मोजले तरच वरील स्राफा सिद्धांत खरा असतो एरवी नाही.[२] ही महत्त्वाची अट प्रा. कुलकर्णी यांच्या लक्षात न आल्याने माझ्या पुस्तकातील आक्षेपार्ह कोष्टकात संप्रमाण वस्तूत उत्पादन, मजुरी व नफा ही मोजलेली नसतानासुद्धा त्यांनी स्राफा सिद्धांत त्यांना लागू करून चुकीची गणिते केली आहेत. ती कोष्टके विवेचनाच्या ज्या टप्प्यावर येतात त्या टप्प्यावर संप्रमाण वस्तूचा उदयसुद्धा झालेला नाही हे मागे सांगितलेच आहे. वडाची साल पिंपळाला चिकटविण्याच्या प्रयत्नात प्रा. कुलकर्णी यांचे गैरसमज निर्माण झालेले आहेत असे मी माझ्या पूर्वीच्या उत्तरात म्हटले होते त्याचीच ही आणखी एक प्रचिती आहे.

अर्थव्यवस्थेतील निविष्टी-उद्‌विष्टी प्रवाहांचे संप्रमाण वस्तूत रूपांतर केल्याने विनिमयमूल्ये ठरण्याअगोदर स्वतंत्रपणे नफ्याचा दर कसा ठरविता येतो हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेत उत्पादित होणाऱ्या सर्व मूलाधार वस्तूंची विशिष्ट प्रमाणात समन्वित केलेली संप्रमाण वस्तू ही कल्पित संश्लिष्ट वस्तू असते. असे रूपांतर केले म्हणजे निविष्टी व उद्‌विष्टी या त्याच कल्पित संश्लिष्ट वस्तूंच्या स्वरूपात मिळतात व त्यांच्या त्या भौतिक स्वरूपातच त्यांची तुलना करता येते. उद्‌विष्टी निविष्टींपेक्षा किती प्रमाणात जास्त आहेत (किंवा श्रमाव्यतिरिक्तच्या निविष्टींपेक्षा किती प्रमाणात जास्त आहेत) हे ठरविता येते. म्हणजेच नफ्याचा दर त्याच्या भौतिक स्वरूपात सांगता येतो. त्यासाठी विनिमयमूल्ये ठरणे वा माहीत असणे आवश्यक नसते. याशिवाय संप्रमाण वस्तूतील रूपांतरणामुळे प्रत्येक वस्तूच्या उत्पादनातील वाढाव्याचे श्रमाव्यतिरिक्तच्या निविष्टींशी असणारे गुणोत्तर – म्हणजेच नफ्याचा दर हे सर्वत्र तेच होते. त्यामुळे सिद्ध होणारा नफ्याचा दर हा व्यष्टीय व समष्टीय पातळीवर तोच असतो.[३] व्यष्टीय पातळीवरील नफ्यांच्या दरांची साधी व भारित सरासरी असे त्याचे स्वरूप नसते. या दोन घटितांमुळे संप्रमाण वस्तूत रूपांतर केल्याने नफ्याचा दर विनिमयमूल्यांच्या स्वतंत्रपणे व आधीच सांगता येतो.

अर्थव्यवस्थेतील जो वाढावा कायम राहतो असे स्राफा म्हणतात तो वाढावा संप्रमाण वस्तूत मोजलेला त्यांना अभिप्रेत आहे. संप्रमाण वस्तूतील रूपांतरणाने अर्थव्यवस्थेतील उत्पादनातला वाढावा भौतिक स्वरूपात उपलब्ध होतो. एक प्रकारे हा वाढावा म्हणजे एकूण अर्थव्यवस्थेच्या सर्वसाधारण तंत्रशरीरात उत्पादकतेच्या रूपाने अनुस्यूत असलेलाच असतो. त्यामुळे तंत्रशरीरात तंत्रसुधारणा वगैरे बदल झाल्यासच तो बदलतो. विनिमयमूल्ये कशीही बदलली तरी त्यात बदल होण्याचे काहीच कारण नसते. विनिमयमूल्यातील बदलामुळे तो त्या मूल्यांच्या स्वरूपात बदलतो आहे असे 'दिसते' पण संप्रमाण वस्तूच्या भौतिक पातळीवर तसे नसते.

प्रा. कुलकर्णी यांनी आक्षेप घेतलेल्या कोष्टकातील उद्‌विष्टी व निविष्टी या संप्रमाण वस्तूत मोजलेल्या नाहीत. तेव्हा त्यातील विनिमयमूल्यांच्या स्वरूपातील वाढावा स्थिर असणे शक्य नाही. तथापि त्या कोष्टकातील अर्थव्यवस्थांच्या तंत्रशरीरात कोणताही फरक झालेला नाही. त्यामुळे त्यांच्यातील भौतिक स्वरूपातील वाढावा

मुळीच बदललेला नाही. विनिमयमूल्यांतील बदलांमुळे त्यांचा विनिमयमूल्यांच्या स्वरूपातील आकार बदलणे हे नैसर्गिक आहे. त्या बदलांवरून मूळचा भौतिक स्वरूपातील वाढावाही बदलता आहे असा निष्कर्ष काढणे सर्वस्वी चूक आहे. त्यामुळे प्रा. कुलकर्णी यांनी विचारलेले 'हा नफा कोठे गेला?' वगैरे स्वरूपाचे प्रश्न गैरलागू तर आहेतच पण हास्यास्पदही आहेत. आक्षेपार्ह कोष्टकातील राशी संप्रमाण वस्तूंच्या स्वरूपात नसतानासुद्धा "अर्थव्यवस्थेतील वाढावा कायम ठेवून त्याचे वेगवेगळ्या प्रकारे विभाजन करावयाचे ही स्राफा यांची पद्धत आहे, असे माझे (प्रा. कुलकर्णी यांचे) म्हणणे आहे व सोबनींनी त्यांच्या कोष्टकात असे केलेले नाही हा माझा मुख्य आक्षेप आहे" असे जे प्रा. कुलकर्णी यांनी लिहिले आहे ते किती गैरलागू व चुकीचे आहे हे यावरून उघड दिसेल.

स्राफा सिद्धांतास आवश्यक अशी ही महत्त्वाची अट व तिचा खुलासा प्रा. कुलकर्णी यांच्या लक्षात न आल्याने त्यांनी ती पुरी झाली आहे की नाही वगैरेकडे लक्ष न देता स्राफा सिद्धांत बेधडकपणे सर्वत्र लावला आहे. एक चुकीचे वळण घेतले की पुढचा सर्व मार्गही चुकीचाच ठरतो त्याप्रमाणे त्यांनी हे चुकीचे वळण घेतल्यामुळे त्यांचे पुढचे विवेचन चुकीच्या मार्गाने भरकटले आहे आणि त्या मार्गावर त्यांनी पुढील अपूर्व शोध लावले आहेत. (१) ॲडम स्मिथ यांच्या विवेचनातील 'बाजारातील किमती' म्हणजे "नैसर्गिक किमती" व त्या म्हणजेच 'उत्पादन किमती'. (२) स्मिथ यांचा बेरीज सिद्धांत हा व्यष्टीय पातळीवर बरोबर व समष्टीय पातळीवर चूक आहे. (३) स्राफा प्रतिमानात 'चलन' आहे. पण त्यांचा प्रतिवाद 'अर्थसंवाद'ची पाने अडवून करण्याचे कारण नाही. प्रा. कुलकर्णी यांना तसे वाटले तर त्यासंबंधी त्यांच्याशी वैयक्तिक चर्चा करण्यासाठी मी केव्हाही उपलब्ध आहे.

प्रा. कुलकर्णी यांच्या मुख्य प्रश्नाचे उत्तर वर सविस्तर दिले आहे. तथापि आणखी एक खुलासा करणे आवश्यक आहे. त्यात दोष त्यांचाही नाही व माझाही नाही. छापखान्याचा वा मुद्रिते तपासणाऱ्याचा आहे. माझ्या डोक्यात स्राफा सिद्धांताविषयी चुकीचा ग्रह 'घर' करून बसला आहे असे प्रा. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. त्याचा पुरावा म्हणून माझ्या पुस्तकात काही न सापडल्याने मी त्यांना दिलेल्या उत्तरातील पुढील वाक्य त्यांनी उद्धृत केले आहे. "एकूण वाढाव्याचे मजुरीत व नफ्यात वाटप होते व हे वाटप विनिमयमूल्यातील बदलामुळे होते असा स्राफा सिद्धांत आहे". हे वाक्य आहे तसे बरोबर नाही. माझे उत्तर प्रसिद्ध झाल्यावर मी ते वाचले तेव्हा मीच या वाक्यावर खटकलो व माझ्या उत्तराचा पहिला तर्जुमा माझ्याकडे होता तो पाहिला. त्यात हे वाक्य पुढीलप्रमाणे होते. "एकूण वाढाव्याचे मजुरीत व नफ्यात वाटप होते व हे वाटप विनिमयमूल्यातील बदलांमुळे **मूर्त** होते असा स्राफा सिद्धांत आहे." छापताना त्यातला 'मूर्त' हा शब्द गळाला आहे. त्यामुळे छापलेले वाक्य चुकीच्या स्वरूपात वाचकांपुढे आले आहे. पण त्याला माझा नाईलाज आहे. इत्यलम्

---

**पदटीपा :**

१. अशा प्रतिमानातील यासंबंधीची समस्या स्राफा यांनी स्पष्टपणे पुढीलप्रमाणे निर्देशिली आहे : In an economy with a surplus "The difficulty cannot be overcome by allotting the surplus *before* the prices are determined, as is done with the replacement of raw materials, subsistence, etc. This is because the surplus (or profits) must be distributed in proportion to the means of production (or capital) advanced in each industry; and such a proportion between two aggregates of heterogeneous goods (in other words, the rate of profit) cannot be determined before we know the prices of goods. On the other hand, we cannot defer the allottment of the surplus till after the prices are known, for, as we shall see, the prices cannot be determined before knowing the rate of profits. The result is that the distribution of the surplus must be determined through the same mechanism and at the same time as are the prices of commodities". *Production of Commodities by means of Commodities*, Indian Edition, 1963, p. 6 (emphasis in the original).

२. स्राफांनी म्हटले आहे : " The straight-line relation between the wage and the rate of profits will therefore hold in all cases, provided only that the wage is expressed in terms of the standard product. The same rate of profits, which in the standard system is obtained as a ratio between *quantities* of commodities, will in the actual system result from the ratio of aggregate *values.* ", Ibid, p. 26. ( emphasis in the original )

३. स्राफा लिहितात : " The fact that in the standard system the various commodities are produced in the same proportions as they enter the aggregate means of production implies that the rate by which the quantity produced exceeds the quantity used up in production is the same for each of them...The rate that applies to individual commodities is naturally also the rate by which the total product of the standard system exceeds its aggregate means of production, or the ratio of the net product to the means of production of the system....The possibility of speaking about of a ratio between two collections of miscellaneous commodities without need to reduce them to the common measure of price arises of course from the circumstance that both collections are made up in the same proportions–from their being quantities of the same composite commodity....Thus in the standard system the ratio of the net product to the means of production would remain the same whatever variations occurred in the division of the net product between wages and profits and whatever the consequent price changes.", Ibid, pp. 23–24.

[ या टिपणीबरोबर या वादास आम्ही पूर्णविराम देत आहोत. **संपादक** ]

■ ■

**ग्रंथ-परिचय**

# राज्यसंस्था आणि वर्गरचना

व. गो. सहस्रबुद्धे

डॉ. अनुपम सेन यांचा ' राज्यसंस्था, औद्योगीकरण आणि भारतातील (आर्थिक) वर्गांची जडणघडण ' (The State Industrialisation and Class Formations in India) ह्या नावाचा ग्रंथ अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे.* लेखक मार्क्सवादी आहे हे ग्रंथावरून स्पष्ट होते. मार्क्स व एंगल्स यांच्या लेखनातील अनेक अवतरणे ग्रंथात आढळतात तरीही सर्व मार्क्सवादी अर्थतज्ज्ञांना या ग्रंथातील दृष्टिकोन मान्य होईलच असे नाही. कारण वर्गरचनेच्या संदर्भात राज्यसंस्थेची भूमिका काय असते याबाबत परंपरागत मार्क्सवादी दृष्टिकोनापेक्षा वेगळा दृष्टिकोन या ग्रंथात मांडला आहे.

कोणत्याही उत्पादनव्यवस्थेत उत्पादनयंत्रणेवर ज्या वर्गाचे वर्चस्व असेल त्या वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षण व जोपासना करण्याचे कार्य राज्यसंस्था—व्यवहारात शासन—करत असते. पर्यायाने राज्यसंस्था स्वतंत्र कधीच नसते व नेहमीच अर्थव्यवस्थेतील बलिष्ठ वर्गाची अंकित असते हा परंपरावादी मार्क्सवाद्यांचा दृष्टिकोन आहे. साहजिकच सरंजामशाहीमध्ये राज्यसंस्था जमीनदारांची बटीक बनते तर भांडवलशाहीमध्ये भांडवलदारांचे हितरक्षण व हित-संवर्धन करण्यास धन्यता मानते असे मार्क्सवादी सर्वसाधारणपणे समजतात.

परंतु वरील सिद्धांताला अपवाद असू शकतात किंवा राज्यसंस्थेला एखाद्या वर्गाची बटिक बनवणाऱ्या परिस्थितीपेक्षा वेगळी परिस्थिती असू शकते याकडे मार्क्सवाद्यांनी दुर्लक्ष केले आहे आणि असे करताना खुद्द मार्क्स यांनी काही अपवादांचा व वेगळ्या परिस्थितीचा उल्लेख केला आहे याचा त्यांना विसर पडला आहे, या गोष्टीकडे लेखकाने आपल्या वाचकांचे लक्ष वेधले आहे. एका उत्पादनव्यवस्थेकडून दुसऱ्या उत्पादनव्यवस्थेकडे अर्थकारणाची वाटचाल होत असते तेव्हा जी संक्रमणावस्था असते तिला अपवादात्मक परिस्थिती मानता येईल. त्या वेळी राज्यसंस्था बऱ्याच प्रमाणात स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकते व ती कोणत्याही एका वर्गाची अंकित असते असे म्हणता येणार नाही. सरंजाम-शाही पूर्णपणे नष्ट होऊन भांडवलशाही सुप्रस्थापित होईपर्यंतचा मधला काळ या दृष्टीने संक्रमणावस्था होय.

जेव्हा एखाद्या उत्पादनव्यवस्थेत कोणताही एक वर्ग प्रबळ नसतो तेव्हा ती परिस्थिती वेगळीच मानली पाहिजे. मार्क्स यांनी आशियातील उत्पादनपद्धती (Asiatic Mode of Production) या दृष्टीने वेगळी मानली आहे. या उत्पादनपद्धतीत सर्वच वर्ग सर्वसाधारणपणे कमकुवत असतात; त्यामुळे राज्यसंस्था स्वतंत्र व प्रबळ बनू शकते. राज्यसंस्था ही जेव्हा स्वतंत्र व स्वावलंबी शक्ती असते तेव्हा ती वर्गकलह व वर्गसंबंधावर नियंत्रण ठेवू शकते. आणि सर्वसाधारणपणे असेही म्हणण्यास हरकत नाही, की स्वतंत्र अस्तित्व असलेली राज्यसंस्था आपली शक्ती अशाच प्रकारे

---

* Anupam Sen : The State Industrialisation and Class Formations in India, A New Marxist Perspective, Routledge Paul, Pages 289, Price £ 15.

वापरते की त्यामुळे समाजातील कोणताही वर्ग बलवान होऊ नये व वर्गसंघर्षात समतोल राखण्याच्या नावाने राज्यसंस्थेला निरंकुश सत्ता गाजविण्याची संधी नेहमीच लाभावी. राज्यसंस्थेची सत्ता नोकरशाहीमार्फत वापरली जात असल्यामुळे अशा उत्पादनव्यवस्थेत नोकरशाही बलिष्ठ होते व आपले स्वातंत्र्य व सामर्थ्य टिकविण्यासाठी ती कोणत्याच वर्गाला प्रबळ होऊ देत नाही. प्रत्येक वर्गाला विविध प्रकारच्या नियंत्रणांनी व नियमांनी हैराण करणे हे अशा परिस्थितीत नोकरशाहीचे सर्वसामान्य धोरण असते. त्यामुळे आर्थिक विकास मंदावला तरी नोकरशाहीला त्याची पर्वा नसते. नोकरशहांचा वर्ग सत्ताधारी बनतो व हेच नोकरशाहीला हवे असते.

वरीलसारखी परिस्थिती भारतात नेहमीच राहिली आहे. या परिस्थितीच्या अनुरोधाने लेखकाने भारतातील औद्योगीकरणाच्या प्रक्रियेचा वेध घेतला आहे. भारतातील ब्रिटिशपूर्वकाळ, ब्रिटिशसत्तेचा काळ व स्वातंत्र्योत्तर काळ यांचा स्वतंत्रपणे विचार करून भारतात राजसत्ता नेहमीच कशी स्वतंत्र व बलिष्ठ राहिली आहे हे लेखकाने दाखवले आहे.

भारतात ब्रिटिशपूर्व काळात पाश्चिमात्य धर्तीची सरंजामशाही होती असे म्हणता येत नाही. त्याचे मुख्य कारण असे सांगता येईल की कायद्याने व रूढीने जमिनीवर राज्याची मालकी होती. ज्याला जमीनदार असे म्हटले जात होते तो फक्त सारा वसूल करणारा राजसत्तेचा दलाल होता. भारताच्या बऱ्याच भागात शेतकरी व शासन यांच्यात मध्यस्थ नसेच व शेतकरी सारा आपणच सरकारी तिजोरीत भरे. साहजिकच शेतकऱ्यात जमिनीबद्दल आत्मीयतेची भावना असे. गुलामगिरी अस्तित्वातच नव्हती व त्यामुळे ग्रामीण भागातून उद्योगधंद्यासाठी कामगारभरती करण्यास अनकूल परिस्थिती नव्हती. पाश्चिमात्य देशात त्यांचा बाहेरील जगाशी व्यापार वाढू लागला याचा परिणाम शेतीवर होणे अपरिहार्य होते. शेतकी उत्पादन वाढण्याची वाढती आवश्यकता, त्यामुळे शेतकऱ्यांचे व गुलामांचे जमीनदारांकडून वाढते शोषण, व्यापाऱ्याकडून शेतजमिनीची खरेदी व शेतीचे व्यापारीकरण, शेतकऱ्यांचे शेतमजुरात परिवर्तन हे त्यातील प्रमुख परिणाम होत. ही सर्व परिस्थिती उद्योगधंद्यांची वाढ व शेतमजुरातून कामगारभरती होण्यास पोषक होती.

भारतात वरील गोष्टी जवळजवळ घडल्याच नाहीत असे ब्रिटिशपूर्व काळापुरते तरी म्हणता येईल. चलनाधिष्ठित अर्थव्यवस्थेची तशी गरजही भासली नाही व खेड्यातील आर्थिक व्यवहार स्वयंपूर्णता व वस्तुविनिमय या तत्त्वावरच होत राहिले. औद्योगिक उत्पादन जातिसंस्थेवर अधिष्ठित होते व त्यामुळे परंपरागत उत्पादनतंत्रात बदल होण्यास वाव नव्हता. शहरातील व्यापारी व कारागीर संपूर्णपणे राजसत्ता, सरदारवर्ग, सैनिकवर्ग यांवर पूर्णपणे अवलंबून होता. अशा परिस्थितीत कोणताही आर्थिक वर्ग राजसत्तेपेक्षा प्रबळ नव्हता व राजसत्तेचे स्वातंत्र्य व वर्चस्व अबाधित राहू शकत होते. व्यापारी व औद्योगिक भांडवलदारवर्गाचा उदय होणे शक्यच नव्हते. पाश्चिमात्य देशांचा बाहेरील जगाशी व्यापारसंपर्क वाढला याचा परिणाम म्हणून कालांतराने भारतातही व्यापारी वर्गाची भरभराट होत आहे अशी चिन्हे दिसू लागली होती पण तेवढ्यातच भारत ब्रिटिशांची वसाहत बनला.

ब्रिटिशकाळात भारतात भांडवलशाहीचा विकास होऊ नये व कोणताही एक वर्ग वरचढ ठरू नये या हेतूनेच आर्थिक धोरणाची आखणी करण्यात आली. परिणामी राजसत्ता नेहमीच स्वतंत्र (स्वतंत्र म्हणजे कोणत्याही एका वर्गाच्या अंकित नाही अशी) व बलवान राहिली.

ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य सुस्थिर होईपर्यंत भारताच्या निर्यात व्यापारातून देशातील व्यापाऱ्यांना भरपूर व कारागिरांना बऱ्याच प्रमाणात फायदा होत होता व औद्योगिक क्रांतीला पोषक अशी व्यापारी क्रांती होऊ पाहात होती. पण राजसत्तेच्या, पर्यायाने लष्करी शक्तीच्या बळावर कंपनीने निर्यात व्यापाराची मक्तेदारी बळकावली व भारतीय भांडवलशाहीला बाल्यावस्थेतच चिरडले. व्यापारी वर्गाला डोके वर काढण्याची आशा उरली नाही व कारागिरांना राज्यकर्ते देतील ती किंमत आपल्या मालाला घेऊन संतुष्ट राहावे लागले. व्यापारातील नफा कंपनीला मिळू लागला व त्याचा फायदा ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीला मोठाच हातभार लागण्यात झाला.

भारताचा निर्यात व्यापार काबीज करण्याचा हेतू हळूहळू मागे पडून भारताला ब्रिटनच्या पक्क्या मालाची बाजारपेठ बनवण्याचा, तसेच ब्रिटिश भांडवलाला सुरक्षित गुंतवण्याचे स्थान व मार्ग उपलब्ध करून देण्याचा हेतू प्रबळ झाला. ईस्ट इंडिया कंपनीचे उच्चाटन होऊनच ग्रेट ब्रिटनचे राज्य पूर्णार्थाने भारतात सुरू झाल्यानंतर हा हेतू विशेष-करून दिसू लागला. भारताने ब्रिटिश उद्योगासाठी स्वस्त दराने कच्च्या मालाचा पुरवठा करावा व ब्रिटनचा पक्का माल त्यावर नाममात्र जकात आकारून घ्यावा असे धोरण भारतावर लादण्यात आले. त्याच वेळी भारताच्या औद्योगिक मालावर मात्र ब्रिटनमध्ये जबर जकाती बसवण्यात येत होत्या व स्मिथ–रिकार्डो या खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांना त्यात काही चूक आहे असे वाटत नव्हते. या धोरणामुळे भारतावर अन्याय झाला व भारताचा औद्योगिक विकास अवरोधला याची निर्भर्त्सना फेडरिक लिस्ट व मार्क्स यांनी केली. ब्रिटिश भांडवल भारतात गुंतवताना ब्रिटिश उद्योगाला त्यामुळे स्पर्धा निर्माण होऊ नये अशी दक्षता घेण्यात आली.

अशा परिस्थितीत भांडवलदारवर्ग भारतात उदयास आला नाही यात नवल नाही. मात्र अंतर्गत बाजारपेठ खूपच मोठी असल्याने अंतर्गत व्यापार, जमीनदारी व सावकारी यातून जमा होणारे भांडवल वस्त्रोद्योगात गुंतवण्यात आले व भांडवलदारवर्ग भारतात दिसू लागला एवढेच म्हणता येईल. तरीही राजसत्तेशी झगडण्याचे सामर्थ्य यात नव्हते. भारताच्या शेतमालाला बाहेरच्या बाजारपेठा लाभल्याने शेतीचे हळूहळू व्यापारीकरण होऊ लागले. पण ते होत असता शेतीला भांडवलशाही स्वरूप येणार नाही अशी दक्षता ब्रिटिश सरकारने घेतली. त्यासाठी जमीन-दाराकडे व्यावहारिकदृष्ट्या जमिनीची मालकी असली तरी जमिनीचा सर्वोच्च मालक राज्यसंस्था ह्या परंपरागत भूमिकेला राज्यकर्त्यांनी धक्का बसू दिला नाही. मात्र प्रत्येक भूधारकाचा स्वतंत्र विचार करून तो सरकारला जे देतो ते त्याने रोख रकमेच्या रूपाने द्यावे व त्याला कर न म्हणता खंड म्हणावे अशी भूमिका सरकारने घेतली. शेतीत जो मध्यस्थाचा वर्ग होता व वाढत गेला तो सत्ताहीन, स्वार्थी, विलासी, निष्क्रिय असा झाला व त्याचे अस्तित्व सर्वस्वी राजसत्तेवर अवलंबून राहिले. स्वातंत्र्यलढ्यात हा वर्ग सरकारधार्जिणा राहिला असल्यास नवल नाही.

ब्रिटिशकाळात सरकारी नोकरांचा व स्वतंत्र व्यावसायिकांचा एक नवा मध्यमवर्ग उदयास आला. पूर्वी असा वर्ग नसेल असे नाही पण तेव्हा तो नगण्य होता. हा वर्ग ब्रिटिशकाळात तरी परकी संस्कृती व राहणीमान यांनी भारावलेला व चैनीला सोकावलेला होता. हा वर्गही तेव्हा तसा प्रबळ होता असे म्हणता येणार नाही.

भारताच्या औद्योगीकरणाला ब्रिटिशांचे धोरण विरोधी असले तरी दोन महायुद्धांचा नाही म्हटले तरी भारताला बराच फायदा मिळाला व भांडवलदारवर्ग वाढू लागला. औद्योगिक विकासाच्या ओघात औद्योगिक कामगार-वर्ग उदयास आला. शिक्षणाच्या मानाने प्रतिष्ठित नोकऱ्या कमी अशी परिस्थिती निर्माण झाली व मध्यमवर्गातही असंतुष्टांची संख्या वाढू लागली. यातूनच राष्ट्रीय चळवळ उदयास आली व तिला मध्यमवर्गाचे नेतृत्व व असंतुष्ट भांडवलदारवर्गाच्या आर्थिक पाठिंब्यामुळे खतपाणी मिळाले. दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रे विजयी झाली तरी ग्रेट ब्रिटनसारख्या देशांना यापुढे साम्राज्य संभाळता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली व देश स्वतंत्र झाला. त्या वेळी कोणताही एक वर्ग राजसत्तेवर वर्चस्व गाजवेल एवढा प्रबळ झाला नव्हता हे लक्षात ठेवले पाहिजे.

स्वराज्य जेव्हा मिळाले तेव्हा भांडवलदारवर्ग स्वतःच्या बळावर मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण घडवून आणण्यास असमर्थ होता. जमीनदारवर्गाची स्थिती तर दयनीय होती. स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा न दिल्यामुळे लोकमत त्यांना प्रतिकूल होते. मात्र समाजाच्या रूढीनिष्ठ प्रवृत्तीमुळे आपापल्या भागात त्यांचा जोर काही प्रमाणात टिकून होता. कामगारवर्ग बलवान झाला होता असे म्हणता येत नाही. कारण पूर्णपणे औद्योगिक निष्ठा असलेला कामगारवर्ग अजून तयार झाला नव्हता. शहरात राहणारा पण शेतीशी संपर्क ठेवणारा असा तो वर्ग होता. मूलभूत सुविधा शासनाने स्वखर्चाने उपलब्ध करून द्याव्या, अत्यावश्यक नियंत्रणे असावी पण उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्थापन खाजगी क्षेत्राकडे असावे असे भांडवलदारवर्गाचेच मत होते असे या वर्गाने केलेल्या मुंबई योजनेने दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे आर्थिक नियोजन व त्याची कार्यवाही यांची काळजीपूर्वक तपासणी

केल्यास असे दिसून येते की स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राज्यसंस्थेने जे स्वातंत्र्य उपभोगिले आहे ते अबाधित राहावे व आर्थिक धोरणावर व पर्यायाने राजकारणावर कोणत्याही एका वर्गाला वरचष्मा गाजवता येऊ नये या हेतूने नियोजन व कार्यवाही यांची व्यूहरचना केली आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा त्यातल्या त्यात मोठ्या भांडवलदारांचा वर्ग प्रबळ होता. त्यांचे सामर्थ्य कमी व्हावे व तो राजसत्तेवर अवलंबून असावा हा या व्यूहरचनेचा प्रमुख हेतू दिसतो.

या व्यूहरचनेचा आराखडा थोडक्यात असा सांगता येईल. सार्वजनिक क्षेत्रात प्रचंड भांडवल गुंतवणूक करून मूलभूत उद्योग प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रात राहतील अशी तजवीज करणे, मोठ्या बँका व वित्तसंस्था सार्वजनिक क्षेत्रात आणून वित्तपुरवठ्यावर सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी प्रस्थापित करणे, आयात-निर्यात, परदेशीय चलनाचे वाटप, किमती, खुल्या बाजारपेठेत भांडवल-उभारणी इत्यादी गोष्टींवर नियंत्रणे बसवून व त्यासाठी परवानापद्धत सुरू करून खाजगी क्षेत्राची वाढ मर्यादित ठेवणे, त्याच वेळी छोट्या व ग्रामीण उद्योगांना करसवलती, खास साहाय्य देऊन व त्यांच्यावरील नियंत्रणे कमी व शिथिल ठेवून त्यांना उत्तेजन देऊन त्यांची स्पर्धाशीलता वाढवणे, समाजवादी समाजरचना हे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट मानून मोठ्या उद्योगधंद्यावर राष्ट्रीयीकरणाची तलवार सतत टांगती ठेवणे, हे मार्ग स्वीकारून व त्या मार्गांची कार्यवाही करण्याची जबाबदारी सर्वस्वी नोकरशाहीवर टाकून मोठ्या भांडवलदारांचे महत्त्व व स्वातंत्र्य कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला व तुलनेने नोकरशाहीचे म्हणजेच राज्यसंस्थेचे महत्त्व व स्वातंत्र्य वाढत जाईल अशी दक्षता घेण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर काळातील भूधारणविषयक कायदे पाहिले तर असे दिसून येईल की त्यांचा रोख मोठ्या जमीनमालकांविरुद्धच आहे. कसणाऱ्याला मालकी देणे, भूधारणावर कमाल मर्यादा घालणे, खंडकऱ्याला संरक्षण देणे व खंडासाठी कमाल मर्यादा ठरवणे या हेतूने करण्यात आलेले कायदे भांडवलशाही शेतीला उत्तेजन देतील असे निश्चितच नाहीत. या कायद्यांच्या कार्यवाहीत बरीच ढिलाई झाली आहे हे मान्य करावयाला हवे. त्यामुळे व हरित क्रांतीच्या काही वैशिष्ट्यांमुळे मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे हे खरे आहे. पण तरीही मोठ्या शेतकऱ्यांचा वर्ग अनेक सवलतींसाठी व विशेषतः वित्तपुरवठ्यासाठी शासनयंत्रणेवर एवढा अवलंबून आहे की राज्यसंस्थेशी दोन हात करण्याएवढा तो प्रबळ झाला आहे असे म्हणताच यावयाचे नाही. राज्यसंस्थेशी त्याला जमवून घेतलेच पाहिजे.

लहान शेतकरी व शेतमजूर यांचा वर्ग संख्येने तसा मोठा आहे. पण हा वर्ग संघटित झालेला नाही. सुसंघटित औद्योगिक व अन्य व्यवसायातील कामगारवर्ग बऱ्याच प्रमाणात संघटित झाला आहे. पण कामगारसंघटनातील फाटाफूट, विशिष्ट व्यवसायातीलच नव्हे तर विशिष्ट कारखान्यातील कामगारांचेच हितसंबंध जपणाऱ्या संघटना यामुळे कामगारवर्गाची एकजूट झाली आहे व तो वर्ग प्रबळ झाला आहे असे म्हणता येत नाही. शेतकरी-कामगार एकजूट ही बात तर फार दूरची, कदाचित असंभाव्य आहे. या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा की स्वातंत्र्योत्तर काळातही भारतात राज्यसंस्थेपेक्षा प्रबळ असा कोणताही वर्ग नाही व तो असू नये हे कटाक्षाने पाहण्यात आले आहे. या ग्रंथातील सर्वच विचारांशी सहमत होणे कठीण असले तरी यातील मते ठोकळेबाज मार्क्सवादी मतापेक्षा भिन्न आहेत. व ती विचारांना चालना देणारी आहेत यात शंका नाही. ब्रिटिशपूर्व काळात पाश्चिमात्य धर्तीची सरंजामशाही भारतात नव्हती व त्यामुळे राज्यसंस्था प्रबळ होती हे नाकारता येणार नाही. सरंजामी देण्याचा व अर्थातच ती काढून घेण्याचा अधिकार राजाला असल्यामुळे राजसत्ता महत्त्वाची होती. पण तरीही राजा हा देखील एक फार मोठा जमीनदार असल्याने जमीनदारवर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचे कार्यच राजसत्ता करत असे हे नाकारता येणार नाही.

ब्रिटिशकाळात भारतात कोणताही वर्ग राज्यसंस्थेपेक्षा प्रबळ नव्हता हे खरे आहे. पण येथे साम्राज्यशाहीचे निकष लागू केले पाहिजेत. ग्रेट ब्रिटनमधील राज्यसंस्था तेथील भांडवलदारवर्गाच्या हितसंबंधाची जपणूक करत होती व त्या अनुरोधानेच भारताची आर्थिक धोरणे ठरवली जात होती.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात कोणताही एक वर्ग राज्यसंस्थेपेक्षा प्रबळ होऊ नये या हेतूने नियोजनाची कार्यवाही कशी करावी हे ठरविण्यात आले हे वरवर पाहता खरे वाटते व सुरुवातीच्या काळात ते खरे असावेही. पण भारतीय नियोजनाचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता असे दिसते की समाजवाद हे अंतिम उद्दिष्ट ठरवण्यात

आले असूनही नियोजनाची पावले उलटया दिशेने पडत आहेत व नियोजनाची कार्यवाही भारतातील मोठ्या भांडवलदारवर्गाला प्रबळ करण्यास मदतच करत आहे. भारतीय भांडवलशाही पूर्वीपेक्षा निश्चितच बलवान झाली आहे यात शंका नाही. नोकरशहा व भांडवलशहा यांची एकजूट झाल्याचा हा परिणाम आहे. परकी भांडवलशाहीचाही या प्रक्रियेला हातभार लागत आहे. राजकीय साम्राज्यशाहीतून सुटून भारत आर्थिक साम्राज्यशाहीत (स्वखुशीने ?) सापडला आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

तरीही असे म्हणता येईल की भारतातील सर्वच आर्थिक वर्गांचे बळ अद्यापही स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून नसून ते राज्यसंस्थेच्या धोरणावर व मदतीवर अवलंबून आहे. त्यामुळे राज्यकर्ते बदलले तर परिस्थिती बदलेल अशी आशा करण्यास जागा आहे. या दृष्टीने या ग्रंथातील विचारांचे महत्त्व आहे.

■ ■

---

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

**नी. वि. सोवनी** : अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध (१९७७), पृष्ठे २२६, किंमत रु. २०. (एकमेव विक्रेते : द कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. ४०-४९-इ, शाहूपुरी, सहावी गल्ली, कोल्हापूर १).

**मो. वि. भाटवडेकर** : शिक्षणाचे अर्थशास्त्र (१९७८), पृष्ठे १७८, किंमत रुपये २०. (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पेठ, पुणे ४११०३०).

**भ. ग. बापट** : आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण (१९८२), पृष्ठे ३३३, किंमत रु. ५०. (वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे ४११०३०).

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# सातव्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सातवे वार्षिक अधिवेशन श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठातर्फे विद्यापीठाच्या पुणे येथील मानव्य व वाणिज्य महाविद्यालयाच्या परिसरात दिनांक २८, २९ आणि ३० ऑक्टोबर १९८३ या दिवशी भरले. अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाचे प्राध्यापक **डॉ. स. ह. देशपांडे** हे होते.

अधिवेशनाचा उद्‌घाटन समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहात शुक्रवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सुरू झाला. स्थानिक कार्यवाह डॉ. (श्रीमती) सुलोचना नाडकर्णी यांच्या प्रास्ताविकानंतर प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार यांनी उपस्थितांचे व प्रतिनिधींचे स्वागत केले. पुण्यात स्थापन झालेल्या परिषदेचे सातवे अधिवेशन महिला विद्यापीठातर्फे पुण्यात व्हावे हे औचित्यपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिवेशनाचे उद्‌घाटन गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. नीळकंठ रथ यांनी केले. आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात डॉ. रथ म्हणाले, 'मराठी अर्थशास्त्र परिषदेसारख्या संस्थेची स्थापना ही एक आवश्यक आणि म्हणूनच स्वागतार्ह अशी घटना आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षांत विद्यार्थी मोठ्या संख्येने आणि वाढत्या प्रमाणात पदवी आणि पदव्युत्तर वर्गातून अर्थशास्त्र आणि तत्सम इतर सामाजिक शास्त्रांचा अभ्यास मराठीतून करू लागले आहेत. अर्थातच शिकण्या आणि शिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणात मराठीतून अर्थशास्त्रीय वाङ्मय उपलब्ध होण्याची गरज आहे. याचबरोबर अर्थशास्त्राच्या शिक्षकांनी आणि अभ्यासकांनी वेळोवेळी एकत्र जमून अर्थशास्त्रीय प्रश्नांची चर्चाही निखळ मराठीतून करायला हवी. ही परिषद या दोन्हीही गोष्टी घडवून आणण्यात प्रयत्नशील आहे ही आनंदाची बाब आहे.'

ते पुढे म्हणाले की 'आवश्यक ते वाङ्मय इंग्रजीतून वाचणे व ते समजावून घेणे ही प्रवृत्ती उत्तरोत्तर नाहीशी होत आहे. परिणाम असा झाला आहे की उपलब्ध अशा प्रचंड अर्थशास्त्रीय वाङ्मयापर्यंत, केवळ ते इंग्रजीतून आहे म्हणून हे विद्यार्थी पोचूही शकत नाहीत ही मोठी चिंतेची बाब आहे.... युरोपातील अनेक राष्ट्रांतून तसेच जपानमध्ये यांच्या त्यांच्या भाषांमधून आपल्या मराठीपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात अर्थशास्त्रीय वाङ्मय उपलब्ध आहे. तरीही ती राष्ट्रे इंग्रजीतील अर्थशास्त्रीय आणि इतर विषयांचे जे ज्ञान उदंड वाढत चालले आहे त्याचा लाभ घेण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकायला उद्युक्त करीत आहेत...मला असे वाटते की इंग्रजीचे एक 'ग्रंथालयीन भाषा' म्हणून आपल्या विद्यापीठीय शिक्षणात असलेले स्थान नाकारून चालणार नाही. तसे करणे हे अंतिमतः उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात तरी धोक्याचे आहे.'

डॉ. स. ह. देशपांडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय' या विषयावर विस्तृत विवेचन केले. यात मार्क्सवादाचे नैतिक अधिष्ठान, मार्क्सची शोषणसंकल्पना आणि भारतीय संदर्भात मार्क्सच्या सामाजिक न्यायविषयक विचारांची प्रस्तुतता याबाबत आपले मौलिक विचार मांडले. अध्यक्षांनी आपले लेखी भाषण न वाचता त्यातील मूलभूत विचारांचे विवेचन केले. (संपूर्ण भाषण या अंकात अन्यत्र दिले आहे).

**मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे दरवर्षी मराठीतील सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथाला रु. १००१ चे 'मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक' दिले जाते. या योजनेखाली १९८३ या वर्षीचे पारितोषिक डॉ. भ. ग. बापट यांच्या 'आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण' या ग्रंथाला मिळाले असल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले. उद्‌घाटन समारंभात अध्यक्ष डॉ. स. ह. देशपांडे यांच्या हस्ते हे पारितोषिक डॉ. भ. ग. बापट यांना देण्यात आले.

**चर्चासत्रे**

अधिवेशनात एकूण चार चर्चासत्रे आयोजिली होती. चर्चासत्रांच्या अध्यक्षस्थानी डॉ. स. ह. देशपांडे होते.

पहिले चर्चासत्र शुक्रवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत चालले. चर्चासत्राचा विषय 'कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र' या विषयावर झाले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन प्राचार्य ना. अ. मावळणकर यांनी केले. या चर्चासत्रात सर्वश्री श्रीनिवास पुराणिक, उत्तम घुले, आंबर्डेकर, सुहास सहस्रबुद्धे, रमेश पाध्ये, आनंद नाडकर्णी, वा. य. कोल्हटकर, स. ह. देशपांडे, कांचन निरगुरे, वसंत तुळपुळे, श्रीमती नलिनी पंडित, वि. म. दांडेकर, वसंत जुगळे, वि. वि. बोरकर, म. ग. बोकरे, अविनाश जोशी, मुणगेकर, नी. बि. सोवनी, रवीन्द्र दोशी, कुलकर्णी, श्रीमती साठे यांनी भाग घेतला. प्राचार्य मावळणकर यांनी चर्चासत्राचा उपन्यास केला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या चर्चासत्रात 'भारतातील औद्योगिक संरचना' हा विषय चर्चेसाठी होता. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. रवीन्द्र सबनीस यांनी केले. या चर्चासत्रात सर्वश्री वसंत पटवर्धन, आंबर्डेकर, श्री. वि. खांदेवाले, श्री. आ. देशपांडे, बी. आर. रायरीकर, म. ग. बोकरे, वि. बा. घुगे, श्रीमती कुमुद पोरे, पी. बी. कुळकर्णी, इंद्रजीत आलटे, चव्हाण, उ. दे. काकोडकर, मनोहर आपटे, शं. के. मोडक, मुणगेकर, रवीन्द्र दोशी, प्रमोद ठोंबरे इत्यादींनी भाग घेतला. चर्चासत्राचा उपन्यास डॉ. र. स. सबनीस यांनी केला.

तिसरे चर्चासत्र शनिवार दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता सुरू झाले. चर्चासत्राचा विषय 'सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ' हा होता. सूत्रसंचालन महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. काकडे यांनी केले. या चर्चासत्रात सर्वश्री नी. बि. सोवनी, वि. वि. बोरकर, सर्जेराव ठोंबरे, श्री. आ. देशपांडे, आनंद नाडकर्णी, ज. फा. पाटील, वि. बा. घुगे, मु. दा. तुपे, शं. तु. खोकले, बी. के. ढाकणे, पां. ज. ताम्हणकर, नीळकंठ रथ, बा. द. कुलकर्णी, अस्तरकर, श्रीमती सुधा सोकाशी, घाणेकर, पुराणिक यांनी भाग घेतला. चर्चासत्राचा उपन्यास डॉ. काकडे यांनी केला.

चौथे आणि अखेरचे चर्चासत्र रविवार दिनांक ३० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सुरू झाले. या चर्चासत्राचा प्रारंभ प्रा. वसंत देशपांडे यांच्या 'ग्रामीण भागातील स्वयंसेवी संस्था' या विषयावरील भाषणाने झाला. या चर्चासत्रात सर्वश्री रामभाऊ गोखले, मुणगेकर, श्रीमती सुलोचना नाडकर्णी, श्रीमती कुमुद पाटील, सर्जेराव ठोंबरे, गोविंद हडप, घाणेकर, बी. एम्. डोळे आणि स. ह. देशपांडे यांनी भाग घेतला. प्रा. वसंत देशपांडे यांनी उपस्थित झालेल्या मुद्द्यांना थोडक्यात उत्तरे दिली. अध्यक्षांनी समारोप केला.

**कार्यकारी मंडळाची सभा**

अधिवेशनस्थानी परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा गुरुवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता झाली. डॉ. स. ह. देशपांडे अध्यक्षस्थानी होते.

१. 'परिषद' व 'अर्थसंवाद' यांच्या आर्थिक परिस्थितीवर सविस्तर चर्चा होऊन सभासद-नोंदणी, वर्गणीदार वाढविणे तसेच जाहिराती मिळविण्याबद्दल सर्वांनी प्रयत्नशील राहावे व कार्यालयाशी त्याबाबत सतत संपर्क ठेवावा असा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी 'अर्थसंवाद'ची वार्षिक वर्गणी रु. २० इतकी ठेवण्याचा निर्णयही सभेने घेतला.

२. 'धुळे जिल्हा अर्थशास्त्र प्राध्यापक संघ' व 'मराठी अर्थशास्त्र परिषद' यांच्यात वार्षिक व्याख्यानमालेबाबत झालेल्या संमतीनाम्यास मान्यता देण्यात आली. ही व्याख्यानमाला १९८५ च्या प्रारंभी सुरू होईल अशी

अपेक्षा आहे. यासाठी 'प्राध्यापक संवाने' परिषदेला दिलेल्या रु. ७००० इतक्या निधीच्या गुंतवणुकीस कार्यकारी मंडळाने संमती दिली.

३. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी 'अर्थसंवाद'चा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळाला सादर केला. अर्थसंवादाच्या संपादनाबाबत सविस्तर चर्चा होऊन 'अर्थसंवाद'मध्ये यापुढे प्रमुख लेखांचा हिंदीत गोषवारा देण्याचे बंद करावे असे ठरविण्यात आले.

**वार्षिक साधारण सभा**

अधिवेशनाच्या तिसऱ्या आणि अखेरच्या दिवशी सकाळी ८-३० वाजता परिषदेची वार्षिक साधारण सभा झाली. डॉ. स. ह. देशपांडे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. सभेत पुढील कामकाज झाले.

१. दिनांक २७ नोव्हेंबर १९८२ रोजी संगमनेर येथे झालेल्या वार्षिक साधारण सभेच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली. तसेच कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेल्या वार्षिक अहवालास, १९८२-८३ या वर्षीच्या हिशेबास आणि १९८४-८५ या वर्षासाठीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली.

२. 'अर्थसंवाद' चा वार्षिक अहवाल डॉ. आनंद नाडकर्णी यांनी सादर केला. तो सभेने संमत केला.

३. १९८४-८५ या वर्षासाठी सर्वश्री ए. डी. भोरकर आणि कंपनी यांची परिषदेचे लेखापाल म्हणून पुन्हा नियुक्ती केली.

४. सभेने १९८४-८७ या तीन वर्षांसाठी खालील नेमणुका केल्या :

कार्याध्यक्ष : प्रा. नी. वि. सोवनी.

कार्यकारी मंडळावरील सभासद : प्रा. अरविंद रा. नगरकर
प्रा. यशवंत गु. रारावीकर
प्रा. शिवकुमार क. खोबरे

५. सभेने १९८४-८५ या वर्षासाठी परिषदेचे अध्यक्ष म्हणून **डॉ. बि. बा. थुगे**, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांची नियुक्ती केली.

६. परिषदेचे आठवे वार्षिक अधिवेशन आंबाजोगाई येथे ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८४ मध्ये घ्यावे असे ठरविले. त्यासाठी स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय आंबाजोगाई या संस्थेचे निमंत्रण सभेने साभार स्वीकारले.

आठव्या अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी सभेने पुढील विषय निश्चित केले.

१. केन्स यांचे अर्थशास्त्र आणि नंतर
२. महाराष्ट्रातील नागरीकरण आणि त्याच्या समस्या
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार.

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असा असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथाकाल जाहीर करतील.

अधिवेशनाचा समारोप समारंभ १२ वाजता सुरू झाला. या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती ना. दा. टाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. श्रीमती ज्योतीबेन त्रिवेदी या उपस्थित होत्या. तसेच विद्यापीठाच्या कुलसचिव श्रीमती कमलिनीबेन भन्साळी याही या समारंभास आल्या होत्या.

अध्यक्षीय समारोपानंतर प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार व स्थानिक-कार्यवाह डॉ. (श्रीमती) सुलोचना नाडकर्णी यांनी विद्यापीठातर्फे व परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. रवींद्र सबनीस यांनी सातवे वार्षिक अधिवेशन यशस्वी करण्यास ज्यांनी हातभार लावला व सहकार्य दिले त्या सर्वांचे परिषदेतर्फे आभार मानले.

समारोपाच्या अखेरीस अध्यक्षांनी सातवे अधिवेशन समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**रवीन्द्र सबनीस**
कार्यवाह-खजिनदार

# वार्षिक अहवाल – १९८२–८३

अहवालवर्षात (१ एप्रिल १९८२ ते ३१ मार्च १९८३) अर्थसंवादाचे चार अंक प्रसिद्ध झाले. या चार अंकांत मिळून एकूण १९६ पृष्ठांचा मजकूर आम्हांस वाचकांना सादर करता आला. वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण ऑक्टोबर-डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध करण्याची नेहमीची प्रथा आहे. तिला अनुसरून **प्रा. आनंद नाडकर्णी** यांचे संगमनेर येथील सहाव्या वार्षिक अधिवेशनातील "भारतीय करव्यवस्था" या विषयावरील अध्यक्षीय भाषण ऑक्टोबर-डिसेंबर १९८२ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले. याव्यतिरिक्त चार अंकांतील लेखनप्रकार खालील-प्रमाणे होते.

| प्रकार | संख्या |
|---|---|
| (१) स्वतंत्र लेख | ९ |
| (२) पुनर्मुद्रित लेख | २ |
| (३) टिपणे व चर्चा | ५ |
| (४) ग्रंथपरिचय व परीक्षणे | ३ |
| (५) अनुवादित वा रूपांतरित लेख | २ |
| (६) अहवाल | २ |

अध्यक्षीय भाषण, पुनर्मुद्रित लेख व अहवाल वगळता उरलेले लेखनसाहित्य पंधरा लेखकांनी उपलब्ध करून दिले. अहवालवर्षात अर्थसंवादाच्या चार अंकांसाठी खालील संस्थांनी जाहिराती पाठवल्या : (१) स्टेट बँक ऑफ इंडिया (२) विद्या सहकारी बँक (३) बँक ऑफ महाराष्ट्र (४) भारत फॅब्रिकेटर्स, मुंबई. या वर्षात अर्थसंवादाचे १३१ वर्गणीदार होते. त्यांना, त्याशिवाय मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य, सर्वसाधारण सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे सभासद, जाहिरातदार इत्यादींना अर्थसंवादाच्या प्रती पाठवल्या जातात.

३१ मार्च १९८३ स अर्थसंवादाच्या प्रकाशनास सहा वर्षे पूर्ण झाली. या सहा वर्षात आपण अर्थसंवाद अखंडपणे चालू ठेवू शकलो ही जमेची बाजू आहे. अंकाचे प्रकाशन नियमितपणे करता येत नाही याची मला खंत आहे. परंतु तोलाचे लेखनसाहित्य गोळा करण्यातील अडचणी, मुद्रणालयातील कामाची गर्दी इत्यादी कारणांमुळे असे घडते. परिस्थिती सुधारण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोत.

अहवालवर्षात प्रसिद्ध झालेले स्वतंत्र लेख, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात लेखन करणाऱ्या व्यक्ती यांची संख्या लक्षात घेतल्यास परिस्थिती गेल्या वर्षाच्या मानाने अल्पशी सुधारली असे म्हणता येईल. मात्र या वर्षातील एकूण पृष्ठसंख्या गेल्या वर्षापेक्षा कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे या वर्षापासून मुद्रणालयाने जुना मोठा टाईप बाद केल्याने अर्थसंवादचा मजकूर लहान टाईपात छापला जातो. चांगले लेखनसाहित्य गोळा करणे बरेच अवघड जाते. साहजिकच अंक काढण्यासाठी मला काही विशिष्ट लेखकांवर प्रामुख्याने अवलंबून रहावे लागते. मराठी

अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांनी जर दरवर्षी प्रत्येकं किमान एक निदान टिपणवजा लेख तयार करण्याचा संकल्प सोडला तर परिस्थिती झपाट्याने सुधारेल असा विश्वास मला वाटतो. आपल्या परिषदेचे बहुसंख्य सदस्य प्राध्यापकी पेशाचे आहेत. त्यांना वर्गात विषय शिकवीत असताना मुद्देसूद मांडणी, गुणकारक अध्यापनाचे तंत्र याविषयी अनेक कल्पना निश्चितच सुचत असतील. परिषदेचे सदस्य असलेल्या इतर व्यावसायिकांना देखील त्यांच्या क्षेत्रात या प्रकारचा अनुभव येत असेल. या कल्पना संगतवार मांडून निदान टिपणांच्या अथवा पत्रांच्या रूपाने त्यांनी माझ्याकडे लिहून पाठवाव्यात अशी सर्वांना माझी कळकळीची विनंती आहे. तसेच अर्थशास्त्रीय विश्लेषणाचे एकेक क्षेत्र घेऊन त्यावर लेखमाला लिहून द्यावी अशी आपणा सर्वांच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांना मी आग्रहाची विनंती करतो. यथावकाश अशा लेखमाला ग्रंथरूपाने प्रसिद्ध करणे आपल्या परिषदेस शक्य होईल. आणि मराठीतील दर्जेदार अर्थशास्त्रीय साहित्याबाबतची उणीव हळूहळू परिषदेस भरून काढता येईल अशी आशा कारणे गैर ठरणार नाही.

अर्थसंवादची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वर्गणीदारांची संख्या आणि जाहिरातीपासूनचे उत्पन्न वाढवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात तसेच सार्वजनिक ग्रंथालयात अर्थसंवाद घेतला जावा यासाठी परिषदेच्या सदस्यांनी सतत प्रयत्न केल्यास वर्गणीदारांची संख्या बरीच वाढवता येईल. परिणामी आर्थिक स्थिती सुधारून अर्थसंवाद अधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यात आपणास यश मिळेल. अर्थसंवादच्या प्रत्येक अंकाच्या तीन मलपृष्ठांसाठी जरी आपणास जाहिराती मिळवता आल्या तरी वर्षाकाठी १२ जाहिरातींचे उत्पन्न आपण प्राप्त करू शकू. अर्थसंवादच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भातील एक उल्लेख करण्यासारखी घटना म्हणजे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी आपल्या त्रैमासिकासाठी कायमनिधी उभारण्यासाठी आपणास केलेली मदत ही होय. दरवर्षी मंडळाचे रु. १००००।– आणि आपले रु. ३०००।– अशी एकूण रुपये १३०००।– ची रक्कम संचित ठेवीत गुंतवली जाईल. ही योजना पाच वर्षे चालू राहील. गेल्या वर्षापासून या योजनेस सुरुवात झाली. या साहाय्याबद्दल आपण सर्व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे अत्यंत ऋणी आहोत.

अर्थसंवादचे अंक प्रसिद्ध करण्यात मला अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले आहे. अर्थात सर्वांत महत्त्वाच्या व्यक्ती त्रैमासिकाचे लेखक / लेखिका होत, यांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्याशिवाय लेखनपरीक्षणाचे काम विनामोबदला करणारे तज्ज्ञ, संपादक मंडळावरील सहाध्यायी, साहाय्यक संपादक, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष आणि कार्यवाह या सर्वांनी मला वेळोवेळी बरेच साहाय्य केले आहे. त्यांचे देखील मी आभार मानतो. अर्थसंवादच्या प्रकाशनाच्या संदर्भातील वित्तीय ओझे हलके करण्यामध्ये अर्थसंवादचे वर्गणीदार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (पश्चिम विभागीय केंद्र) आणि जाहिरातदार यांनी मोठा वाटा उचलला आहे. त्यांचे ऋण मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. मुखपृष्ठावरील चित्र करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीविषयी सल्ला दिल्याबद्दल डॉ. अनिल अवचट यांचा मी आभारी आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे येथील व्यवस्थापक श्री. य. श्री. रणदिवे आणि इतर कर्मचारी यांनी कामाची अतोनात गर्दी असताना देखील मला जे सततपणे सहकार्य दिले त्यांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

**आनंद नाडकर्णी**
प्रमुख संपादक

# मराठी अर्थशास्त्र परिषद : सातवे वार्षिक अधिवेशन

## दिनांक २८, २९ व ३० ऑक्टोबर १९८३

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, कला, वाणिज्य महाविद्यालय, पुणे

### चर्चासत्रांसाठी स्वीकारण्यात आलेले निबंध

**चर्चासत्र १ : विषय : कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| १. | हिल्ला वाडिया | आजच्या काळात मार्क्सचे विचार कितपत वास्तववादी आहेत ? |
| २. | वि. बा. घुगे | कार्ल मार्क्सचे अर्थशास्त्र व भांडवलशाहीचे भवितव्य |
| ३. | दि. र. राणे | कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र |
| ४. | उत्तम कुटे | मार्क्सचे अर्थशास्त्र आणि भारतीय परिस्थिती |
| ५. | मा. ल. अत्रे | मार्क्स यांचा नफ्याचा सिद्धांत |
| ६. | वसंत जुगळे | मार्क्सप्रणीत भांडवली उत्पादनपद्धती |
| ७. | व्यं. मु. पाटणकर | भांडवलशाहीतील भांडवलसंचय, नफ्याचे घटते दर आणि पेचप्रसंग यासंबंधीचे मार्क्सचे विचार |
| ८. | रमेश पानसे | मार्क्सचे अर्थशास्त्र आणि पिळवणूक |
| ९. | ज. फा. पाटील व पां. ज. ताम्हनकर | मार्क्सचे वेतनविषयक विचार |
| १०. | ए. जी. पुजारी | कल्याणकारी राज्याच्या स्वरूपात मार्क्सवाद |
| ११. | उत्तम वाकोडकर | कार्ल मार्क्सचे अर्थशास्त्र |
| १२. | बी. एम्. डोळे | कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र |

**चर्चासत्र २ : विषय : भारतातील औद्योगिक संरचना**

| | | |
|---|---|---|
| १. | व. श्री. पटवर्धन | भारताची औद्योगिक संरचना |
| २. | ना. शं. आंबर्डेकर | भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची लाभप्रदता |
| ३. | शांता पंडित | भारतातील औद्योगिक संरचना |
| २. | ना. तु. जाधव | भारतीय औद्योगिक संरचनेतील बदल |
| ३. | ज्योत्स्ना राजपूत | भारतातील उद्योगांची संरचना महाराष्ट्राच्या संदर्भात |
| ४. | श्री. वि. द्रवीड | भारतातील औद्योगिक संरचना |
| ५. | मो. स. गोसावी | भारतातील औद्योगिक संरचना |

**चर्चासत्र ३ : विषय : सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ**

| | | |
|---|---|---|
| १. | पां. ज. ताम्हनकर आणि ज. फा. पाटील | महाराष्ट्रातील मजूर सहकारी चळवळ -- एक आढावा |
| २. | नी. वि. सोवनी | ग्रामीण विकास आणि / वा सहकार |
| ३. | सु. दा. तुपे | सहकारी संस्थेमार्फत ग्रामीण महाराष्ट्रातील वीजपुरवठ्याचा एक प्रयोग |
| ४. | शि. क. खोबरे | सहकारी तत्त्वज्ञान व महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| ५. | स. ह. देशपांडे | सहकार : तत्त्व आणि व्यवहार (चर्चेसाठी एक टिपण) |
| ६. | वि. व्यं. भोसेकर | सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| ७. | रा. गो. पैठणकर | सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| ८. | बा. द. कुळकर्णी | सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| ९. | रमेश कटके | सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| १०. | य. गु. राराविकर आणि श्या. धों. कुळकर्णी | ग्रामीण सहकारी औद्योगिक वसाहतींची आवश्यकता |

**रवीन्द्र सबनीस**
कार्यवाह-खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद – " मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक "

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे प्रतिवर्षी रु. १००१/– (रुपये एक हजार एक)चे "मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक" मराठीत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकाला देण्यात येणार आहे.

**पारितोषिकासंबंधीच्या अटी व नियम**

१. १ जानेवारी १९८३ ते ३१ डिसेंबर १९८३ या वर्षात प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रीय वा आर्थिक विषयावरील ग्रंथातील गुणवत्तेने सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रंथास हे पारितोषिक देण्यात येईल.

२. या पारितोषिकासाठी वरील काळात प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रावरील मराठी ग्रंथाच्या पाच प्रती परिषदेच्या कार्यालयाकडे लेखकांनी/प्रकाशकांनी पाठवावयाच्या आहेत. कोणत्याही कारणास्तव या पाच प्रती नंतर प्रेषकांना परत केल्या जाणार नाहीत. पारितोषिकासाठी हस्तलिखिते स्वीकारली जाणार नाहीत.

या प्रतींसोबत विहित नमुन्यात (पाच प्रती) संपूर्ण तपशिलासह आवश्यक ती माहिती लेखकांनी/प्रकाशकांनी पाठविणे आवश्यक आहे. माहिती प्रपत्राच्या प्रती परिषदेच्या कार्यालयाकडून दिल्या जातील.

३. पारितोषिकासाठी खालील स्वरूपाचे अर्थशास्त्रीय ग्रंथ विचारात घेतले जातील. (पाठ्यपुस्तकांचाही यात समावेश आहे).

(१) सैद्धांतिक व उपयोजित अर्थशास्त्र व तदन्तर्गत प्रश्नांचे विवेचन, अन्वेषण वा ऊहापोह करणारे ग्रंथ.
(२) वर्तमान वा ऐतिहासिक आर्थिक प्रश्नांची चर्चा वा अन्वेषणा करणारे ग्रंथ.
(३) आर्थिक विचारांच्या इतिहासासंबंधीचे ग्रंथ.
(४) अर्थशास्त्रीय विषयावरील निबंधसंग्रह (असे निबंध पूर्वी विभक्तपणे प्रसिद्ध झाले असले तरी ते चालतील.)

(सर्वसामान्य आर्थिक इतिहासावरील ग्रंथ विचारात घेतले जाणार नाहीत.)

४. पारितोषिकासाठी पाठवायचा ग्रंथ मूळचा, स्वतंत्र असावा. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची पुनरावृत्ती या सुधारून वाढवलेली आवृत्ती नसावी. तसेच पारितोषिकासाठीचा ग्रंथ भाषांतरित, रूपांतरित वा अन्य ग्रंथावर पूर्णतया आधारित असा असता कामा नये.

५. पारितोषिकासाठी पाठवावयाच्या ग्रंथाची किमान शब्दसंख्या सुमारे २५,००० (साधारणतः डेमी आकाराची १०० पृष्ठे) इतकी असावी.

६. पारितोषिकासाठी आलेल्या ग्रंथांचे परीक्षण करून गुणवत्तेप्रमाणे त्यांची क्रमवारी लावण्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषद तीन तज्ज्ञांचे एक परीक्षक मंडळ नेमील. या मंडळाचा निर्णय अंतिम लेखक/प्रकाशकांवर बंधनकारक राहील.

७. पारितोषिकासाठी आलेल्या ग्रंथांपैकी कोणत्या तरी एका ग्रंथास प्रतिवर्षी पारितोषिक दिलेच पाहिजे असे बंधन परीक्षक मंडळावर नाही.

८. परीक्षक समितीचा निर्णय परिषदेचे अध्यक्ष शक्यतोवर सप्टेंबरअखेर जाहीर करतील. पारितोषिक वितरण समारंभ परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात होईल. अध्यक्षांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या ग्रंथाच्या लेखकाला पारितोषिक देण्यात येईल.

९. पारितोषिकासाठी ग्रंथ सादर केल्यानंतर परिषदेतर्फे त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. मात्र परिषदेतर्फे पारितोषिक विजेत्या ग्रंथलेखकाला परीक्षक मंडळाचा निर्णय कळविण्यात येईल.

ग्रंथाच्या प्रती व माहितीपत्र पुढील पत्त्यावर पाठविणे.

**डॉ. रवीन्द्र सबनीस,**
कार्यवाह,
मराठी अर्थशास्त्र परिषद, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
ग्रंथसंग्रहालय मार्ग, **दादर,** मुंबई ४०००१४

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्य

(एप्रिल-जून १९८३ च्या अर्थसंवादच्या अंकात आजीव सदस्यांची १७० नावे प्रसिद्ध झाली आहेत. त्यापुढील नावे खाली देत आहोत.)

---

(१७१) प्रा. एल्. एम्. चौधरी, चोपडा (जि. जळगाव)
(१७२) श्री. माधवराव आत्माराम चितळे, मुंबई
(१७३) प्रा. रेखा जनार्दन सिधये, ठाणे
(१७४) सौ. सुमित्रा मोहन परुळकर, मुंबई
(१७५) श्री. शंकर भगवान देशमुख, कौठा (जि. नांदेड)
(१७६) प्राचार्य मो. स. गोसावी, नासिक
(१७७) प्रा. नंदकुमार भीमराव कुलकर्णी, नासिक
(१७८) प्रा. प्रकाश कर्डिले, नासिक
(१७९) प्रा. एस्. एम्. चपळगावकर, नासिक
(१८०) प्रा. (सौ.) रोहिणी किशोर मिसाळ, नासिक
(१८१) प्रा. सुहास श्रीराम सहस्रबुद्धे, सांगली
(१८२) प्रा. शांताराम अष्टेकर, पुणे
(१८३) प्रा. उत्तमराव गंगाराम पाटील, दहिवडी (जि. सातारा)
(१८४) प्रा. चारुदत्त श्रीधर गोखले, जळगाव
(१८५) सौ. मंगला सर्जेराव पवार, कराड
(१८६) प्रा. (सौ.) अनिता विवेक गोगटे, नासिक
(१८७) प्रा. गजेन्द्र ठाणसिंग गिरासे, सोयगाव (जि. नासिक)
(१८८) प्रा. डॉ. एस्. बी. कोलते, अहमदनगर
(१८९) प्रा. विनायक वासुदेव उपदेव, खामगाव
(१९०) प्रा. शांताराम सूर्यभान गोमासे, खामगाव
(१९१) प्रा. (सौ.) शशिकला गोविंदराव लिमये, खामगाव
(१९२) प्रा. रमेश वासुदेव परांजपे, खामगाव
(१९३) प्रा. नंदकिशोर फत्तेचंदजी मुंदा, अमरावती
(१९४) डॉ. माधव दातार, विलेपार्ले (पूर्व)
(१९५) प्रा. (सौ.) दया केशव पोतदार, वांद्रा (पूर्व)
(१९६) श्री. संजय होनकळसे, दादर
(१९७) प्रा. श्या. बों. कुळकर्णी, नासिक
(१९८) प्रा. ए. आर. फोपळे, वसई

(१९९) श्री. प्रकाश अ. साळवी, मुंबई
(२००) श्री. भास्कर सीताराम साठे, विलेपार्ले (पूर्व)
(२०१) डॉ. एस्. आर. चिरमाडे, जळगाव
(२०२) प्रा. (कु.) विद्या का. देशपांडे, नासिक
(२०३) प्रा. (कु.) रजनी सीताराम शिंपी, नासिक
(२०४) प्रा. (कु.) मंगला व्ही. राव, नासिक
(२०५) डॉ. वसंत व. देशपांडे, पुणे
(२०६) डॉ. सुलभा ब्रह्मे, पुणे
(२०७) प्रा. निलेश दांगट, पिंपळवंडी (जि. पुणे)
(२०८) प्रा. अरविंद नगरकर, पुणे
(२०९) प्रा. रमेश बाबुलाल शहा, पुणे
(२१०) प्रा. मधुकर गोवनपल्लीकर, अंबाजोगाई
(२११) प्रा. सी. आर. आधारकर, चांदवड (जि. नासिक)
(२१२) सौ. जीडीगुंटा सावित्री शेषाचलम, सातारा
(२१३) प्रा. (सौ.) वृन्दा माधव कशाळीकर, अर्जुननगर, (जि. कोल्हापूर)
(२१४) प्रा. जयसुभाष जगन्नाथ कदम, पनवेल

## चुकीची दुरुस्ती

**अर्थसंवाद–एप्रिल-जून १९८३**

| पृष्ठ क्रमांक | ओळ क्रमांक | चुकीचे | बरोबर |
|---|---|---|---|
| २२ | वरून १ ली | " वाटप विनिमयमूल्यातील बदलामुळे होते " | "वाटप विनिमयमूल्यातील बदलांमुळे मूर्त होते" |
| २५ | खालून ५ वी | " यात नियोजित करता येते " | " यात वियोजित करता येते " |
| २६ | खालून ७ वी | " प्रसिद्ध ठरतो ही रचनाही " | " असिद्ध ठरतो ही रचनाही " |
| २६ | खालून ३ री | " त्याला अपवाद नाही." | " त्याला अपवाद नाहीत." |

**अर्थसंवाद–जुलै-सप्टेंबर १९८३**

| पृष्ठ क्रमांक | ओळ क्रमांक | चुकीचे | बरोबर |
|---|---|---|---|
| ६२ | खालून ७ वी | " सातत्व " | सातत्य |
| ६३ | वरून २ री | " सातत्य " | सातत्य |
| ६५ | वरून १४ वी | " मानवी वर्तनावस्था आर्थिक प्रभावांचा " | "मानवी वर्तनाचा व आर्थिक प्रभावांचा" |
| | खालून २ री | " आत " | " आता " |
| ६७ | वरून ५ वी | " अंततोपगामी स्थिरता " | " अनंतोपगामी स्थिरता " |
| ७१ | वरून ३ री | " अर्थव्यवस्थेचा " | " अर्थव्यवस्थेच्या " |
| ७२ | खालून १८ वी | " (या बदलामुळे) वळली " | " (या बदलामुळे) चढली " |
| ७३ | वरून १३ वी | " त्या अर्थव्यवस्थेच्या " | " ज्या अर्थव्यवस्थेच्या " |
| ७४ | खालून १० वी | " त्यात मूलगर्भिता " | " त्यात मूल्यगर्भिता " |
| ७५ | वरून १३ वी | " आक्षेपसहित " | " आक्षेपरहित " |
| | वरून १५ वी | " कर्णप्रभाभित " | " कर्णप्रभाविता " |

(या चुकांबद्दल आम्ही दिलगीर आहोत. संपादक)

# दि राजवाडे मंडळ पीपल्स, को-ऑप. बँक लि. धुळे

स्थापना– १९३३ फोन– ४२८ पो. बॉ. नं. ९९

बँकिंगच्या क्षेत्रात जनसामान्यांची सेवा करीत असताना धुळे जिल्ह्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी साहाय्यभूत ठरलेली एकमेव बँक

## उज्ज्वल भवितव्यासाठी आमच्या आकर्षक योजना

◇ मंगल ठेव योजना ◇ कल्पतरू योजना ◇ आकर्षक ठेव योजना ◇ कॅश सर्टिफिकेटस् ◇ मुदतीच्या ठेवीवर राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा १ टक्का जास्त व्याज ◇ बँकेच्या इमारतीत जनतेच्या सेवेसाठी स्ट्राँगरुममध्ये लॉकर्सची व्यवस्था ◇ देवपूर शाखेत लॉकर्सची व्यवस्था ◇ देवपूर शाखा सकाळ– संध्याकाळ बँकिंगची सोय, शिवाय बँकेचे व्यवहार रविवारीही चालू राहतील. ◇ सकाळ– संध्याकाळ बँकिंगच्या व्यवहारासाठी कुमारनगर शाखा.

| | | |
|---|---|---|
| **श्री. ज. शं. अग्रवाल**<br>जनरल मॅनेजर | **श्री. बा. बी. मुंदडे**<br>चेअरमन | **श्री. वि. नि. इंगळे**<br>व्हा. चेअरमन |
| **श्री. लो. गो. माळी**<br>संचालक | **श्री. म. त्र्यं. वैद्य**<br>संचालक | **श्री. ना. कु. गायकवाड**<br>संचालक |
| **श्री. का. भि. चौधरी**<br>संचालक | **श्री. व. सु. पिंगळे**<br>संचालक | **श्री. अ. द. जोशी**<br>संचालक |

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. ओ. ओ. अग्रवाल**<br>ब्रँच मॅनेजर (मुख्य ऑफिस) | **श्री. प्र. न. देशपांडे**<br>संचालक | **श्री. म. मा. पाठक**<br>शाखाधिकारी<br>कुमार नगर शाखा | **श्री. पु. मि. खिवसरा**<br>शाखाधिकारी<br>देवपूर शाखा |

Registration No. R. N. 31918/77


**दि बेलगंगा सहकारी साखर कारखाना लि. ( भोरस ) चाळीसगांव, जि. जळगांव**

टेलिग्राम : बेलगंगा (४० गाव) फोन नं. : १०४/३३४

**कारखान्याने सुरू केलेले प्रकल्प**

(१) बेलगंगा टेक्निकल पब्लिक स्कूल (२) भारतीय अॅग्रो इंडस्ट्रीज फौंडेशन, उरळीकांचन यांच्या सहकार्याने दुग्धविकास कार्यक्रमासाठी सुरुवात केली (३) सभासद शेतकऱ्यांसाठी ट्रक्स व ट्रॅक्टरनी वाहतूक यंत्रणा

**खालील प्रकल्प कार्यान्वित करण्याचा संचालक मंडळाचा निर्धार**

(१) कागद कारखाना (वाया जाणाऱ्या भुश्याचा वापर करून कागदाच्या प्रकल्पाची उभारणी) (२) सहकारी तत्त्वावर अद्ययावत स्वरूपाचे रुग्णालय (३) कमकुवत व मागास जमातीसाठी सामंजस्य पत्र होकर गिरणी सुरू करण्याचा प्रकल्प (४) पांढरी शुभ्र मी सेंद्री साखरनिर्मिती (५) जिल्ह्यातील उत्पादनात सुरू असलेल्या सहकारी साखर कारखान्यात अग्रगण्य उत्पादन करण्याचा प्रकल्प (६) डिस्टिलरी प्रकल्प

**– कारखान्याची ठळक वैशिष्ट्ये –**

(१) खुल्या स्पर्धेत देशातल्या अनेक राज्यांतील बाजारपेठांमधून भरपूर मागणी असलेल्या, व्यापारी व ग्राहक यांच्या मनपसंतीस उतरलेल्या, शुभ्र, दाणेदार, उच्च प्रतीच्या साखरेचे उत्पादन हेच आमचे वैशिष्ट्य (२) ऊस-उत्पादक सभासदांचे उसास जास्तीत जास्त किंमत देऊन त्यांच्या आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेला कारखाना (३) सभासद व शेतकरी-बांधवांची विनम्र सेवा, सचोटी.

(के. डी. जगताप) कार्यकारी संचालक

(पं. दे. पाटील) व्हा. चेअरमन

एम्. के. पाटील चेअरमन

WITH COMPLIMENTS OF

**SAFARI INDUSTRIES (INDIA) PVT. LTD.**

**KURLA, BOMBAY — 400 070**


डॉ. रवीन्द्र स. मुकनीस यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, ११५/१, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४, येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४ येथे प्रसिद्ध केले.